29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'




**Editors**

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

## तेविसावी

## आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक


• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

ꥰ स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

ꥰ देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

ꥰ **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. स्नेहल तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे ४११०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

ꥰ © S.R.I.

ꥰ **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ꥰ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ꥰ **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

ꥰ ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

ꥰ **पृष्ठसंख्या :** १३०

ꥰ **मूल्य :** ₹ ३००/- $ 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... - संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता - शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत - बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक - श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान - एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार- समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल - राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

| | | |
|---|---|---|
| १८. | स्वकर्तृत्वातून कार्याचा ठसा उमटविणारे कर्मयोगी प्राचार्य. टी. ई. शेळके | प्रा. सायली राऊत / ७७ |
| १९. | आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान | प्रा. कैलास चौधरी / ८० |
| २०. | उद्यमशील व्यक्तिमत्त्व - विठ्ठल कामत | प्रा. पुष्कर जोशी / ८४ |
| २१. | थोर व्यक्तिमत्त्व शरद पवार | प्रा. रोहिदास लांडे / ८८ |
| २२. | ख्यातनाम गणितज्ञ - श्रीराम शंकर अभ्यंकर | प्रा. भाग्यश्री भावसार / ९२ |
| २३. | सुंदरराजन | प्रा. अशोक नाबगे / ९६ |
| २४. | महामानव - डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. मुजीब शेख / ९९ |
| २५. | महाराष्ट्राचे सुपुत्र; अश्रूंचा महाकवी : साने गुरुजी | प्रा. भाऊसाहेब महाडदेव / १०२ |
| २६. | महात्मा ज्योतिबा फुले | प्रा. बापुसाहेब मांडे / १०६ |
| २७. | अवुल पाकीर जैनुलाब्दीन तथा ए.पी.जे अब्दुल कलाम | प्रा. प्रमोदकुमार राऊत / १०८ |
| २८. | मी पाहिलेला एक उद्योजक | प्रा. कैलास दातीर / ११२ |
| २९. | एक किमयागार | प्रा. योगिराज चंद्रात्रे / ११६ |
| 30. | Rupendraji Kala (Tatya) - Go to Person of People in Wakadi Town | **Prof. Simran Chug / 120** |
| 31. | Life journey of Mr. Narayana Murthy | **Prof. Mayuri Jejurkar / 124** |

# सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर

– प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर

एकनाथ बुवासाहेब निंबाळकर यांचा जन्म बुधवार दिनांक १० सप्टेंबर १९१९ रोजी झाला. एकनाथ अर्थात हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातले होते आणि बुद्धी मात्र उच्चभ्रू समाजातील नित्याने विद्येचा खुराक घेणाऱ्या मुलांपेक्षाही कुशाग्र होती. आबासाहेब प्रथमतः आमदार झाले तेव्हा चापड गावाला त्यांचा सत्कार होता. पंचक्रोशीतील अलोट जनसमुदाय सोहळा पाहण्यास जमला होता. शेतकऱ्याचा मुलगा आमदार झाला म्हणजे त्यावेळी निदान त्या परिसरात तरी पर्वणीच होती. आबासाहेब मंत्री झाल्यावर तर त्यांच्या आनंदाला सीमाच राहिली नव्हती. स्वभाव दिलदार व वृत्ती उदार आणि शील संपन्नता या त्रिवेणी गुणांच्या संगमाने आबा समाजमान्य झाले.

आबासाहेबांनी केवळ विचारात नव्हे, कृतीच करून दाखविली. यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली आबासाहेबांनी उजनी प्रकल्पाचे काम हाती घेतले. खेड्यापाड्यात शिक्षण संस्थेचे जाळे विणले. आबासाहेबांनी खेड्यातील अज्ञान दूर करून खेडी प्रकाशमय केली. खरोखरच आबासाहेब देवमाणूस. रत्नाची खाण म्हणावी लागेल. त्यांच्याविना केवळ अहमदनगर जिल्ह्याचेच नव्हे तर महाराष्ट्राचे राजकारण अधुरे वाटते.

उण्यापुऱ्या महाराष्ट्राचा केरळ करण्याच्या कामी यशवंतरावांनी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना महाराष्ट्र दौऱ्यासाठी पाचारण केले होते. ३० मे १९५९, नेहरुजींच्या महाराष्ट्र दौऱ्यातील पहिलाच दिवस अन् ती भेट ही पहिलीच अहमदनगर शहरासाठी. मराठा बोर्डिंग येथे विराट सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्ष स्थानी होती. ए.बू. तथा आबासाहेब निंबाळकर. मराठा बोर्डिंगचे आवार प्रचंड जनसमुदायाने खच्चून भरले होते. तो जनसमुदाय केवळ कॉंग्रेस पक्षावर विश्वास संपादनाची साक्ष देत होता. नेहरूजी अहमदनगर जिल्ह्यातील लोकांच्या कॉंग्रेस पक्षावरील निष्ठेने प्रभावित झालेले दिसत होते. आपल्या भाषणातून नेहरूजींनी यशवंतराव चव्हाणांबरोबर आबासाहेबांच्या पक्षबांधणीची प्रशंसा केली. त्या प्रशंसेने आबासाहेब प्रफुल्लित होण्याऐवजी संपूर्ण नगर जिल्ह्यातील जनताच उल्हासित झाली. ती केवळ

आबासाहेबांच्या तडफदार कर्तृत्वामुळेच. याचवेळी आबासाहेब संपूर्ण अहमदनगर जिल्ह्याचे नेते म्हणून मान्य झाले.

फक्त चार वर्षांत आबासाहेबांनी अहमदनगर जिल्ह्यामध्ये राजकीय वातारणात संपूर्ण कायापालट घडवून आणला होता. १९५७ च्या असेंब्ली निवडणुकीत अहमदनगर जिल्हा म्हणजे महाराष्ट्राचा केरळ होता. पण आबासाहेबांनी ग्रामीण भागातून बहुजन समाजातील कर्तबगार कार्यकर्त्यांना कॉंग्रेस पक्षाच्या छत्राखाली एकत्र करून अहमदनगर जिल्ह्यामध्ये एक जबरदस्त शक्ती उभी केली. पांढरपेशा वर्गाचा राजकीय क्षेत्रातील पगडा साफसुपडा करून टाकला. न भूतो न भविष्यति या राजकीय कायापालटामुळे यशवंतरावजी चव्हाण साहेब आबासाहेबांवर एकदम फिदाच झाले. साहेबांनी आबासाहेबांना इतके विश्वासात घेतले की, पश्चिम महाराष्ट्रातील साहेबांच्या जवळच्या कार्यकर्त्यांमध्ये आबासाहेबांनी प्रथम क्रमांकाचे स्थान पटकावले. ते केवळ कर्तृत्वावरच. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. संपूर्ण महाराष्ट्राचे 'साहेब' म्हणून त्यांना आदराने संबोधिले जाऊ लागले. चव्हाण साहेब मंत्रिमंडळात कोणाकोणाला घेणार याबद्दल सर्वत्र चर्चा सुरू झाली. संपूर्ण महाराष्ट्रातून निंबाळकरांचे नाव पहिल्या यादीमध्ये चर्चिले जाऊ लागले. अहमदनगर जिल्ह्यातून आबासाहेब निंबाळकर मंत्री झाल्याची चर्चाही सुरू झाली आणि टी चर्चा केवळ तर्क-वितर्कवर आधारित नव्हती तर परिस्थिती सापेक्षच होती. चव्हाणसाहेबांनी आबासाहेबांना मंत्रिपदाची ऑफर दिली. पण आबासाहेबांनी तात्काळ मुंबईला जाऊन सांगितले की, साहेब आपण अहमदनगर जिल्ह्यामध्ये संगमनेर तालुक्यातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमधून निवडून आलेले श्री. बी. जे. खताळ पाटील यांचा मंत्रिपदासाठी विचार करावा. माझा नाही केला तरी चालेल. केवढी मोठी निस्वार्थी प्रवृत्ती! आबासाहेबांचं मन विकसित झालेलं होतं. साहेबांना आबासाहेबांबद्दल आत्यंतिक जवळीक वाटू लागली. निंबाळकरांसारखे सच्चे पाईक यशवंतरावांना पर्यायाने कॉंग्रेस पक्षाला मिळाले होते. अहमदनगर जिल्ह्याचे कॉंग्रेस श्रेष्ठी म्हणून आबासाहेबांना बहुमान मिळाला. आबासाहेबांचा शब्द हा प्रमाण ठरू लागला. आबासाहेब जो निर्णय घेत तो सार्वमतातून असे, त्यामुळे एक आदरयुक्त वचक बसला.

पण १९६७ साली जि.प. दुसरी निवडणूक झाली. कोपरगावचे शंकरराव काळे विधानसभेच्या निवडणुकीत कोपरगावमधून हरले. गृहस्थ तर इंजिनिअर, उच्च विद्याविभूषित आणि तडफदार होते. अशा माणसाची कॉंग्रेस पक्षाला गरज होती. म्हणून आबासाहेबांनी शंकरराव काळे यांना दुसऱ्यांदा स्वतःच्या कर्जत तालुक्यातील राशीन गटातून निवडणुकीस उभे केले. स्वतःच्या मतदारसंघात अपयशी ठरणाऱ्या व्यक्तीला आबासाहेब निंबाळकर दुसऱ्या मतदारसंघातून सहज

निवडून आणतात आणि सलग दुसऱ्यांदा जि.प.चा अध्यक्ष करतात, असे जरी असले तरी १९६२ ते आज अखेर जेवढे म्हणून अहमदनगर जि.प.चे अध्यक्ष झाले ते सर्व आबासाहेबांच्या सल्ल्यानेच झालेले आहेत.

भारतीय काँग्रेस पार्टीतर्फे निंबाळकरांचे परदेश दौऱ्यासाठी नाव निश्चित झाले होते. याचाच अर्थ त्याच वेळी आबासाहेबांच्या काँग्रेस पक्ष संघटनातील अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेची दखल अखिल भारतीय काँग्रेस पक्षाने घेतली होती, असे स्पष्ट होते. शुभेच्छा देताना यशवंतराव म्हणाले, आबासाहेब परदेशात गेल्यावर त्यांनी 'मी जगातील एका मोठ्या लोकशाही प्रधान देशाचा म्हणजे हिंदुस्थानचा प्रतिनिधी आहे. आणि आमची लोकशाही जगातील सामन्यातील सामान्य माणसांना मानते' असा आपल्या हिंदुस्थानामार्फत संदेश द्यावा. इतक्या लहान वयात भारत सरकारतर्फे निंबाळकरांना परदेश दौऱ्याची संधी मिळते ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. अशा सदिच्छा मा.ना. राजाराम बापू पाटील यांनी त्याप्रसंगी व्यक्त केल्या. १ जुलै १९६४ रोजी सकाळी मुंबईचा निरोप घेऊन आबासाहेब दुपारी १ वाजता मुंबई विमानतळावरून दिल्लीला निघाले. यावेळी सोबत म्हणून शरदचंद्र पवार साहेब होते. त्या वेळी शरदचंद्र पवार साहेब युवक काँग्रेसचे नेते होते. दिल्लीहून त्यादिवशी रात्रीच या चौघांचे शिष्टमंडळ बोईंग ७४७ या विमानाने लंडनला रवाना झाले.

आबासाहेबांच्या युरोप खंडातील देशांच्या दौऱ्यामध्ये विविध संस्कृतीचे दर्शन घडले. प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासावरून त्या राष्ट्राची संस्कृती ज्ञात होते. पण परराष्ट्रांपेक्षा भारतीय लोकांना भारतीय लोकजीवनाचा ८०% भाग शेतीवर अवलंबून आहे. पण भारतीय शेतकरी प्रगत शेती तंत्रज्ञान अद्यापि शेतीमध्ये सर्वत्र वापरताना दिसत नाहीत. त्यामुळे ८०% लोकांच्या शारीरिक श्रमाला तांत्रिक, यांत्रिक बैठक बसलेली नाही आणि ती बसणे काळाची गरज वाटते. आबासाहेबांच्या कार्याचा प्रत्यक्षात संख्यात्मक दृष्टीने स्पष्टच आढावा घ्यायचा ठरवले तर आपणाला तो प्रत्येक तालुकावार घ्यावाच लागेल. १९७२ च्या दुष्काळामध्ये आबासाहेबांनी एकट्या कर्जत तालुक्यात १२२ पाझर तलाव पूर्ण केले. कर्जत तालुक्यात एकूण ८१ गावे आहेत. गावतळी १५ पूर्ण केली, तर ७ लघुपाटबंधारे बांधले. ५८२ नालाबंडिंग पूर्ण केल्या. पाझर तलावांच्या सिंचन क्षमतेखाली ३७९१ हेक्टर जमीन, लघुपाटबंधाऱ्याच्या सिंचन क्षमतेखाली २४३४ हेक्टर तर नालाबंडिंगखाली ६४३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. शेतीप्रधान भारत देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती आहे. शेतीला केवळ पाण्याची उपलब्धता करून दिली म्हणजे शेतकऱ्याची आर्थिक व्यवस्था सुधारते असे नाही. शेती व्यवसायाला पूरक धंद्याची जोड पाहिजे हे आबासाहेबांनी प्रथमपासूनच जाणले होते. आबासाहेब

निंबाळकर हे कर्जतसारख्या माळरानावर उमललेला गुलाब खरोखरच वेळीअवेळी या तालुक्यातूनच नव्हे तर अहमदनगर जिल्ह्यातून आलेल्या उष्माघाताने यत्किंचितही कोमेजला नाही. सतत या गुलाबाच्या कर्तृत्वाच्या सुगंधाने हा तालुकाच काय, पण सबंध अहमदनगर जिल्हा सतत दरवळत राहिला आहे. कर्जत तालुक्यात त्यावेळी काही अशक्य कोटीतील गोष्टी, ज्या आबासाहेबांनी प्रत्यक्षात करून दाखविल्या, त्यापैकी कर्जत येथील महाविद्यालय हे एक होय. सन १९६२ पासून कर्मवीर दादा पाटलांना कर्जत येथे कॉलेज काढण्याच स्वप्न पडू लागले होत. तशी इच्छा त्यांनी अनेकांजवळ व्यक्त केली होती. कॉलेजसाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदीच्या कार्याला दादा पाटील लागले. अहमदनगर दक्षिण जिल्ह्यामध्ये अहमदनगर वगळता इतरत्र कोठेच उच्च शिक्षणाची सोय नव्हती. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमाने दादा पाटील, आबासाहेब निंबाळकर यांनी माध्यमिक विद्यालये गरजेइतपत कर्जत, जामखेड, श्रीगोंदा तालुक्यात कार्यान्वित केलेली होती. सन १९६२ साली महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे प्राथमिक शाळेच्या १४ नवीन खोल्यांचे उद्‌घाटन करण्यासाठी आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार आबासाहेब निंबाळकर होते. अध्यक्षीय भाषणात आबासाहेबांनी कर्जत तालुक्यात सीना नदीवर धरण झालेच पाहिजे अशी मागणी करताच श्रोत्यांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने आसमंत निनादले होते. तत्पूर्वी अशी मागणी कोणीच केली नव्हती. अपयशाने खचून जाणे हा आबासाहेबांचा पिंडच नाही. त्यांच्या प्रयत्नांच्या पराकाष्ठेमुळे सन १९८७ च्या मार्चमध्ये सीना मध्यम प्रकल्प कार्यान्वित झाला. पहिल्याच वर्षी म्हणजे १९८७ च्या उन्हाळी हंगामात अहमदनगर जिल्ह्यात सर्वत्र पाटपाण्याखाली भिजले. आबासाहेब जे निर्णय घेतात ते काळाच्या निकषावर घासूनच घेतात. निर्णय घेताना कदाचित विलंब लागला असेल, पण घेतलेल्या निर्णयातून जी फलश्रुती झाली, ती मात्र सर्वसमावेशक आणि बहुजन हिताचीच ठरलेली आहे हे काळच सांगत आहे. त्यासाठी हातच्या कांकणाला आरशाची गरज नाही. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व ज्यांना आपण म्हणतो ते आबासाहेबांकडे आहे. बाबूमियाँ तसे निधर्मी वृत्तीचे खंदे पुरस्कर्ते. त्यांच्या समाजसेवेतूनच सामाजिक कार्याला शक्ती मिळत असे. म्हणून आबासाहेब अजूनही श्रीगोंद्याला आले तर बाबुमियाँची भेट घेतल्याशिवाय जात नाहीत.

मला या ठिकाणी नमूद करण्यात सार्थ अभिमान वाटतो की एके दिवशी आबासाहेब माझ्या काट्याच्या वाडीतील वस्तीवर अचानक आले. माझ्या वडिलांची भेट घेऊन सांगितले की, तुम्ही या मुलाला काँग्रेसच्या राजकारणासाठी, काँग्रेस संस्कृतीच्या कुटुंबासाठी, आम्हाला पूर्ण वेळ द्या. मी आपणाला खात्री

देतो की त्याने चांगले काम करण्याची जिद्द ठेवली तर भावी काळात त्याला महाराष्ट्राला निश्चितच चांगले काम करण्याची संधी मिळेल. १९६२ सालातील आबासाहेबांची भविष्यवाणी अवघ्या सोळा वर्षांत खरी ठरली. कार्यकर्त्यांमधील गुणांची पारख येणे, हे नेत्यामधील महत्त्वाचे अंग आहे. कै. यशवंतराव चव्हाण साहेबांचे तर हे खास वैशिष्ट्य होते. १९५७ च्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचे पानिपत झाले. अहमदनगर जिल्ह्यात तर त्या वेळी काँग्रेस पक्षाला तेरा पैकी एकाच जागा जिंकता आली. अशा वेळी अहमदनगर जिल्ह्यामध्ये चव्हाण साहेबांनी आबासाहेबांची काँग्रेस पक्षनेता म्हणून निवड केली. चव्हाण साहेबांची निवड इतकी अचूक होती की त्यानंतर १९६२ मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये तेरापैकी बारा जागा काँग्रेस पक्षाने भरघोस मतांनी आबासाहेबांच्या नेतृत्वाखाली निर्विवादपणे जिंकल्या. त्यात वैशिष्ट्ये असे की, स्वतः आबासाहेब अहमदनगर जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाच्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाले. तेव्हापासून ते आजतागायत अहमदनगर जिल्हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून उभा राहिला आहे.

आजच्या राजकीय जमान्यात ज्याने स्वतःच्या वयाचे अर्धे शतक राजकारणात घालविले अशा आबासाहेबांनी स्वतःचा राजकीय वारसा स्वतःच्या घरातून निर्माण केला नाही हे एक त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अद्भुत वैशिष्ट्यच होय. आबासाहेबांसारखा दूरदर्शी नेता कर्जतच्या दुष्काळी भूमीत जन्माला हे खरोखर आपणा सर्वांचे भाग्य होय.

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'




**Editors**

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre

Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- <br> S 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... - संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता - शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत - बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक - श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान - एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार- समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल - राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता

– प्रा. डॉ. बाळासाहेब बावके

अहमदनगर जिल्ह्यातील कामगार कष्टकरी चळवळीचा इतिहास अभ्यासला की अनेक नेत्यांची नावे समोर येतात, त्याच मुशीतून तयार झालेले एक व्यक्तिमत्त्व म्हणजे कामगार नेते श्री. भीमाजी रंभाजी बावके हे होय.

**परिचय –**

श्री. भीमाजी रंभाजी बावके यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९३३ साली साकुरी (ता.राहाता) येथे सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांना ५ भाऊ व १ बहीण असे मोठे कुटुंब. आई-वडिल अशिक्षित. शिक्षणाकरिता गाडगे महाराज आश्रम राहुरी येथे प्रवेश घेतला व त्यानंतर अहमदनगर येथील दादा चौधरी विद्यालयात पी.डी.(जुन्या काळातील मॅट्रिक) पर्यंत पूर्ण केले. १९५६ साली अर्थाजनाकरिता श्रीरामपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नोकरीही स्वीकारली. याच काळात बोरावके यांच्या गोदामात नव्याने सुरू झालेल्या रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यायात विनामोबदला लिपिकाची नोकरीही स्वीकारली.

तत्कालीन माजी आमदार श्री. भास्करराव गलांडे, श्री. अण्णासाहेब शिंदे, कॉ. माधवराव गायकवाड यांच्याशी भेट झाली. त्यांच्या कम्युनिस्ट विचारांच्या प्रभावामुळे जिल्ह्यातील इतर कम्युनिस्ट सहकाऱ्यांशी त्यांच्या भेटी होऊ लागल्या. यात प्रामुख्याने कॉ. भुस्कुटे, कॉ. डी. बी. कुलकर्णी, कॉ. वसंतराव तुळपुळे, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. भास्करराव जाधव यांच्या विचारांच्या प्रभावाखाली त्यांनी कामगार चळवळीत पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

कॉ. बावकेंनी श्रमिकांच्या चळवळीमध्ये स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. १९६५ मध्ये अहमदनगर जिल्हा शेतमजूर युनियन या श्रमिकांच्या व कष्टकऱ्यांच्या प्रश्नाकरिता लढणारी अशी संघटनेची स्थापना केली. याच संघटनेच्या माध्यमातून कॉ. बावके यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात विविध लढे उभे केले व संपूर्ण महाराष्ट्रात पोहचविले. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात शेतमजुरांच्या विविध मागण्यांकरिता स्थापन झालेली ही पहिलीच संघटना होती. १९६६ मध्ये सावळीविहीर ता. कोपरगाव येथील कृषी संशोधन केंद्र व के. बी. फार्म (हा खटोड शेती फार्म या

नावाने परिचित होता.) येथे पहिला शेतमजुरांचा संप झाला. यात प्रामुख्याने सालदार, महिनेदार, टोळीवाले, रोजंदारीतील शेतमजूर अशी विभागणी असे. या अशिक्षित वर्गाला संघटित करण्याचे अत्यंत कठीण काम कॉ. बावके यांनी त्या काळात केले. याकरिता १९७० साली श्रीरामपूर येथे शेतमजुरांचे राज्यव्यापी अधिवेशन भरविले व त्यात संपूर्ण महाराष्ट्रातील शेतमजुरांना व कार्यकर्त्यांना आमंत्रित करण्यात आले होते.

**१९७२ चा दुष्काळ –**

कॉ. बावके यांनी १९७१ साली श्रीरामपूरच्या पूर्व भागातील दुष्काळ हटावा. शेतीला व पिण्यास पाणी उपलब्ध व्हावे म्हणून हजारो शेतकरी, शेतमजूर व सहकारी कॉम्रेड्सह देशातील पहिला रास्ता रोको टाकळीभान (ता. श्रीरामपूर) येथे केला होता. देशातील हा पहिलाच रास्ता रोको होता. टाकळीभान, घुमानदेव, घोगरगाव, वांगी, खिर्डी अशा अनेक गावांतील शेतकऱ्यांनी व मजुरांनी या टेल टँकचे काम सुरू करावे म्हणून त्यांच्या बैलगाड्या रस्त्यावर आडव्या लावून रस्तारोको केला व याचे नेतृत्व कॉ. बावके यांनी केले होते. १९७२ चा दुष्काळात जीवनावश्यक वस्तू बाजारातून गायब झाल्या होत्या, मोठी भाववाढ झालेली होती. अशा परिस्थितीत कॉ. बावके यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड असा मोर्चा श्रीरामपूर शहरात निघाला. महागाईने व उपासमारीने हैराण झालेल्या कामगार व मजुरांवर पोलिसांनी लाठीमार केला व मोर्चाला हिंसक वळण लागले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व पुरवठा अधिकाऱ्यांना रु. १ दराने हरभरा डाळ, गूळ व इतर धान्याची रेशन दुकानातून विक्री करण्याचे आदेश दिले. कॉ. बावके व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक केली गेली व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. पुढे हे गुन्हेही सरकारला मागे घ्यावे लागले.

**कृषी विद्यापीठ कामगारांचा लढा –**

महाराष्ट्रात चारही कृषी विद्यापीठांत काम करणाऱ्या शेतमजुरांची संख्या मोठी होती; परंतु या विद्यापीठात मजुरांना कोणतेही शासकीय नियम नव्हते. कामाच्या वेळा, शासनाने ठरवून दिलेले किमान वेतन, रजा, सुट्ट्या, बोनस, आजारपणाची रजा, पेन्शन, प्रोविडेंट फंड, ग्रॅच्युटी आदी बाबींची नियमावली किंवा कायदेशीर पूर्तता न करता या चारही कृषी विद्यापीठांवरील मजुरांना राबवून घेतले जात होते. कॉ. बावके यांनी या चारही विद्यापीठांतील कामगारांना संघटित करून शासनाकडे कायदेशीर हक्क मिळावेत यासाठी लढा उभारला. त्याची सुरुवात १ मे १९७३ रोजी झाली. या कामगारांनी अनेक प्रकारे आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला व शेवटचे म्हणून संपाचे हत्यार वापरले. विद्यापीठातील सर्व विभागांत व महाराष्ट्रातील चारही विद्यापीठांत या संपाचे लोन पोहोचले. सर्व विद्यापीठांतील शेतीची कामे बंद पडली. सरते शेवटी संपावर

असलेल्या सर्व मजुरांवर पोलिसांच्या माध्यमातून प्रचंड मोठा लाठीहल्ला व अश्रूधूर केला. यात प्रमुख कार्यकर्त्यांवर पोलिसांनी लाठीमार केला या सर्वांसह अनेक कामगारांना तुरुंगात डांबले. त्यानंतर कॉ. बावके यांनी तेथून पुढे न्यायालयीन लढाईचे धोरण स्वीकारले. न्यायालयीन लढाई १९७७ पासून सुरू झाली प्रथमत: कामगार न्यायालय, जिल्हा न्यायालयातून पुढे उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ व सर्वोच्च न्यायालयापर्यंत हा लढा पोहोचला. या सर्व लढ्यास एकूण २३ वर्षे लोटली व सर्वोच्च नायालयाने सर्व कामगारांना किमान वेतनातील मागील फरक मंजूर केला व एकूण ९ जिल्ह्यांतील शेतमजूर व कामगारांना एकूण ५६ कोटी रुपयांचा वेतनातील फरक महाराष्ट्र शासनाला अदा करावा लागला. तत्कालीन परिस्थितीत हा फारच मोठा विजय संघटनेचा व कामगार कर्मचाऱ्यांचा झालेला होता. त्याच बरोबर या मजुरांना पेन्शनचा कायदा लागू झाला. देशातील इतिहासात शेतमजुरांना पेन्शन लागू होण्याची ही पहिलीच वेळ होती या सर्व लढ्याचे श्रेय कॉ. बावके यांनी घेतलेल्या अतोनात कष्टांना जाते. विविध न्यायालयांत आजही कामगारांचे रजा, वेतन फरक उपदान ग्रॅच्युटी मिळण्याबाबत संघर्ष सुरू आहे.

**शेतमजुरांना मालक बनविले –**

श्रीरामपूर, राहुरी व कोपरगाव या तालुक्यांत व्यापारी, उद्योगपती, बडे भांडवलदार, जमीनदार यांनी खूप मोठ्या प्रमाणात जमीन खरेदी केल्या होत्या व त्यांच्या जमिनीवर राबणारे हात मात्र अर्धपोटी उपाशी राहत होते. दरम्यान केंद्र सरकारने लँड सिलिंग अॅक्ट(१९७६) लागू केला व या कायद्याअंतर्गत श्रीरामपूर व राहुरी तालुक्यांतील जमिनी १६०० एकर जमीन या कमाल जमीन धारणा कायद्याअंतर्गत अतिरिक्त ठरविण्यात आल्या. कॉ. बावकेंनी अहमदनगर जिल्हा शेतमजूर युनियनच्या माध्यमातून या अतिरिक्त ठरलेल्या जमिनीवर राबणाऱ्या शेतमजुरांना अग्रहकाने या जमिनी देण्यात याव्यात अशी शासनाकडे मागणी केली. यामध्ये सोमय्या फार्म, एस. एच. खटोड फार्म अँड सन्स मालुंजा, चंद्रभानशेठ डाकले फार्म, देवळाली, अशी एकूण १६०० एकर जमीन होती व आजही आहे. शासनाने कोणतीही दखल न घेतल्याने कॉ. भी. रं. बावके यांच्या नेतृत्वाखाली शेतमजुरांनी १९७५ साली लाख फार्म, लाख येथील ४०० एकर जमिनीचा ताबा शेतमजुरांनी शेतीच्या सर्व अवजारांसह, गोदामासह, व कार्यालयासह घेतला.

**ऊसतोडणी कामगारांचा विजय –**

१९८० साली साखर कामगारांचा संप कॉ. बावके व कॉ. मधुकर कात्रे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी लढविला. या संपात कामगारांनी कोणत्याही साखर कारखाना क्षेत्रात न जात गावी राहूनच लढवायचा असा निर्धार केला परिणामी कारखानदारांनी शासनाच्या मदतीने कामगार नेत्यांशी चर्चा करून

कामगारांना वेतनवाढ देण्याचे मान्य केले. कॉ. बावके यांच्या नेतृत्वगुणामुळे हे शक्य झाले व संप यशस्वी होऊ शकला. कॉ. बावके हे अत्यंत धाडसी व परखड वक्ते होते.. मोडेन पण वाकणार नाही असा त्यांचा बाणा होता.

**शेती महामंडळ कामगारांचा लढा -**

शेती महामंडळातील मान्यताप्राप्त संघटना कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष करीत असल्याचे सांगून कामगारांनी अहमदनगर शेतमजूर युनियनकडे धाव घेतली व कॉ. बावके यांच्याकडे त्यांचे प्रश्न मांडले. रोजंदारीतील कामगारांना शासनाच्या किमान वेतन दराने वेतन दिले पाहिजे याकरिता आंदोलन करण्यात आले. अनेक महिन्यांच्या आंदोलन व चर्चेअंती या कामगारांना किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्याचे शासनाने मान्य केले.

**चितळी डिस्टिलरीचे शेतकऱ्यांचे आंदोलन -**

(१९७७) चितळी डिस्टिलरीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक होत होत्या. डिस्टिलरीने साठविलेल्या स्पेंटवॉश पाण्यामुळे परिसरातील सर्व विहिरींना मळीमिश्रीत पाणी येत होते, याची तक्रार घेऊन शेतकरी लोकप्रतिनिधींकडे गेले. परंतु त्याचा उपयोग झाला नाही, म्हणून कॉ. बावके यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला व नंतर उपोषण सुरू केले त्याचा योग्य तो परिणाम झाला व चितळी डिस्टिलरीच्या व्यवस्थापनाने पश्चिम विकास महामंडळाच्या प्रतिनिधींशी व शासनाशी चर्चा केली व शेतकऱ्यांच्या ३० मुलांना नोकरी दिली व शेतकऱ्यांना प्रत्येकी रु. २५०० नुकसानभरपाई दिली. ही नुकसान भरपाई पुढील १० वर्षं चालू राहील असे मान्य केले. तर न्यायालयीन निवाड्यात ग्रामपंचायतीस दरमहा रु २७००० पाणी योजनेकरिता देण्याचे मान्य केले.

कॉ. बावके यांची भूमिका व नेतृत्वाची अनेक उदाहरणे देता येतील, पण शब्दमर्यादेमुळे सर्व बाबींचा ऊहापोह येथे शक्य नाही.

**समारोप -**

त्यांच्या कार्यामुळे जवळचे नातेवाईक, आप्तेष्ट दुखावले गेले व त्याचा त्यांना वैयक्तिक जीवनात त्रासही झाला. परंतु या सर्वांवर मात करून त्यांनी आपले कार्य धीरोदात्तपणे सुरू ठेवले. सर्वसामान्य कष्टकरी कामगार, आदिवासी, दलित, भूमिहीन शेतमजूर यांच्या जीवनात सकारात्मक बदल व्हावा व त्यालाही स्वातंत्र्याच्या सत्तेत वाटा मिळावा यासाठी सतत संघर्षरत परंतु प्रसिद्धी परामुख राहिलेल्या या योद्ध्याचे वयाच्या ८२ व्या वर्षी दि. ४ ऑक्टोबर २०१४ रोजी देहावसान झाले. त्यांच्या संघर्षमय कार्यास माझा सलाम !!!

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'




**Editors**

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

तेविसावी

# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

ஐ स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

ஐ देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

ஐ **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. स्नेहल तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे ४११०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

ஐ © S.R.I.

ஐ **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ஐ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ஐ **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

ஐ ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

ஐ **पृष्ठसंख्या :** १३०

ஐ **मूल्य :** ₹ ३००/- $ 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता - शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# झोपडी

## माजी आमदार दादाभाऊ कळमकर

– प्रा. डॉ. पर्वती राजेंद्र कळमकर

श्री. दादाभाऊ कळमकर हे मूळचे पारनेर तालुक्यातील पळवे गावचे; पण शिक्षणानिमित्त नगरला आले व येथेच त्यांचे सामाजिक कर्तृत्व बहरले. त्यांचे जीवन बालपणापासून संघर्षाने भरलेले. घरची परिस्थिती बिकट, वडील डोळ्याने अधू. सन १९५२ च्या दुष्काळामुळे दुसरीत असतानाच शाळा सोडावी लागलेली. दुष्काळामुळे उदरनिर्वाहासाठी आजोळी कडूस (ता. पारनेर) येथे गेल्यानंतर तेथे गुरे सांभाळणे व शेतातील छोटी-मोठी कामेही त्यांनी केली. न कळत्या वयात परिस्थितीने मोठेपण व जबाबदाऱ्या त्यांच्यावर लादल्या. कुटुंबासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या आईला मदतीचा हात त्यांनी दिला. या काळात आईच्या कणखरपणाचा मोठा आधार त्यांना लाभला. १९५४ मध्ये मोठ्या बहिणीच्या लग्नानिमित्त कळमकर परिवारातील मोजके सदस्य इंदूरला गेले होते. तेथील लोकांकडे पाहून, नोकरी करून माणूस सुखी जीवन जगू शकतो, हे आईने हेरले. मुलांना शिकवले तर त्यांना मोलमजुरी करावी लागणार नाही, असे तिच्या लक्षात आल्याने तिने तेथून आल्यावर दादांना तातडीने पळव्याच्या शाळेत पुन्हा दाखल केले. शिकता शिकता आईला मदत करण्याचे दादांचे काम सुरू होतेच. नालाबंडिंगच्या कामावर आई खड्डे खोदायची व दादा माती वाहायचे. असा दिनक्रम सुरू असताना स्थिती पालटण्याची चिन्हे दिसण्याऐवजी दुष्काळामुळे उलट अधिक बिघडू लागली. याच काळात आजारी बहिणीच्या निधनाचे दुःख पचवताना रेशनवर पुरेसे धान्य मिळत नसल्याने, लहान भावंडांसह स्वतः अर्धपोटी राहणे, प्रसंगी सर्वांनी मिळेल ते खाऊन वेळ भागवण्यासारखे दुर्धर प्रसंग त्यांच्यावर आले. शाळा शिकत असतानाच शिक्षकांनी सवलत दिल्याने मजुरीची कामे करणे, शेतावर औत हाकणे व कोळपे धरण्याची कामेही त्यांनी चार आणे मजुरीत केली. अशाही स्थितीत चौथीच्या तालुका परीक्षेत पारनेर तालुका केंद्रात दादा तिसरे आले. याच दरम्यान वडिलांनी जमीन विकून आईच्या मदतीने गावात किराणा दुकान सुरू केल्यानंतर आर्थिक स्थिती थोडी सुधारू लागली. याच काळात कळमकर परिवाराला गावगुंडांचा त्रासही सहन करावा लागला; मात्र अशाही स्थितीत दादांनी शिरूरला माध्यमिक शिक्षण

सुरू केले. दहावीपर्यंतच्या तेथील शिक्षणानंतर सेकंडरी टीचर्स डिप्लोमा ही पदविका त्यांनी घेतली. पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी अहमदनगर कॉलेज गाठले. याच दरम्यान मिळालेली तात्पुरती सरकारी नोकरीही गेली. मात्र, शिरूरला असताना व्यापारी पेढीशी दादांचा संपर्क आल्याने स्वतःच्या उन्नतीसाठी नगरला काहीतरी व्यवसाय करण्याचे त्यांनी ठरवले होते. त्यासाठी नगर शहरात ते पायी फिरायचे. कोणता व्यावसायिक कसा व्यवसाय करतो, हे पाहायचे. शिकता शिकता लालटाकी भागातील नवभारत बोर्डिंगचे व्यवस्थापक म्हणूनही त्यांनी काम केले. मात्र, फार काळ त्यात न रमता भाजीविक्रेत्या महिलांचे कष्ट व त्यांना मिळणारे यश त्यांनी आदर्श मानून मित्राच्या मदतीने लालटाकी भागात खानावळ सुरू केली. ती तोट्यात गेली; पण त्यामुळे हबकून न जाता स्वतःच्या कष्टावर विश्वास ठेवून मोठे आव्हान स्वीकारायची तयारी केली.

सन १९६७-६८ च्या त्या काळात तलाठी असोसिएशनने सावेडी रस्त्यावर सुरू केलेले झोपडी कॅन्टीन हॉटेल हे या परिसरात फारशी वस्ती नसल्याने बंद पडले होते. धाकटा भाऊ बाळासाहेब यांना बरोबर घेऊन दादांनी ते चालवायला घेतले. स्वतः भजी, वडे, शेव व अन्य खाद्यपदार्थ ते करू लागले व स्वतःच वेटर होऊन सफाईकामेही केली. पारनेरच्या मातीतील असल्याने दादा शालेय जीवनापासून डाव्या विचारसरणीचे. बॅरिस्टर नाथ पै, जॉर्ज फर्नांडिस, श्रीपाद डांगे, कर्पुरी ठाकूर यांच्या विचारांवर त्यांची श्रद्धा. त्यामुळे लालटाकी परिसरात असताना परिसरातील छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांशी त्यांनी संपर्क वाढवला. गणपतराव शेकटकर व अन्य कार्यकर्त्यांसमवेत गणेशोत्सव व अन्य छोटी-मोठी सामाजिक कामे करता करता एकदा डॉ. नाथ पाऊलबुद्धे यांनी त्यांना बोलावून घेतले. विडी कामगारांसाठी, तसेच गरिबांसाठी काम करणारे म्हणून प्रतिमा असलेल्या डॉक्टरांबद्दल मनात आदर असल्याने दादा लगेच त्यांच्याकडे गेले व तेव्हा सुरू असलेल्या (१९७२) नवनीतभाई बार्शीकर व कमलाबाई रानडे यांच्यातील विधानसभा निवडणूक लढाईत श्रीमती रानडे यांच्या प्रचाराचे काम करण्याची डॉक्टरांनी दिलेली जबाबदारीही स्वीकारली. डाव्या विचारसरणीच्या दादांना काँग्रेसचे विचार पसंत नव्हते; पण डॉ. पाऊलबुद्धेवर श्रद्धा असल्याने त्यांनी काँग्रेसची साथ धरली व पक्षवाढीसाठी प्रयत्न सुरू केले. पुढे शहरात बार्शीकरांचा जोर असतानाही प्रतिकूल परिस्थितीत संघटनकौशल्यावर कार्यकर्ते तयार केले.

पाऊलबुद्धे यांच्या सूचनेनुसार १९७४ मध्ये नगरपालिकेची निवडणूक सावेडीतून लढवली. पैसे वाटण्याचे प्रकार व मातब्बर विरोधक असतानाही तब्बल ४५३ मते मिळवून ते नगरसेवक झाले. नगराध्यक्ष, आमदार व अर्बन बँकेचे अध्यक्ष, अशा तिहेरी भूमिकेतील बार्शीकरांच्या विरोधात काँग्रेसचे संघटन करून त्या

वेळी काँग्रेसच्या ३३ नगरसेवकांचा पक्षनेता म्हणूनही त्यांनी काम केले. या काळात विकासकामांसाठी संघर्ष करता करता संपर्क वाढवण्यावर त्यांनी भर दिला. सर्वपक्षीय मित्रपरिवाराचे जाळे त्यांनी उभे केले. याचा फायदा त्यांना आजपर्यंतच्या राजकारणात होत आहे. १९७८ मध्ये तत्कालीन नगरपालिकेत पक्षनेते असताना राज्यात शरद पवार मुख्यमंत्री होते. जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते गोविंदराव आदिक यांच्या माध्यमातून मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब त्यांचा संपर्क आला. श्री. पवारांची कामाची पद्धत व सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची वृत्ती, यामुळे त्यांच्यावर निष्ठा बसली ती आजही कायम आहे.

१९८५ मध्ये प्रा. एस. एम. आय. असीर यांच्याविरोधात विधानसभा निवडणुकीस दादा उभे राहिले. नगरसेवक म्हणून केलेले काम व त्या काळातील जनसंपर्काचा फायदा होऊन ते आमदार झाले. नगरची तेव्हाची १९७२ ची नळ योजना अपुरी पडत असल्याने बूस्टर योजना त्यांनी राबवली; मात्र तीही अपुरी पडू लागल्याने तब्बल २५ कोटींची दुसरी पाइपलाइन योजना आमदारकीच्या काळात त्यांनी प्राधान्याने पूर्णत्वास नेली. तारकपूर बस स्थानक, सावेडी बस स्थानक, तसेच नगर शहर मतदारसंघात असलेल्या आजूबाजूच्या १४ खेड्यांसाठी वाकोडी, नांदगाव शिंगवे व देहरे येथे कोल्हापूर बंधारे, विळदला पाझर तलाव, परिसरातील रस्ते, शाळांच्या इमारती, छावणी हद्दीसाठी राज्य सरकारचा निधी नसतानाही भिंगारला व्यायामशाळा, स्मशानभूमीसाठी त्यांनी निधी वापरला. आमदारकीच्या या काळात दादांनी केलेली लोकोपयोगी कामे व त्यातून त्यांचा वाढलेला लौकिक, तसेच शरद पवारांचा असलेला विश्वास ते पुन्हा आमदार झाले, तर मंत्री होतील व त्याचा स्वतःच्या राजकारणाला फटका बसेल, म्हणून १९९० च्या विधानसभा निवडणुकीत पक्षांतर्गत विरोधाचा सामना त्यांना करावा लागला, जिल्ह्यातील काही नेत्यांनी त्या वेळी त्यांच्या पराभवासाठी हातभार लावला. हा पहिला पराभव पुढेही कायम पाठ थरून राहिला. पुढच्या प्रत्येक निवडणुकीत इच्छुकांची वाढलेली संख्या, उमेदवारी न मिळाल्याने झालेली बंडखोरी व नगरमधील जातीय समीकरणाचे राजकारण यांचा फटका त्यांना बसत गेला. तब्बल चार विधानसभा निवडणुकांत अपयशाचा सामना करावा लागला. मात्र, अशा स्थितीतही त्यांनी 'पवार साहेबांवरील निष्ठे'ला सोडचिठ्ठी दिली नाही. उलट ती अधिक जोमाने कार्यरत झाली. त्यामुळेच हाती पद नसतानाही शेंडी ते विळद व विळद ते वाळुंज या बाह्यवळण रस्त्याचे काम, तसेच भुईकोट किल्ल्याच्या सुशोभीकरणाची व माळीवाडा गणपती मंदिराचा 'ड' वर्ग तीर्थक्षेत्र विकासात समावेश करण्याची कामे मार्गी लावण्यात ते अग्रेसर राहिले. दादांच्या आयुष्यावर शरद पवारांच्या विचारांचा मोठा पगडा आहे. सत्तेवर असो वा नसो,

जनतेच्या प्रश्नांशी बांधीलकी, भविष्याचा विचार करण्याची दूरदृष्टी विविध जातिधर्मांचे नेते व कार्यकर्त्यांना एकत्रित करून त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्याची भूमिका, सकाळी आठपासून रात्री बारापर्यंत न थकता काम करण्याची वृत्ती, असे मा. श्री. पवार साहेबांचे विविध गुण दादांनीही अंगीकारले आहेत. सातत्याने फिरतीवर राहून लहानमोठ्या कार्यकर्त्यांमध्ये सारख्याच तन्मयतेने रमणाऱ्या दादांचा राजकीय प्रवासही श्री. पवारांबरोबरच झाला आहे. त्यामुळेच काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपद व 'राष्ट्रवादी'चे जिल्हाध्यक्षपद भूषवताना जिल्ह्यातील मोठ्या नेत्यांना एका सूत्रात बांधण्याचे कौशल्य त्यांनी दाखवून दिले. संबंधित नेत्यांच्या तालुक्यांत राजकीय हस्तक्षेप न करता तेथील कार्यकर्त्यांना सातत्याने प्रोत्साहन त्यांनी दिले. ज्या तालुक्यांत विरोधक आहेत, तेथील पक्षकार्यकर्त्यांना नेहमी बळ देऊन त्यांची विकासकामे मार्गी लावण्यास प्राधान्य दिले. म्हणूनच त्यांचे पक्षांतर्गत नेतृत्व सर्वांनी मान्यही केले.

'झोपडी कँटीन'पासून दादांनी व्यवसायाची सुरुवात केली, त्यामुळे दादांच्या जीवनात झोपडी कँटीनला खूप महत्त्व आहे. अनंत अडचणींना तोंड देत ग्राहकांना चांगली सेवा दिल्यामुळे झोपडी कँटीन ग्राहकांच्या पसंतील उतरले. दादांच्या प्रेमळ स्वभावाने झोपडी हे नाव प्रसिद्ध झाले. आज सावेडीतील या परिसराला 'झोपडी' नावाने ओळखले जाते. दादांच्या अथक प्रयत्नातून आज झोपडीचा महाल झाला आहे; मात्र त्या परिसराला झोपडी म्हणूनच ओळखतात.

सन २००० नंतर दादा रयत शिक्षण संस्थेशी जोडले गेले. तेव्हापासून आज तागायत ते रयत शिक्षण संस्थेच्या मॅनिजिंग कॉन्सील सदस्य, उत्तर विभागीय अध्यक्ष या माध्यमातून अनेक शाळांच्या इमारती माजी विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन पूर्ण केल्या. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबविले आहेत.

**दादा कळमकर यांचा जीवनपट –**

**नाव :** दादाभाऊ दशरथ कळमकर, **जन्म :** ५ जानेवारी १९४५, **शिक्षण :** एस. वाय. बी. ए., **गाव :** पळवे (ता. पारनेर), **माजी आमदार** (१९८५ ते ९०)

**स्थापन केलेल्या संस्था :** एमआयडीसी ग्रामीण विद्यालय, नागापूर

**भूषवलेली व भूषवत असलेली पदे :** माजी जिल्हाध्यक्ष, काँग्रेस – जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

• जनरल बॉडी सदस्य, रयत शिक्षण संस्था • मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, रयत शिक्षण संस्था • सल्लागार, जिल्हा हमाल पंचायत • अध्यक्ष, भैरवनाथ विद्यालय, पळवे (ता. पारनेर) • सदस्य, राज्य रोजगार हमी योजना समिती • सदस्य, राज्य पंचायतराज समिती • अध्यक्ष, उत्तर विभाग, रयत शिक्षण संस्था, सातारा.

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'




**Editors**

**Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre**
**Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar**

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels


संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

**प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. स्नेहल तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे ४११०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

© S.R.I.

**प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

**मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

**अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

**पृष्ठसंख्या :** १३०

**मूल्य :** ₹ ३००/- $ 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य- लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ

– प्रा. डॉ. सय्यद सादिक बशीर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, कायदेपंडित, पददलितांचे उद्धारक, क्रांतिकारी व क्रियाशील विचारवंत, राजनीतिज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक यांसारख्या अनेक बिरुदावलींनी सन्मानित झालेले एक श्रेष्ठ दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते. स्वयंप्रेरणेने आणि स्वकर्तृत्वावर त्यांनी स्वत:ची व समाजाची प्रगती साधली. त्याचबरोबर त्यांनी समाजातील आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला विकासाचा मार्ग दाखविला. भारत सरकारने त्यांच्या अलैकिक कार्याबद्दल भारतरत्न या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, राजकीय कार्याबरोबरच आर्थिक विचारातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या शैक्षणिक कारर्किदीतही अर्थशास्त्रीय लिखाण केले आहे.

सामाजिक न्यायाशिवाय विकास शक्य नाही हा विचार सर्वप्रथम डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केला. स्वातंत्र्य, समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. तत्कालीन परिस्थिती पोषक नसूनही विद्वत्तेच्या बळावर संविधानाच्या माध्यामातून त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित केला. कोलंबिया विद्यापीठाने Symbol of knowledge म्हणून त्यांना गौरविले. मात्र भारतात दलितांचा नेता अशी त्यांची ओळख हे दुर्दैवच. भारतात घटनातज्ज्ञ, कायदेपंडित व समाजसुधारक म्हणून त्यांना गौरविले जात असले तरी ते एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ म्हणून दुर्लक्षिले गेले. अर्थशास्त्रातील त्यांच्या अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथापैकी उच्चांक गाठलेला Problem of Rupeehm ग्रंथ त्यांनी विद्वान अर्थतज्ज्ञांच्या श्रेणीत नेतो.

सामाजिक क्रांतीसाठी पुढाकार घेण्याआधीच्या जीवनात ते अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. अर्थशास्त्रात अनेक पदव्या संपादन करण्यासोबतच त्यांनी अर्थशास्त्राविषयी मूलभूत स्वरूपाचे लेखन केले आहे. १९१३ ला कोलंबिया विद्यापीठातून एम.ए. अर्थशास्त्राच्या पदवीसाठी प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. सेलीगमन यांच्या मार्गदर्शनाखाली Ancient Indian Commerce आणि Administration Finance of East India Company हा निबंध लिहिला.

त्याच विद्यापीठातून पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी मिळविण्यासाठी १९१७ मध्ये पीएच.डी.साठी The Evaluation of Provincial Finance in British India हा प्रबंध लिहिला. १९१७ मध्ये लिहिलेली Small Holdings in India ही पुस्तिका भारतातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या समस्येवर प्रकाश टाकते. एवढेच नव्हे तर अर्थशास्त्रात एम.एस्सी.साठी काही काळ एडवीन कॅनन आणि सिडने वेब या दोन सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांच्या सहवासात राहिले. १९१८ ते १९२० या काळात मुंबईत सिडने हॅम महाविद्यालयात राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले.

**डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार –**

**१. मिश्र अर्थव्यवस्था :** उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण व्हावेत असे आंबेडकरांचे विचार होते. संपूर्ण उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण न करता सामाजिक राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा मूलभूत व पायाभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण व्हावे व इतर सर्व उद्योगधंदे खासगी क्षेत्राकडे सोपविले पाहिजे असे त्याचे मत होते, त्यांनी विमा, बँक व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करावे असे सुचविले, कारण आर्थिक नियोजनासाठी वित्तपुरवठ्याची आवश्यकता पूर्ण व्हावी याकरिता काही वित्तीय साधने उपलब्ध झाली पाहिजेत, म्हणून त्यांनी या व्यवसायाच्या राष्ट्रीयीकरणाचे प्रतिपादन केले.

**२. लोकसंख्या नियंत्रण :** स्वतंत्र मजूर पक्ष या पक्षाची घटना, ध्येय व कार्यक्रम याबद्दलचा वृत्तांत टाइम्स ऑफ इंडियाच्या १५ ऑगस्ट १९३६ च्या अंकात बाबासाहेबांनी प्रसिद्ध केला. त्यामध्ये त्यांनी Pressure of Population (लोकसंखेचा ताण) यावर लिखाण केले. बाबासाहेबांनी देशातील बेकारीचे मूळ कारण लोकसंख्या वृद्धी हेच जाणून बेकारीवरील प्रतिबंधक उपाय म्हणून सतंती नियमनाचा पुरस्कार करण्याचे आवाहन केले होते. लोकसंख्या नियंत्रणाचा प्रस्ताव विधानसभेत आपले नेक सरदार पी. जेरोह्म यांच्या करवी १० नोव्हेंबर १९३८ रोजी मांडला. प्रस्ताव मांडून आज जवळजवळ ८४ वर्षे उलटून गेली आहेत. लोकसंख्या नियंत्रणाबाबत जाणीवपूर्वक विचार केला जात नाही. जन्मप्रमाण झपाट्याने वाढत आहे. मृत्यूप्रमाण तितक्याच वेगाने घटत आहे. त्यामुळे बेकारीचे प्रमाण अवाढव्य वाढत आहे. निकृष्ट आहार, राहण्याच्या जागेचा यक्षप्रश्न, लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कमी उत्पादन इ. ज्वलंत प्रश्न आज आपल्या समोर उभे आहेत.

**३. दारिद्र्य निर्मूलन :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दारिद्र्याबद्दल अत्यंत चिंता होती. त्यांच्या मते अनैतिकतेचे मूळ कारण दारिद्र्य आहे. १९३६ साली मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात म्हणतात की, शेतजमिनीचे झालेले तुकडे व तिच्यावर वाढत्या लोकसंखेचा ताण ही खरी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे आहेत. डॉ.

आंबेडकरांच्या मते विमा योजना ही सरकारच्या मालकीची होईल आणि ती ग्रामस्थांना निष्पक्षपणाने भाडेपट्टीने दिली जाईल. त्यामुळे कोणी कूळ किंवा भूमिहीन राहणार नाही. ग्रामीण औद्योगिकीकरणाच्या उद्देशाने तयार केलेल्या नियोजनातही ग्रामीण भागातील अस्पृश्य मजुरांची, बेकारांची संख्या वाढत आहे आणि परिणामत: त्यांना दारिद्र्याच्या भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे.

**४. शेती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार व त्याचा दृष्टिकोन आर्थिक समाजवादाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहेत. शेतजमिनीची खासगी मालकी प्रस्थापित करावी असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी कृषीच्या व्यवस्थेसंबंधीचे विचार आपल्या Small Holdings in India 1918 State of Minorities व इतर लेखनात मांडले आहेत. सामूहिक शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आंबेडकरांनी पुढील मार्ग सांगितले आहेत.

१) सरकारने शेतीचे समान प्रमाणात विभाजन करून ग्रामीण लोकांना शेती कूळ म्हणून कसण्यास द्यावी.

२) सरकारने उत्पादन वाढविण्यासाठी बी-बियाणे, खते, अवजारे इत्यादीसाठी अर्थपुरवठा करावा.

३) जमीन कुळाने दिली जात असताना सरकारने जात, धर्म इत्यादीचा विचार करू नये, तसेच श्रीमंत-गरीब असा भेद करू नये.

४) सरकारने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्यास दंडाची शिक्षा करावी.

**५. औद्योगीकरण :** शेती क्षेत्रातील बेकारी औद्योगीकरणामुळे कमी होते डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्याच बरोबर औद्योगीकरणामुळे ग्रामीण भागातील जनतेचे स्थलांतर शहरी भागात होऊन त्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होईल आणि त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये बदल होईल असे वाटत होते. डॉ. आंबेडकरांनी आर्थिक लोकशाही निर्माण करण्यासाठी आणि मागासलेल्या जनतेची आर्थिक विवंचना कमी करण्यासाठी औद्योगीकरणाला प्राधान्य दिले त्यांनी औद्योगीकरणाचा आकृतिबंध कसा असावा, त्याबद्दल त्यांनी आपले मत मांडले.

१) देशातील मूलभूत व महत्त्वाचे उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे असावेत व ते उद्योगधंदे त्यांच्या नियत्रंणाखाली चालविणे.

२) इतर उद्योगधंदे खासगी क्षेत्राकडे सोपवीत. १९५६ च्या औद्योगिक धोरणात त्यासाठी काही बदलही करण्यात आले. सरकारने महत्त्वाचे व मूलभूत उद्योगधंदे स्वत:च्या ताब्यात घेतले व कमी महत्त्वाचे उद्योगधंदे खासगी क्षेत्राकडे सोपविण्यात आले.

**६. द्रव्यविषयक विचार (मुद्रानीती) :** डॉ. आंबेडकरांनी चलनविषयक विचार त्यांनी डी.एससी. पदवी करताना लिहिलेला The Problems of the

Rupee: its origin and solution-1923 हा प्रबंध आणि त्यांनी हिल्टन यंग कमिशनपुढे दिलेली साक्ष -१९२५ यात उपलब्ध होतात. या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी भारतीय रुपयाचा अनेक अंगांनी ऊहापोह केला. इंग्लंड व भारतातील पगारदारांचे उत्पन्न व वस्तूंचे भाव यांचा आलेख देऊन त्यांनी त्यावेळी दाखवून दिले की, इंग्लंडमध्ये पगार जास्त तर भाव कमी, तर भारतात पगार कमी व वस्तूंचे भाव जास्त, त्यामुळे रुपयाची क्रयशक्ती घटत चाललेली निदर्शनास आणली. डॉ. आंबेडकरांनी सुवर्णपद्धती ऐवजी सुवर्ण चलन विनिमय दरपद्धतीचा वापर व्हावा असे मत होते. कारण जोपर्यंत रुपया स्थिर राहू शकत नाही म्हणून त्यांनी अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धतीचा पुरस्कार मर्यादित चलन निर्मितीसह सुचवले. चलनाचे बहिर्गत मूल्य कसे ठरते याबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, चलनाचा विनिमय दर चलनाच्या खरेदीशक्ती समता सिद्धांतानुसार ठरतो. चलनाची खरेदी शक्ती कमी झाल्यास चलनदर बदलतो, त्यानुसार विनिमय दर ठरतो.

**७. आर्थिक लोकशाही :** डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही म्हणजे सरकारचे असे रूप आणि पद्धत की जेथे रक्ताचा एक थेंबही न सांडता जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणले जातात त्यांच्या मते आर्थिक आणि सामाजिक लोकशाही या लोकशाहीच्या रक्तवाहिन्या आहेत. त्यामुळे आर्थिक व सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही यशस्वी ठरू शकत नाही.

**समारोप –**

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रीय विचार अत्यंत अभ्यासपूर्ण व सैद्धांतिकदृष्ट्या मांडले आहेत. त्यांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार, कृषीविषयक दृष्टिकोन, उद्योगांचे राष्ट्रीयीकरण यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. तसेच चलनविषयक विचारामधून उत्कट देशभक्ती दिसून येते. त्याचप्रमाणे सार्वजनिक आयव्यय, करविषयक पुरोगामी विचारसरणी व कामगार चळवळीतील त्यांच्या योगदानावरून ते तोलामोलाचे अर्थशास्त्र होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ सूची –**

१. Ambedkar B.R. Problem of the Rupee- Its Origin and Its Solution,1923 P.S. King and Son,Ltd.

२. Verinder Grover (Editor), B.R. -mbedkar, - Biography of his Vision and Ideas, Deep Deep Publisher, New Delhi, 1998.

३. डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. आंबेडकर – आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, १९९२, ग्रंथाली प्रकाशन मुंबई.

☙☙

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'




**Editors**

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- **$ 4**

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता - शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत - बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक - श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान - एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार- समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल - राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# तो प्रवास सुंदर होता...

– प्रा. डॉ. बाळासाहेब गणपत तुपे

'इस्रो' मध्ये मी विक्रम साराभाई यांच्याबरोबर काम करत असतानाची ही गोष्ट आहे. इस्रोत एक अभियंता भरती करायचा होता. त्याचे नावही निश्चित झाले होते. त्यावेळचे प्रकल्प संचालक एच. जी. एस मूर्ती यांनी थुंबामधील केंद्रासाठी ईश्वर दास यांच्या नावाची शिफारस केली होती. दुसऱ्याही एका व्यक्तीची मुलाखत झाली होती, परंतु त्यांची निवड झाली नव्हती. यादरम्यान 'नासा'च्या एका कार्यक्रमाकरिता मी साराभाईंसोबत अमेरिकेत गेलेलो असताना इस्रोतील नियुक्त्यांबाबत आम्ही चर्चा करत होतो. त्यावेळी अभियंत्याचे एक पद रिक्त असताना आणखीही एका व्यक्तीचा विचार करावा, असे साराभाई यांनी मला सांगितले. ती जबाबदारी त्यांनी माझ्यावरच टाकली. मी बायोडेटा पाहिला. त्यात उणीव अशी काहीच नव्हती. ओझरती नजर फिरवताच मी साराभाईंना म्हटले, ''हा मुलगा चांगले काम करील याविषयी मला जराही शंका नाही.'' या मुलाने पुढे इस्रोत इतके चांगले काम केले, की मला रत्नपारखी असल्याचा आनंद झाला. तो मुलगा होता – एपीजे अब्दुल कलाम. कलाम इस्रोमध्ये दाखल झाले. त्यानंतर भारतीय वैज्ञानिकांचे एक पथक नासाच्या वॉलॉप बेटावरील उड्डाण केंद्रास भेट देण्यासाठी गेले होते. तेव्हा वाशिंग्टनहून वॉलॉपला जाताना माझी कलाम यांच्याशी पहिली भेट झाली. नंतर आमच्यातला स्नेह वाढत गेला. कलाम इस्रोत येण्याआधी डॉ. वसंतराव गोवारीकरांना अग्निबाणाच्या इंधनावर बरेच काम केले होते. पण अग्निबाण तयार करून प्रत्यक्ष उपग्रह सोडण्याचा टप्पा तेव्हा आपण गाठला नव्हता.

तो खरेच एक मंतरलेला काळ होता. इस्रोत तेव्हा सतीश धवन, मी, गोवारीकर, कलाम असे सर्वजण आत्मीयतेने काम करत होतो. मी व साराभाई अनेकदा अहमदाबादहून त्रिवेंद्रमला जात असू तेव्हा कलाम तिथे काम करत होते. त्यांनी तिथे अनेक नवी कामे केलेली असत. त्यांचा कामाचा झपाटा अफाट होता. प्रवासात साराभाई गमतीने मला म्हणत, 'आता तिकडे गेल्यावर फटाके फुटणार.' म्हणजे आणखी वेगळे प्रयोग पाहायला मिळणार. त्यावेळी आम्ही त्यांना गमतीने 'बिझी बी' म्हणत असू. कलाम यांच्याकडे तेव्हा एसएलव्ही-

सॅटलाईट लाँच व्हेइकल (उपग्रह प्रेक्षक) तयार करण्याची कामगिरी सोपवली गेली होती. जपानच्या सहकार्याने उभारला गेलेला तो प्रकल्प होता. पण कलामांनी नंतर त्याला स्वदेशी रूप दिले. त्यांनी एसएलव्हीचे नोज कोन कार्बनी धाग्यांचा बनवला. तो हलका व व्यस्त होता. त्या काळात आधुनिक व स्वदेशी तंत्रज्ञानाकडे झुकणार होते. १९७९ मध्ये एसएलव्हीचे पहिले उड्डाण झाले. अग्निबाण झेपावला, पण दुर्दैवाने तो लक्ष्य न गाठताच कोसळला. प्रकल्पाचे प्रमुख असलेल्या कलाम यांना वाईट वाटले हे आम्हाला दिसतच होते. पण त्यांनी तो अग्निबाण का कोसळला, याची कारणे शोधली. परंतु अग्निबाण पडला तेव्हा इस्रोचे प्रमुख सतीश धवन यांनी कलाम यांना सांगितले की, 'तुम्ही पत्रकारांना सामोरे जाऊ नका. मी काय ते बघतो.' त्यानंतर पुन्हा कलाम उमेदीने कामाला लागले आणि १८ जुलै १९८० रोजी त्यांनी एसएलव्हीच्या साहाय्याने रोहिणी उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले. त्यावेळी पंतप्रधान इंदिरा गांधी जातीने उपस्थित होत्या. या यशानंतर इस्रोचे संचालक सतीश धवन यांनी ''कलाम, आता तुम्ही पुढे व्हा अन् पत्रकारांना सामोरे जा,'' असे सांगितले होते. अशी इस्रोची संस्कृती होती. आजही आहे. कलाम यांच्या जडणघडणीत इस्रो, साराभाई, धवन यांचा मोठा वाटा आहे. झपाटलेपणाने काम करण्याची शिकवण त्यांना तिथे मिळाली. एसएलव्हीचे यश आणि कलामांचे नाव तोपर्यंत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कानावर गेले होते. त्यांनी लगेच एक आदेशाद्वारे 'कलाम आम्हाला संरक्षण संशोधन व विकास संस्थेत (डीआरडीओ) हवे आहेत,' असे संगेतले. खरे तर कलामांची आम्हालाही गरज होती. पण आम्ही त्यांना इस्रोतून डीआरडीओत जाऊ दिले. दहाएक वर्षे त्यांना इस्रोत काम केले. देशासाठी समर्पण वृत्तीने काम करणाऱ्या कलाम यांनी इस्रोची कार्यसंस्कृती सर्वस्वान अंगीकारली होती. इस्रोमध्ये वरिष्ठांची चूक कनिष्ठही दाखवू शकत असे. यश मिळाले तरी हलकासा जल्लोष. यशाचेही परीक्षण आणि अपयशाचे तर त्याहून कठोर परीक्षण ही इस्रोची संस्कृती आहे. म्हणूनच आज आपण अग्नी, पृथ्वी यांसारखी क्षेपणास्त्रे तयार करू शकलो आहोत. एकदा असाच एका कार्यक्रमाला गेलो असताना कलाम भेटले. त्यांनी एका तरुणीशी माझी गाठ घालून दिली. 'हा फार हुशार मुलगा आहे. पुढे नक्कीच चांगली कामगिरी करेल', असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पुढे हा तरुण डीआरडीओचा संचालक झाला. कलाम माणसे पारखण्यात पारंगत होते. त्यांची राहणी साधी होती. लहान मुलांसारखे ते निरागस होते. त्यांना संगीताची खूप आवड होती. ते वीणा वाजवीत असत.

गुणग्राहकता हा त्यांचा विशेष गुण. कुणी काही नवे केले की लगेच ते त्याचे कौतुक करायचे. राष्ट्रपती झाल्यानंतर त्यांनी मला सहकुटुंब दिल्लीला बोलावले

होते. तेव्हा त्यांनी पॅरिसमध्ये काम करणाऱ्या माझ्या मुलाकडून तो मलेरियावर करत असलेल्या संशोधनाची सद्यंत माहिती विचारून घेतली. राष्ट्रपती भवनात ते माझ्या नातीसोबत लहान होऊन खेळले. माझ्याशी त्यांचा कायम स्नेह होता. त्यांच्या बोलण्यात जी आपुलकी जाणवे, त्याने आपण भाराहून जात असू. ते लोकांचे राष्ट्रपती ठरले. अगदी खेड्यापाड्यातील लोकांनाही त्यांची महती कळली होती. भारत-अमेरिका यांच्यात तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी अणुकरार केला, तेव्हा अनेक राजकीय नेत्यांना या कराराला पाठिंबा द्यायचा की नाही, हे ठरवता येत नव्हते. समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंग यादव यांनी कलाम यांची भेट घेतली व त्यांना अणुकरार ही नेमकी काय भानगड आहे, ते विचारले. कलामांनी त्यांना सगळी माहिती दिली व या करारास पाठिंबा द्या, असे सांगितले. त्यावर मुलायामसिंगांनी एकही प्रतिप्रश्न न करता त्यांच्यावर विश्वास ठेऊन अणुकरारास पाठिंबा दिला.

आज आपल्याला 'मेक इन इंडिया'चे महत्त्व पटले असले तरी त्यांना ते कधीच पटले होते. विज्ञान संशोधनात देशाच्या स्वयंपूर्णतेसाठी नवप्रवर्तनावर त्यांनी भर दिला. जयपूर फूटने अनेकांचे आयुष्य बदलून टाकले. जयपूर फूटच्या आधी परदेशातून कृत्रिम पाय मागवले जात. पण मॅगेसेसे पुरस्कार विजेते सामाजिक कार्यकर्ते पी. के. सेठी यांनी स्वदेशी बनावटीचा जयपूर फूट बनवला. परदेशी मापाच्या पायात भरतीय पाय बसवणे चुकीचे होते. त्यामुळे त्रास होत असे. ते वजनाने जड होते. कलाम यांनी उपग्रह वा अवकाशयानात वापरल्या जाणाऱ्या धातूसमिश्रांपासून हे पाय बनवायला सांगितले आणि ते हलके झाले. असंख्य गरजूंना त्यांचा उपयोग झाला. अशाच तऱ्हेने त्यांनी कुबड्याही हलक्या केल्या. रोजच्या व्यवहारात अवकाश तंत्रज्ञानाचे पूरक उपयोग करण्याची अमेरिकी परंपरा कलामांनी भारतात सुरू केली. त्यांनी हृदयासाठी लागणारे स्टेंटही कमी खर्चात तयार होतील असे बनवले. याकामी त्यांनी डीआरडीओतील त्यांच्या ज्ञानाची व प्रयोगाची शिदोरी पणाला लावली. 'विद्यार्थ्यांना प्रश्न विचारू द्या, त्यांना शिक्षणाची हवी ती शाखा निवडू द्या,' असे कलाम सांगत असत. कारण आपल्याला ज्याची आवड आहे, ज्या कामाने समाधान मिळते, त्यातच माणसाची प्रगती होते. कलाम यांचे शिक्षण 'एमआयटी'मध्ये- 'मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' या संस्थेत झाले होते. काहीजणांना चुकून ते अमेरिकेतील एमआयटीत शिकले होते असे वाटते, पण ते खरे नाही. त्यांचे सगळे शिक्षण भारतातच झाले. त्यांना परदेशातून अनेक मानाची पदे मिळाली असती; पण ते गेले नाहीत. यामागे त्यांचा स्वदेशीचा जाज्वल्य अभिमान होता. कलामांनी पराभूत मानसिकता काही प्रमाणात कमी केली असे मी म्हणेन. त्यांनी नव्या प्रयोगांना प्रोत्साहन दिले.

भारताला महाशक्ती बनविण्याचे स्वप्न पहिले. त्यासाठी त्यांनी युवकांचे प्रेरणास्थान म्हणून काम केले. त्याच्यात एक प्रचंड ऊर्जा सळसळत असे.

प्रगतशील भारत घडविण्याची त्यांना आस होती. विज्ञान क्षेत्रात असूनही वलयांकित होण्याचे भाग्य त्यांना लाभले. देवदुर्लभ असे लोकांचे प्रेम मिळाले. त्यांची इस्रोत जी निवड झाली त्याचे त्यांनी चीज केले. कलामांच्या निधनाने एक सच्चा मित्र, तत्त्वज्ञ, मार्गदर्शक आपल्याला अर्ध्या वाटेवर सोडून अनंताच्या प्रवासाला निघून गेला आहे.

ഴഴ

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



Editors


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती** : १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ** : स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या** : १३०

- **मूल्य :** ₹ ३००/–
  **S 4**

## अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य- लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य

– प्रा. डॉ. पौर्णिमा सचिन गुजर

मॅकडॉनाल्ड्जचे नाव ऐकताच युवा पिढीपासून ते अगदी वयस्कर लोकांच्यासुद्धा तोंडाला पाणी सुटले नाही तर नवलच. असे हे साम्राज्य सुरू कसे झाले आणि या उंचीवर कसे पोहचले ही कथा खरोखरच खूप रंजक आहे. मॅकडॉनाल्ड्जची रेस्टॉरंटस भारतात येताक्षणीच कॉलेजच्या मुलामुलींच्या झुंडीच्या झुंडी तिकडे वळायला लागल्या. 'टाइमपास'चे एक झकास ठिकाण या कारणाने शेकडो तरुण मंडळी मॅकडॉनाल्ड्जच्या आत–बाहेर पहुडलेली दिसतात. मॅकडॉनाल्ड्ज हे एका तऱ्हेने अमेरिकन संस्कृतीच प्रतीकच आणि यामुळेच तिथे गेल्यावर उगाचच अमेरिकेत वावरल्याचा आनंद क्षणभर का होईना मिळतो आणि ही एक सुप्त इच्छा असावी आणि तसे वाटणेही साहजिकच! कारण दरवाज्यातून आत शिरल्यापासून तिथल्या खुर्च्या, टेबले कशी असावीत, तिथे काऊन्टर कसे असावेत, मेनू कुठला असावा आणि तो कसा दाखवावा, पदार्थ कसे तयार करावेत याविषयीचे त्यांचे नियम सर्वसाधारणतः जगभर सारखेच असतात. या मॅकडॉनाल्ड्जची गेल्या शतकाअखेर जगभर १२० देशांत मिळून २० हजारच्या वर रेस्टॉरंट्स होती. अमेरिकेतच त्यातली १२ हजारच्या वर होती. त्यांची विक्री सवाचौदा बिलियन डॉलर्स म्हणजे ६६५०० कोटी रुपये आणि नफा साधारणपणे दोन बिलियन डॉलर्स म्हणजे साधारणपणे ९३०० कोटी रुपये एवढा होता. थोडे थिडके नाही, सव्वातीन लाख तर कर्मचारीच होते.

हे एवढे सगळे उभे राहिले तरी कसे? या सगळ्या साम्राज्याचे जनक रिचर्ड आणि मॉरिस मॅकडॉनाल्ड यांची पार्श्वभूमी तशी अगदी बेताचीच! डिक आणि मॅक अशी त्यांची टोपण नावे. त्यांचा जन्म १९१० च्या सुमारास न्यू हॅम्प्शायरमध्ये एका आर्थिकदृष्ट्या सामान्य अशा कुटुंबात झाला. त्यांचे वडील एका बुटांच्या कारखान्यात फोरमन म्हणून काम करायचे, पण १९२९ च्या आर्थिक मंदीत त्यांची नोकरी गेली.

सगळ्या आशा मावळल्या होत्या. आपले नाव आता जगात काय, पण आपल्या गल्लीतही प्रसिद्ध होणार नाही याची खात्री पटलेली असतानाच पूर्ण कफल्लक अवस्थेत त्यांनी १९३७ साली कॅलिफोर्नियातल्या 'पासाडोना' या ठिकाणी

हॉट डॉग विकण्यासाठी एक स्टँड काढला. आपल्याकडच्या पावभाजीच्या गाडीसारखाच तो एक आटोपशीर प्रकार होता. पण त्यातही ते स्वच्छता अगदी कटाक्षाने पाळीत. त्यांच्याकडच्या पदार्थांची चव एवढी छान असे की, त्या ठेल्यासमोर प्रचंड गर्दी जमू लागली. मग त्यांनी कॅलिफोर्नियातच सॅन ब्रानाडीनो येथे 'मॅकडॉनाल्डज हॅमबर्गर' नावाचे एक फास्टफूड उपाहारगृह काढले. ही खरीखुरी मॅकडॉनाल्डजची ६०० चौरस फुटांतून केलेली पहिली वहिली सुरुवात. यात फास्टफूडला काहीच अर्थ नव्हता. कारण हे उपाहारगृह इतके लोकप्रिय झाले की लोक तिथे खायला मिळावे म्हणून तासन्तास रांगेत उभेही राहत. एकदा ऑर्डर दिल्यानंतर मात्र अगदी झटपट पदार्थ त्या काऊन्टर वर उभे असतानाच मिळत.

त्यांच्या यशाचे कारण एका वाक्यात सांगायचे तर 'कीप इट सिम्पल स्टुपिड (किस)' असे सांगता येईल. मेनूत जेमतेम ८-१० पदार्थ ठेवायचे आणि ते बनवण्याची प्रक्रिया अगदी पद्धतशीरपणे लिहूनच काढायची. एवढेच नाही तर ती तंतोतंत पाळायची. पोटॅटो चिप्स किंवा फ्रेंच फ्राइज हे करायचे असतील तर बटाटे कसे वापरायचे, ते कुठल्या हवेत ठेवायचे, नंतर ते कसे एका ठिकाणाहून दुसरीकडे न्यायचे, ते किती वेळ कसे तळायचे, त्यांचा रंग तो ठरावीक सोनेरी कसा आणायचा, ते कसे कापायचे, ते कसे वाढायचे इत्यादी सर्व गोष्टी अगदी तंतोतंत पाळायच्या असा त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे मॅकडॉनाल्डजमध्ये त्याच पदार्थाची वेगळी चव मिळणेच अशक्य. 'आज जरा ज्यादा फ्राय करके दो' किंवा 'थोडा तीखा बनाओ' वगैरे फर्माईशी तिथे चालणारच नाहीत. अजूनही मॅकडॉनाल्डजचा मेनू आणि पूर्वीच्या प्रक्रिया जवळपास तशाच पाळल्या जातात. मॅकडॉनाल्डजमध्ये जो बर्गर मिळतो त्यातली हॅमबर्गरची पट्टी ही शंभर टके मांसाची असते. त्यात चरबीचे प्रमाण १९ टके असते. एका पौंडात दहाच पट्ट्या बनविल्या जातात. त्या बर्गरच वजन १.६ औंसच असत. त्याचा व्यास ३.८७५ इंच एवढाच असतो वगैरे. पुढे 'बिग मॅक' नावाचा एक प्रकार त्यांनी चालू केला. त्यात बन पावावर तीळ लावलेले असत. ते दर पावावर १७८ च असावेत असाही नियम आहे. इतका बारकावा आणि त्यातूनच मिळाले आज आपल्याला दिसणार भरघोस यश. थोडक्यात म्हणजे मॅकडॉनाल्डज बंधू म्हणजे खाद्यपदार्थातले फोर्ड होते. 'मास प्रोडक्शन'चेच तत्त्व इथे पण वापरल होते. एकाने ऑर्डर घ्यायची, दुसऱ्याने पावाला लोणी लावायचे, तिसऱ्याने मांस टाकायचे, चौथ्याने ते पावात घालायचं....इ. यामुळे पदार्थ एकसारखे तर होतातच पण गिऱ्हाईक बिल चुकते करेपर्यंत त्याच्या हातात पदार्थ तयार असतो. आपल्याकडच्या फास्टफूड उपहारगृहात दहा मिनिटांनी वेटर टेबलापाशी ऑर्डर

घ्यायला येतो तसे नाही.

मॅकडॉनाल्डज मंडळींनी बऱ्याच नवनव्या गोष्टी केल्या. 'आमचे १० लाख बर्गर्स आतापर्यंत खपले आहेत' अशा जाहिरातीच्या पाट्या त्यांनी मोठ्या दिमाखात १९५० पासूनच लावायला सुरुवात केली. (जी पद्धत आजतागायत चालू आहे!) त्यांनीच मॅकडॉनाल्डजच्या शाखा फ्रँचायझी तत्त्वावर द्यायला सुरुवात केली. यामध्ये प्रत्यक्ष शाखा मात्र दुसराच चालवतो. खर्चही त्याचाच. मॅकडॉनाल्डज मंडळी फक्त आपले नाव त्याला वापरायला देणार, तो आपल्यासारखीच प्रक्रिया पाळतोय की नाही ते बघणार आणि त्यासाठी पैसे आकारणार. आज ॲपटेक आणि बऱ्याच कंपन्यांच्या जशा फ्रँचायझी शाखा निघतात तोच हा प्रकार! १९५२ साली फिनिक्स येथे त्यांनी अशीच एक फ्रँचायझी काढली. त्याच साली 'अमेरिकन रेस्टॉरंट' या मासिकात त्यांची स्टोरी प्रकाशित झाली आणि मॅकडॉनाल्डज नावारूपाला आले. त्या वेळी त्यांची विक्री साडेतीन लाख डॉलर्स होती आणि त्यांना एक लाख डॉलर्सचा नफा मिळत होता.

त्याच सुमारास रेमंड क्रॉक या माणसाचा या नाट्यात प्रवेश झाला. रेमंड क्रॉक हा मिल्क शेक बनविण्याची यंत्रे तयार करत असे. एके दिवशी मॅकडॉनाल्डजकडून अशा आठ यंत्रांची मागणी आली. ही एवढी आठ यंत्रे घेऊन हे लोक काय करणार आहेत या कुतूहलाने त्याने चक्क विमानाने जाऊन मॅकडॉनाल्डजच्या उपहारगृहाला भेट देण्याचे ठरवले आणि ती ऐतिहासिक भेट ठरली. त्या उपहारगृहातील स्वच्छता, त्यांची पदार्थ बनविण्याची, उपहारगृह चालविण्याची पद्धत बघून तो चाटच पडला. अशा तऱ्हेची फ्रँचायझीज खूप मोठ्या प्रमाणावर देशभर काढावीत असे त्याच्या सुपीक डोक्यात आले. रेमंड क्रॉकने मॅकडॉनाल्डज विकत घ्यायचे ठरविले होते. त्याने मॅकडॉनाल्डज बंधूंना किंमत विचारली. त्यांनी सांगितलेली किंमत ऐकून क्रॉक गार पडला. त्यांनी ती किंमत २७ लाख डॉलर्स अशी सांगितली होती. क्रॉक खूपच संतापला. बोलणी फिसकटली.

पण क्रॉकला मॅकडॉनाल्डजच्या उपाहारगृहाच्या अमेरिकाभर पसरलेल्या शाखांतून खूप पैसा मिळेल हे नक्की दिसत होते. पण २७ लाख डॉलर्स आणणार कुठून? या वेळी त्याच्या मदतीला धावला हॅरी सॉनेबॉन. हा मॅकडॉनाल्डजमध्येच व्यवस्थापक म्हणून काम करी. क्रॉकला मूलबाळ नसल्यामुळे तो हॅरीलाच स्वतःचा मुलगा समजे. हॅरी पैशाच्या बाबतीत चाणाक्ष होता. त्याने एक नवीन युक्ती काढली. 'फ्रँचायझी रियालिटी कॉर्पोरेशन' नावाची कंपनी काढली. वेगवेगळ्या शहरातल्या मोक्याच्या जागा विकत घेऊन भाड्याने/लीजवर देणे हा या कंपनीचा उद्योग. यातून पैसे मिळवून मग त्यांनी मॅकडॉनाल्डज कंपनी २७ लाख डॉलर्सला

विकतही घेतली. रियालिटी कॉर्पोरेशन कम्पनीचा आणखीही एक मोठा फायदा त्यांना झाला. ज्यांना त्यांना मॅकडॉनाल्डजची शाखा फ्रँचायझी तत्त्वावर चालवायला द्यायची असेल, अशा कम्पनीला लीजवर जागा हवीच असायची, त्यामुळे त्या फ्रँचायझीला जागेसाठी एकदम पैसे मोजावे लागू नयेत ही यामागची कल्पना. यामुळे मॅकडॉनाल्डजचीही मालमत्ता वाढत राहिली, भाडेही चांगले मजबूत मिळत राहिले आणि फ्रँचायझीमधून येणारा नफा वेगळाच!

यामुळे मग फ्रांचायझीवरही भराभर उड्या पडायला लागल्या. १९६५ साली कंपनीचे शेअर्स बाजारात आले. त्या वेळा त्यांच्या एक हजार शाखा होत्या. १९७१ साली त्या दोन हजार झाल्या तर १९८४ साली रेमंड क्रॉकचा मृत्यू झाला तेव्हा त्या आठ हजार होत्या. आज त्या २५ हजार आहेत. आज मेनूही थोडासा वाढलाय, पण स्वच्छता मात्र तशीच. मॅकडॉनाल्डजच्या फ्रँचायझीच्या शाखेत एक माशी सापडली म्हणून त्याचे लायसन्स काढून घेतले अशा तऱ्हेच्या दंतकथाही प्रसिद्ध आहेत. या स्वच्छतेचे मूळ हे स्वतः मॅक बंधू आणि रे क्रॉक यांच्यात सापडत. असे म्हणतात की, क्रॉक एखाद्या मॅकडॉनाल्डजच्या उपहारगृहात जाई तेव्हा हातात झाडू घेऊन पार्किंगजवळची जागा स्वतःही साफ करायला मागे पुढे पाहत नसे. हातात टूथब्रश घेऊन मॅनेजरला न दिसलेला सिंकमधला कणही त्याने साफ केल्याच्या कहाण्या सांगितल्या जातात.

मॅकडॉनाल्डज मात्र २७ लाख डॉलर्स घेऊन संतुष्ट होते. ते पैशाच्या मागे नव्हते. फ्रँचायझी ही संकल्पना जगात पुढे आणून ही त्यांची मॅनेजमेंटला एक देणगीच होती. बिल ब्रायसन या प्रसिद्ध लेखकाने त्यांची राइट बंधूंशी तुलना केली आहे. दोन्ही जोड्यांनी लग्न केले नाही, दोन्ही जोड्या आपापल्या घरात एकत्र राहत, दोघांना संपत्तीचा लोभ नव्हता.

दोन्ही जोड्यांना कुठल्याही गोष्टीत परफेक्शनचा, परिपूर्णतेचा ध्यास होता.

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



Editors

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre
Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels


संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/–
  S 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्‌जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी

– डॉ. बापुसाहेब गोरख घोडके

झुंजार आंदोलनकर्ता, शेतीतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, योद्धा शेतकरी अशा वेगवेगळ्या शब्दांत शरद जोशी यांच्या विचार, कार्य, कर्तृत्वाचे अनेकांनी मूल्यमापन केले आहे. कारण शरद जोशी यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू व बहुआयामी आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांच्या विचार व कार्याची नोंद ग्रामीण भागातील, वाडीवस्तीवरील, डोंगरदऱ्यांतील, उपेक्षित, वंचित शेतकऱ्यांना सर्वप्रथम संघटित करणारा, त्यांच्यात आत्मविश्वास व स्वाभिमान जागृत करणारा अभ्यासू व विद्वान शेतकरी नेता प्रामुख्याने अशी त्यांची ओळख करता येईल. अभ्यास आणि त्याला कृतीची जोड देणाऱ्या अपवादात्मक नेत्यांमध्ये शरद जोशी यांचे नाव अग्रस्थानावर येते.

अशा या महान शेतकरी नेत्याचा जन्म सातारा जिल्ह्यात ३ सप्टेंबर १९३५ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव 'आनंद' तर आईचे नाव 'इंदिरा' असे होते. त्यांचे शालेय शिक्षण व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण विविध ठिकाणी झाली. त्यांचे शालेय शिक्षण बेळगाव, नाशिक येथे झाले. त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण बी.कॉम व एम.कॉम सिडन हॅम महाविद्यालय मुंबई येथे पूर्ण केले. बँकिंग विषयासाठी सुवर्णपदक त्यांना मिळाले. त्यांनी काही काळ कॉमर्स कॉलेज कोल्हापूर येथे अर्थशास्त्र व संख्याशास्त्र विषयांचे व्याख्याता म्हणून अध्यापनाचे काम केले.

सन १९५८ मध्ये भारतीय टपाल खात्यामध्ये प्रथम वर्ग अधिकारी म्हणून त्यांची निवड झाली. त्या ठिकाणी त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची व कार्याची छाप पाडली. भारताच्या पिनकोड यंत्रणेच्या पायाभरणी व विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. त्यानंतर 'स्विझर्लंड' या देशाच्या पोस्ट खात्यात १९६८ ते १९७७ या कालावधी त्यांनी अधिकारी म्हणून चांगल्या प्रकारे कार्य केले. तेथे असतानाच जिनीव्हा शहरांमध्ये भरलेल्या शेतकरी प्रश्नावर काम करणाऱ्या शिबिरामध्ये सहभागी झाले. तेथे अनेक तज्ज्ञ व्यक्तींची भाषणे ऐकल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, जागतिक पातळीवर थोड्याफार फरकाने प्रत्येक देशात शेतकऱ्यांचे शोषण होत आहे. शरद जोशी यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. भारतात व महाराष्ट्रात

परत आले. पुण्याजवळ आंबेठाणला काही जमीन विकत घेतली. एका सर्वसामान्य शेतकऱ्याप्रमाणे सुरुवातीच्या काळात शेती केली. त्यांनी स्वअनुभवातून शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेतले. शेतीचे व शेतकऱ्यांचे प्रश्न व शासकीय ध्येयधोरणे याविषयी त्यांनी चिकित्सा केली. शेतीमध्ये त्यांनी अनेक प्रयोग केले. शेतकऱ्यांच्या शोषण व दारिद्र्याच्या समस्येचा शोध घेण्यासाठी स्वतः जमीन विकत घेऊन शेती केली. एका दाण्याचे हजार दाणे करणारा शेतकरी दारिद्र्यात का राहतो? या प्रश्नावर त्यांनी विचारमंथन केले. शेती व शेतकऱ्यांची कशा प्रकारे शोषण, पिळवणूक केली, याविषयी त्यांनी संशोधन केले.

'यः क्रियावान् स पंडितः' हे संस्कृत वचन शरद जोशी यांना चपखल लागू पडते. ते पंडित तर होतेच, पण सक्रिय क्रियावान पंडित होते. त्यांची करुणा वांझोटी नव्हती. शरद जोशी यांचा मोठेपणा त्यांच्या विचार व कार्यात आहे, कारण त्यांनी देशातील व महाराष्ट्रातील अशिक्षित, निरक्षर, अडाणी शेतकऱ्याला अर्थसाक्षर केले. जागतीकरण, उदारीकरण, खुली अर्थव्यवस्था याचा त्यांनी स्वीकार केला. शेतकरी उत्पादन खर्च काढू लागला. सरकारच्या योजनांची चिकित्सा करू लागला. तो शेतकरी शरद जोशी यांच्या विचाराने व कार्याने प्रभावित झाला होता.

आपल्या कार्याला चळवळीचे व संघटनेचे स्वरूप देण्यासाठी ९ ऑगस्ट १९७९ रोजी 'चाकण' येथे शेतकरी संघटनेची स्थापना करून कार्यालय सुरू केले. त्यांनी आपल्या संघटनेत अभ्यासू कार्यकर्ते तयार केले. शरद जोशी यांचे योगदान काय? त्यांच्या आंदोलनाने शेतकऱ्यांना किती रुपयांचा भाव वाढून मिळाला? असे आकडेवारीत त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करता येणार नाही. त्यांनी कोणत्या, परिस्थितीत कोणत्या काळात काम केले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना संघटित केले. त्यांना आत्मविश्वास व स्वाभिमान दिला. सत्तेविरुद्ध उभे राहून आंदोलन करण्याचे बळ दिले. शेतकरी हा देशाच्या विविध प्रांतात, जाती-धर्म, पक्ष मध्ये विभागला गेला होता. त्यांना संघटित करणे ही बाब सोपी नव्हती. परंतु ती किमया शरद जोशी यांनी साधली. शेतकरी संघटित होऊ शकतो आणि तो दबाव गट तयार करू शकतो ही गोष्टच अविश्वसनीय होती.

भारतात व महाराष्ट्रात शेतकऱ्यांमध्ये जी जनजागृती झाली आहे. त्याला शरद जोशी यांचे विचार कार्य कारणीभूत असल्याचे दिसून येते. शेतकरी संघटनेचे महाराष्ट्रभर जाळे उभे केले. शेतमालाला योग्य भाव मिळावा म्हणून मोर्चे काढले. रस्ता रोको केला. शेतकरी आंदोलन करताना तुरुंगात गेले. 'गुलामाला फक्त गुलामगिरीची जाणीव करून द्या तो पेटून उठेल' हे विधान शरद जोशी यांनी कृतीने खरी करून दाखविले. शरद जोशी यांच्या विचार व कार्यात 'भीक नको;

हवे घामाचे दाम व जास्त नको पण रास्त दर विविध पिकांना मिळाला पाहिजे अशी बुलंद घोषणा त्यांनी दिली. शरद जोशी यांनी महाराष्ट्राला जातीनिरपेक्ष संघटन करण्यात एक आदर्श मॉडेल घालून दिला.

सर्वप्रथम स्वातंत्र्याच्या आंदोलनात महिलांनी मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग घेतला होता. त्यानंतर सर्वांत जास्त महिला शेतकरी आंदोलनात सहभागी झाल्या. ९ व १० डिसेंबर १९८६ रोजी चांदवड जिल्हा नाशिक येथे अभूतपूर्व शेतकरी महिला अधिवेशन भरविले. या अधिवेशनात सुमारे दोन लक्ष महिलांची उपस्थिती होती. आजपर्यंत स्त्रियांच्या गुलामगिरीची कारणे धर्मात, जातिव्यवस्थेत आणि तिच्या शारीरिक दुर्बलतेत शोधली जात होती. परंतु शरद जोशी यांनी सर्वप्रथम महिलांच्या शोषणाची मुळे ही शेतीत होणाऱ्या शोषणात दडली आहेत, हा नवा सिद्धांत समाजासमोर मांडला. लक्ष्मीमुक्त अभियानाद्वारे स्त्रियांच्या नावे शेती करण्याचे आवाहन पुरुष शेतकऱ्यांना केले. त्यामुळे १९९१ पर्यंत लाखावर स्त्रियांची नावे जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नोंदविली गेली. महिलांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी, यासाठी शेतकरी महिला आघाडीची स्थापना केली.

१९९१ रोजी आपल्या देशाने जागतीकरण, उदारीकरण, खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले. त्यामुळे विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. याचे मोठ्या मनाने शरद जोशी यांनी स्वागत केले. परंतु त्यासाठी त्यांना मोठा सामाजिक व राजकीय विरोध सहन करावा लागला. शेतीच्या प्रश्नावर समाजाचे उद्बोधन आणि प्रबोधन करण्यासाठी १९७७ पासून वर्तमानपत्रांत लेखन केले. ९ ऑगस्ट १९७९ रोजी चाकण येथे शेतकरी संघटनेची स्थापना केली. शेतमालाला रास्त भाव या एकक कमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, कापूस, भात व दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे महाराष्ट्रभर नेतृत्व केले. त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. त्यासाठी वारंवार उपोषणे, आंदोलने, तुरुंगवास, प्रशिक्षण शिबिरे, अधिवेशने घेतली. शेतकरी व त्यांच्या प्रश्नासाठी संघर्ष केला. शेतकरी संघटनेला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. महाराष्ट्रातील उपेक्षित, वंचित, दीन, दलित शेतकरी 'शेतकरी संघटनेचा बिल्ला' अभिमानाने छातीवर लावून मिरवू लागला. हा शेतकऱ्यांचा स्वाभिमान व आत्मविश्वास जागृत करण्याचे सर्व श्रेय शरद जोशी यांच्याकडेच जाते.

शेतकरी संघटनेला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी शरद जोशी यांनी मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. शेतकरी संघटनेचे, वारकरीचे ते संपादक व प्रमुख लेखक होते. द टाइम्स ऑफ इंडिया, बिझनेस इंडिया संडे, द हिंदू, बिजनेस लाइन, लोकमत इत्यादी वृत्तपत्रांत व नियतकालिकांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रासंगिक लेखन केले. शेतकरी संघटनेच्या 'शेतकरी

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



Editors

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels


संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- S 4

# अनुक्रमणिका


• पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... - संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्‌जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता - शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत - बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक - श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान - एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार- समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल - राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# शून्यातून शिखरापर्यंत – श्री. बाबासाहेब काळे

– डॉ. मंगल अदिनाथ घोलप

सामाजिक, राजकीय, उद्योग व विविध क्षेत्रांत शून्यातून शिखरापर्यंत ठसा उमटवणारे असे श्रीरामपूर एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सन्मानीय श्री. बाबासाहेब मोहनराव काळे साहेब. त्यांचा जन्म शेतकरी कुटुंबात वैजापूर तालुक्यातील चांदेगाव या अतिशय छोट्या गावात झाला. वडील मोहनराव काळे हे स्वातंत्र्यसैनिक तसेच गावचे पोलीस पाटीलही होते. त्याचबरोबर परंपरागत व्यवसाय म्हणून शेतीही उत्तम करत असे. श्री बाबासाहेब काळे यांचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथी हे चांदेगाव प्राथमिक जिल्हा परिषद शाळेत झाले. पाचवी ते नववी पर्यंतचे शिक्षण नागमठाण या गावात, तर दहावी ते बारावी तसेच पदवीपर्यंतचे म्हणजेच बी.कॉमपर्यंतचे शिक्षण त्यांनी वैजापूर तालुक्यातील विनायकराव पाटील महाविद्यालयात पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षण मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे झाले. त्यांचे शिक्षण बी.कॉम., बी. जर्नालिझम डी.एल.एल. असे होते. शिक्षण घेत असताना त्यांच्यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांविषयी नेहमी ओढ असे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवता आल्या पाहिजे, त्यांना शिक्षण घेता आले पाहिजे व त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आपले काहीतरी योगदान असले पाहिजे असे विचार त्यांच्या मनात सातत्याने येत होते.

महाविद्यालयीन शिक्षण बी.कॉम. त्यांनी विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर येथे १९७७ मध्ये पूर्ण केले, त्यादरम्यान त्यांनी १९७६ मध्ये विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष पद भूषविले. यासाठी त्यांना वैजापूर तालुक्याच्या आमदार शकुंतला पाटील यांचा पाठिंबा मिळाला. त्यानंतर त्यांनी औरंगाबाद या ठिकाणी एम.पी. कॉलेजला पी.जी.डी.एल.एल. ही पदवी संपादित करण्यासाठी प्रवेश घेतला. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना दरम्यानच्या काळात त्यांनी अनेक महाविद्यालयीन उपक्रमही राबविले, तसेच विविध पदांवरदेखील कार्य केले १९७८ मध्ये मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे श्री. ब. रा. भोसले उपकलगुरू असताना विद्यार्थी संसदचे सरचिटणीस म्हणून पदसिद्ध सदस्य, विधी सभा सिनेट मेंबर म्हणून निवड झाली. डॉ. श्रीकांत जिचकर अध्यक्ष असताना १९७९ मध्ये एस.एस.यू.आय. महाराष्ट्र प्रदेशची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. याच दरम्यान

सुशिक्षित बेरोजगारांची संघटना स्थापन करून त्यांनी तालुक्यात रोजगार प्रश्नासाठी आंदोलने केली. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक शुल्कमाफीचा प्रश्न त्यांनी या काळात प्रामुख्याने हाताळला. तेव्हा एक नेता म्हणून त्यांचे नाव प्रस्थापित व्हायला सुरुवात झाली.

१९७९ च्या जिल्हा परिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्या. हा काळ खऱ्या अर्थाने त्यांच्या आयुष्यातला एक टर्निंग पॉइंट्स ठरला. निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा श्री. शरद पवार साहेब यांनी श्री. काळे यांना वैजापूरमधल्या विरगाव गटातून लढविण्याबाबत सुचविले व त्यांनी ते आव्हान स्वीकारले. प्रचार जोरात सुरू झाला. मोठमोठ्या नेत्यांच्या सभा झाल्या. त्या सभेत या मुलाला तुम्ही फक्त निवडून आणायचे काम करा बाकी त्याला जिल्हा परिषदेचा पदाधिकारी करायचे आम्ही पाहतो असे आवाहन केले. श्री. शरद पवार अर्थात त्याचा उलटाच परिणाम झाला. हा कालचा मुलगा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष झाला तर आपले राजकारण संपेल, या भीतीने रातोरात सूत्र हालली. मतदान झाले आणि अवघ्या १६५ मतांनी ते पराभूत झाले. त्यावेळी साहेबराव डोनगावकर हे अध्यक्ष झाले. तरीही त्यांना पवार साहेबांनी स्वीकृत सदस्यासाठी श्री. काळे यांचे नाव सुचविले. तशी ऑर्डर ही निघाली, परंतु ती त्यांनी नाकारली आणि दुसऱ्या दिवशी राजीनामा देऊन टाकला. या पदाला तसा अधिकार काहीच नव्हता. ही निवडणूक चालू असतानाच त्यांची परीक्षा ही होती. ते सर्व सोडून पुन्हा ते त्यांच्या कामात सक्रिय झाले. ही निवडणूक झाली खरी; पण नंतर आता पुढे काय करायचे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला. शेती होती परंतु शेती करण्याची मनापासून इच्छा नव्हती. याच काळात त्यांनी पत्रकारितेची पदवी संपादन केली होती.

१९८६ मध्ये सार्वमत वृत्तपत्रमध्ये सहसंपादक म्हणून तीन-चार महिने काम केले. नंतर मात्र गोविंदराव अदिक साहेबांची आणि बबनराव पवार यांची संयुक्त 'त्रिमूर्ती प्रिंटिंग प्रेस' त्यांनी १९८६ ला विकत घेतली आणि हा त्यांच्या व्यवसायाचा 'श्री गणेशा' झाला. प्रिंटिंग प्रेस यशस्वीपणे चालवली. सुरुवातीला १५ लोकांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला. परंतु नंतर मात्र १९९२-९३ मध्ये आर्थिक संकटामुळे ती प्रेस बंद झाली. पुन्हा नव्याने संकट त्यांच्यासमोर आ वासून उभे राहिले. पुढे काय करायचे हा प्रश्न भेडसावत राहिला. त्याच दरम्यान श्रीरामपूरच्या एम.आय.डी.सी.चा प्रश्न सातत्याने चर्चेत येत होता. कारण १९८४ मध्ये बॅरिस्टर रामराव अदिक साहेब उद्योगमंत्री असताना त्यांच्या हस्ते जागेचे नुसतेच भूमिपूजन झाले होते, परंतु प्रत्यक्षात काहीच कार्यवाही झालेली नव्हती. प्रथम नियोजित एम.आय.डी.सी. इंडस्ट्रीज असोसिएशनची स्थापना केली. तिचे कार्यालय श्रीरामपूर मध्ये सुरू केले. परंतु प्रशासकीय पातळीवर या एम.आय.डी.सी.बद्दल नकारात्मक भावना होती. महाराष्ट्रातील ही एकमेव एम.आय.डी.सी. श्रीरामपूर तालुक्याच्या

ठिकाणी सुरू होणार होती. अनेक अधिकारी वर्ग सातत्याने बोलायचे की, इथे काहीच भवितव्य नाही, उद्योग व्यवसाय चालू शकणार नाही. परंतु काळे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयावर एक भव्य मोर्चा काढायचा ठरविला. श्रीरामपूर मध्ये एम.आय.डी.सी. सुरू झालीच पाहिजे. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी मिळालीच पाहिजे. अशा विविध मागण्या त्या आंदोलन वेळी करण्यात आल्या एम.आय.डी.सी.साठी श्रीरामपूर मध्ये १३०० एकर जमीन होती; परंतु त्या ठिकाणी पाण्याची, रस्त्याची व्यवस्था, इतर पायाभूत सुविधा उपलब्ध कराव्यात, औद्योगिक विकास महामंडळाचे सेक्शन ऑफिस कार्यान्वित करावे अशा मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना श्री. काळे व समवेत आंदोलकांनी दिले. याचा खूप चांगला परिणाम झाला. पुढे तातडीने रस्ता निधी मंजूर झाला. त्यातून वीज सुविधा, बोअरद्वारे पाण्याची सुविधा सुरू झाली, विविध टेंडर निघाले आणि विविध प्रकारची कामे मार्गी लागले ३०० एकर जागेत छोटे-मोठे असे दोनशे प्लॉट पाडले गेले. परंतु हे सर्व तयार असूनदेखील प्लॉट घ्यायला कोणीही व्यावसायिक पुढे येत नव्हता. स्वतः काळेसाहेब आणि त्यांचे मित्र श्री. सारंगधर निर्मळ या दोघांनी प्रथम प्लॉट घेतले. पाच गुंठेची जागा घेऊन त्यांनी १९९०-९१ ला केमिकल इंडस्ट्रीज सुरू केली. परंतु स्वतःला टेक्निकल नॉलेज कमी असल्यामुळे दोन वर्षांनंतर ती बंद झाली. नंतर त्यांनी १९९५ मध्ये तेथेच खवा, पेढे, पनीर तयार करण्याचा कारखाना सुरू केला. त्या व्यवसायावरच त्यांनी एम.आय.डी.सी. मध्येच तीन एकर जमीन घेऊन केशव दूध इंडस्ट्रीज सुरू केली. आज जवळपास या डेअरीचे कलेक्शन एक लाख लिटर एवढे आहे. दुधापासून अनेक पदार्थ त्या ठिकाणी तयार केले जातात. शिवाय दूध वाहतुकीसाठी स्वतःचे चार टँकर असून, अमूल या उत्पादनासाठी एकूण दुधाच्या ७५ टक्के दूध विक्री केले जाते. याचबरोबर एम.आय.डी.सी.मध्ये अजून पाच गुंठे जागा घेऊन फॅब्रिकेशनचा व्यवसाय सुरू झाला. त्या ठिकाणी विविध खिडक्या, दरवाजे, गेट असे वेगवेगळ्या वस्तू तयार केल्या जातात, वाहतुकीसाठी आज त्यांच्याकडे १२ टेम्पो उपलब्ध आहेत. पुन्हा चार एकर जागा घेऊन एम.आय.डी.सी. मध्येच पेट्रोल पंप सुरू केला. सीएनजी गॅसची ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. जवळपास यासाठी सहा ते सात कोटींची गुंतवणूक त्यांनी केली. त्याच ठिकाणी मल्टीपर्पज हॉल, मंगल कार्यालयही बांधले. श्रीरामपूर ही त्यांची कर्मभूमी आहे व त्यांनी या कर्मभूमीवर अनेक उद्योग सुरू केले. आज एम.आय.डी.सी.मध्ये त्यांचे विविध प्रकल्प कार्यान्वित असून, जवळपास ३००० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना त्यांनी कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून दिला.

**जन्मभूमीसाठी योगदान आणि भविष्यकालीन नियोजन -**

दुग्ध व्यवसायात प्रगती करणे, वैजापूर तालुक्यात मोठी गुंतवणूक करणे

यासाठी शांतिगिरी महाराज यांच्याकडून शंभर एकर जमीन ९० वर्षांच्या करारावर घेतली. सन २००२ मध्ये त्यांनी 'मौनगिरी ॲग्रो इंडस्ट्रीज लिमिटेडची' स्थापना केली. या ठिकाणी पशुखाद्य निर्माण, जिनिंग प्रेस व सरकी पेंढनिर्मिती, धान्य ग्रेडिंग, क्लीनिंग व पॅकिंग फ्लोअर मिल, डाळ व बेसन मिल, ऑइल मिल व कृषी मार्गदर्शन केंद्र इत्यादी कृषी आधारित प्रकल्पांची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून दोन हजार लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. २०२२ मध्ये ७५ एकर जमीन वैजापूर तालुक्यात त्यांनी घेतली. त्या ठिकाणी साखर उद्योग, इथेनॉल निर्मिती तसेच वीजनिर्मितीसाठीचे भविष्यकालीन नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या सर्व प्रकल्प व व्यवसायाचे कामकाज करण्यासाठी त्यांनी औरंगाबाद या ठिकाणी मध्यवर्ती ऑफिस सुरू करून तेथून सर्व व्यवहार पूर्ण केले जातात. आज काळे साहेबांनी उद्योग क्षेत्रात खूप मोठी प्रगती केलेली असून, जवळ जवळ ६००० लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. संपूर्ण प्रकल्पात एकूण ६०० ते ७०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून त्यांनी आपले स्वप्न पूर्ण केले आहे.

**सामाजिक योगदान व भविष्यकालीन नियोजित प्रकल्प –**

सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळवण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, छोटे-मोठे लघुउद्योग उभे करण्यासाठी विविध नव उद्योजकांना मार्गदर्शन करणे, जागा घेणे, कर्ज घेणे याविषयी शिबिर परिसंवाद आयोजित करणे.

शैक्षणिक संस्थांना अनुदान देणे, शैक्षणिक वस्तू भेट देणे, नागमठाण या गावी शाळेसाठी तीन लाख रुपये अनुदान देणे, विद्यार्थ्यांना वह्या पुस्तकांचे वाटप करणे, श्रीरामपूर व वैजापूर तालुक्याची दळण व्यवस्था वाढविण्यासाठी पुलाचे बांधकाम व्हावे यासाठी मंजुरी घेणे व त्यास दहा लाख रुपयांची मदत करणे. धार्मिक कामासाठी तीर्थक्षेत्र श्री सरला बेट या ठिकाणी दरवर्षी मदत श्री काळेसाहेब करीत असतात. शांतिगिरी महाराजांच्या १०८ वेरुळ आश्रमासाठी दोन वर्षांपासून वर्षाला रु. १० लाख मदत त्यांची दरवर्षी असते. भविष्यात २४ लाख रुपये अनुदानाच्या स्वरूपात विविध देणगी देण्याचे ध्येय तसेच भविष्यात अजून पाच ते सहा हजार लोकांना रोजगार देण्याची ध्येय त्यांच्या मनाशी आहे. आजही वयाच्या ६७ व्या वर्षात त्यांचे आरोग्य उत्तम असून, या वयातसुद्धा त्यांनी खूप मोठे उद्योग विस्ताराचे स्वप्न पाहिले आहे आणि म्हणून शून्यातून शिखरापर्यंत कर्तृत्व निर्माण करणाऱ्या कर्तृत्वान पुरुषाला सन्माननीय श्री. बाबासाहेब काळे यांना मनापासून सलाम. नवीन पिढीसाठी त्यांनी शून्यातून सर केलेले शिखर खरंच खूप प्रेरणा देणारे ठरेल.

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



**Editors**


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre
| Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

तेविसावी

# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various
  Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- / **$ 4**

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# एक झंझावात

– प्रा. विवेक मिलिंद मोरे

प्राध्यापक आणि चळवळ हे सूत्र आजच्या काळात पटत नाही. आज प्राध्यापक नोकरी जाण्याच्या भीतीने स्वतःच्या अन्याय आणि हक्काच्या बाबतीत व्यथा मांडण्याचे धाडस करत नाहीत. १९५० ते २००० हा काळ दलित प्राध्यापकांसाठी फार कठीण होता. त्यावेळी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय ह्या तीनही क्षेत्रांत कार्य करणाऱ्या एका झंझावताची कहाणी म्हणजे प्रा. माधव मोरे यांची ओळख ह्या लेखातून होईल.

**प्रस्तावना –**

देश स्वतंत्र झाला तरी मराठवाडा स्वतंत्र झाला नव्हता. संपूर्ण मराठवाड्यावर निजामाचे राज्य होते. मराठवाड्यात राहणारा दलित, अस्पृश्य, मागासवर्गीय माणूस त्या काळात ब्राह्मणशाही, मराठाशाही, निजामशाही या तिघांच्या जाचामध्ये भरडला जात होता. येथील दलित माणसाला स्वतःचा आवाज नव्हता. त्याचे अस्तित्वच समाजाने नाकारले होते. कमालीचे दारिद्र्य, गरिबी, अज्ञान आणि उच्चवर्णीयांची गुलामी यामध्येच हा माणूस कसेबसे जीवन जगत होता. स्वातंत्र्यानंतर आजही जी जात नाही ती म्हणजे जात.

**जीवन परिचय –**

प्रा. माधव मोरे यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील कोलखेड गावी १७ जून १९५० रोजी झाला. शिक्षणाचा कोणताही वारसा त्यांच्याकडे नव्हता. अतिशय हालअपेष्टामध्ये जीवन जगत असतानाही शिक्षणाच्या आवडीमुळे सरांनी शालेय शिक्षण 'मोप' या गावी, उच्च शिक्षण 'बी. ए. मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद' आणि एम.ए. इंग्रजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' येथे पूर्ण केले. औरंगाबाद हे चळवळीचे गाव. त्यात मिलिंद महाविद्यालय म्हणजे कार्यकर्त्यांची प्रयोगशाळा. येथे त्यांनी 'दलित युवक आघाडी' या सामजिक संस्थेची स्थापना केली. जून १९७३ मध्ये ते 'यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई' येथे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून रुजू होऊन १९९३ पर्यंत कार्यरत होते. थोडक्यात ते महाविद्यालय हीच त्यांची कर्मभूमी. मोरे सर विद्यार्थिप्रिय आणि असंख्य तरुणाचे प्रेरणास्रोत होते.

**सामाजिक कार्य –**

मोरे सर, अंबाजोगाईच्या सहकाऱ्यांच्या मदतीने आंबेडकरी चळवळीचा एक भाग झाले. गायरान सरकारी जमिनी वहिवाटी करण्याचा सपाटा मोरे सरांनी सुरू केला. महसूल प्रशासनाला गायरानप्रश्नी तंग करून टाकले. खेड्यापाड्यांत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने मोरे सरांवर पोलिसांनी अनेक गुन्हे दाखल केले आणि त्यांना हद्दपारीच्या कार्यवाहीला सामोरे जावे लागले. सरांनी माणसे जमवली, प्रशिक्षित केली, अन्यायाच्या विरुद्ध लढण्याची मानसिकता तयार केली. मोरे सरांच्या मते ही चळवळ भावनिक करून चालणार नव्हते, म्हणून त्यांनी तरुणांसाठी अनेक कार्यशाळा आयोजित केल्या आणि त्यानंतर त्यांना चळवळीचा आराखडा दिला. त्यामध्ये आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या दुर्बल, पीडित, गावकुसाबाहेरच्या दलितांना आर्थिक सक्षम बनविण्यासाठी एक ऐतिहासिक कार्यक्रम दिला.'पुढे त्यांनी शासकीय गायरान जमिनी, देवस्थानाच्या नावावर असणाऱ्या जमिनी व महार वतनास दिलेल्या जमिनीवर अतिक्रमण करून त्या वहिवाटी खाली आणल्या. त्या काळात केवळ बीड जिल्ह्यातील २,७६० एकर सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण केल्याची नोंद झालेली दिसते आणि यापैकी जवळपास २,५०० एकर जमिनीवरील अतिक्रमण शासनाने नियमित केली आहेत. ही त्यांच्या प्रयत्नांना मिळालेली एक ऐतिहासिक उपलब्धी आहे.

१९८८-८९ दरम्यान त्यांनी भूमिहीनांसाठी सर्वपक्ष एकत्र करून अंबाजोगाईला 'जमीन पाणी परिषद' यशस्वी करून दाखविली होती. या राज्यव्यापी परिषदेमध्ये पाच एकर जमिनी भूमिहीनांना द्या. त्याच बरोबर एक एकर जमीन झाडे लावण्यासाठी द्या. त्या जमिनीवर पीक घेण्यासाठी पाणी द्या, भूमिहीन कास्तकरांना जे दलित आहेत अशांना कसण्यासाठी व उपजिविकेसाठी सरकारी जमिनी द्या. असा ठराव महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यामध्ये भव्य परिषद घेऊन झाला. या परिषदेनंतर महाराष्ट्र सरकारला सरकारी जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या कास्तकरांच्या नावे जमिनी करण्याचा कायदा करावा लागला. हा कायदा करताना व शासकीय परिपत्रक काढताना महाराष्ट्र शासनाला या परिषदेचे उद्घाटक ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नावाने काढावे लागले. या सर्व प्रक्रियेमध्ये निश्चितच महाराष्ट्रातील तमाम भूमिहीन दलित कास्तकरांचा फार मोठा फायदा झाला. या कामी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा होता; तर सरांचा वाटा खारीचा होता.

अन्यायपीडित सरकारी, निमसरकारी कर्मचारी आणि खासगी नोकर यांना मोरे सरांचा आधार होता. झोपडपट्टीत राहणाऱ्या, शेतावर-बांधावर काम करणाऱ्या मजुरांना मोरे सर बलाढ्य वीर असल्यासारखेच वाटत. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या नेमक्या प्रशासकीय चुका काढणारे मोरे सर एक चांगले नेमबाज होते. 'संत

कबीर नगर' झोपडपट्टीची आणि 'स्नेहनगर गृहनिर्माण सोसायटी'ची स्थापनाही सरांनी केली. आजही तिथे सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. 'एक गाव एक पाणवठा' 'प्रौढ शिक्षण' 'सामूहिक शेतीचे प्रयोग', 'गाळपेरा जमिनीचा सत्याग्रह' इत्यादी चळवळीदेखील त्यांनी यशवीपणे राबविल्या.

**शैक्षणिक कार्य –**

प्राध्यापक म्हणून काम करत असताना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये इंग्लिश विषयात गोडी निर्माण करून दिली. त्यांच्या उत्तम मार्गदर्शनामुळे आज त्यांचे असंख्य विद्यार्थी शासकीय, निमशासकीय आणि उच्च पदांवर कार्यरत आहे. विद्यार्थ्यांचा आधार म्हणजे मोरे सर. महाविद्यालयाला नावलौकिक मिळून देण्यातही त्यांचा मोठा वाटा आहे. एकदा तर सरांची बदली होताच सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडण्याची तयारी केली, विद्यार्थ्यांच्या या भूमिकेमुळे प्रशासनास सरांची बदली रद्द करावी लागली. यावरून सरांचे विद्यार्थ्यांप्रती आणि विद्यार्थ्यांचे सरांप्रती असलेले प्रेम आणि आदर दिसून येतो. सरांनी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वाढली पाहिजे यासाठी संशोधनपूर्वक मांडणी करून आंदोलन उभे केले. स्वत: सामाजिक न्यायमंत्र्यांची भेट घेऊन त्यांनी त्यावेळी प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले. वाचनालय उभे करून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण केली. सर नेहमी म्हणत, शिक्षकांना जात नसते. त्यांचा धर्म-कर्म विद्यार्थी असेल तरच देश घडेल आणि प्रगती होईल.

विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी म्हणून मागसवर्गीय अनुशेष भरती करावी. यासाठी सर्व शासकीय आणि निम-शासकीय कार्यालयांवर मोर्चे काढून पदभरती करण्यास भाग पाडले. विशेष म्हणजे ब्राह्मण, मराठा, बंजारा, मातंग आणि मारवाडी समाजातील विद्यार्थ्यांनी नामांतर चळवळी उभारून मदत केली आणि ते त्यामध्ये सामील झालेत. यातूनच त्यांचे विद्यार्थिकेंद्र किती मजबूत होते ते दिसून येते.

**राजकीय कार्य –**

असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. 'देवभोळ्या माणसापासून ते नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. स्पृश्य-अस्पृश्य भेद मिटून जावा, सर्व माणसे समान आहेत, ही त्यांची शिकवण होती. शोषणाविरुद्ध त्यांनी मोठा लढा उभा केला होता. 'दगडात देव नाही तर देव माणसात आहे' जिवंत माणसात, प्राणिमात्रात देव आहे, हे सांगणारे संत गाडगेबाबा होते. भूतदया, प्राणिमात्रांवर दया केली पाहिजे, याकरिता त्यांनी फार मोठे कार्य केले. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले.

**शैक्षणिक क्षेत्रातील योगदान -**

शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे म्हणून शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा याकीता विविध शिक्षण संकुले काढली. शिक्षण संस्थांना मदत केली. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांची 'रयत शिक्षण संस्था' यांना मदत करण्यास पासून ते विदर्भातील डॉ. पंजाबराव देशमुख यांची 'शिवाजी शिक्षण संस्था' असो, यांच्या कामाचं सतत कौतुक केले. आपल्या कृतीतून त्यांनी अस्पृश्यतेवर प्रहार केले.

- १९१७- पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाला बांधली.
- १९२५- मूर्तिजापूर येथे गोरक्षणाचे काम केले आणि एक धर्मशाळा व एक विद्यालय बांधले.
- १९३२ - ऋणमोचन येथील सदावर्त संत गाडगेबाबांनी सुरू केले. गाडगे महाराजांनी कीर्तनांद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला.
- १४ जुलै १९४९ - रोजी स्वतः पंढरपूर येथे स्थापन केलेल्या 'संत चोखामेळा धर्मशाळे'ची सर्व कागदपत्रे स्वतःचा अंगठा उमटवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुपूर्त केले.
- फेब्रुवारी ८, इ.स. १९५२ रोजी 'श्री गाडगेबाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर शिक्षणसंथा व धर्मशाळा स्थापन केल्या.
- १९५४ - कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची अंतर्गत कराड येथे सद्गुरू गाडगे महाराज विद्यालयाची स्थापना केली.
- १९५४- गाडगेबाबांनी मुंबईत जे.जे. हॉस्पिटलच्या रोग्यांच्या नातेवाइकांना उतरण्यासाठी हॉस्पिटलजवळ धर्मशाळा बांधली.

**अंधश्रद्धांविरोधी समाजजागृती -**

गाडगेबाबांच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात कर्मकांड, अंधश्रद्धा यांचा अतिरेक

झाला होता. बहुजन समाज भरडून निघत होता, तेव्हा या समाजवादी सत्यशोधकाने एकेश्वरवादी तत्त्वज्ञान मांडले. ग्रंथप्रामाण्य, पोथिनिष्ठता, सण, श्राद्ध, मूर्तिपूजा यावर कठोर प्रहार करून ज्ञानप्रसाराचे आगळेवेगळे आंदोलन उभे केले. गावोगाव भजन-कीर्तन करून समाजप्रबोधनाचा नवा आविष्कार प्रस्थापित केला. गाडगेबाबा आपल्या कीर्तनात अध्यात्म सांगण्याऐवजी भौतिक समस्यांवर बोट ठेवून विज्ञान सांगत. ते म्हणत, 'बाबांनो परमेश्वर एक आहे, तो निर्विकार आहे. ही 'धर्माची देवळे व देवळांचा धर्म' थोतांड आहे. या दगडी देवाचे पाय रगडू नका.' यासाठी आपल्या कीर्तनातून संत कबीराचा दोहा सांगत-

'जत्रामे फत्रा बिठाया तीर्थे बनाया पाणी
भई दुनिया बडी दिवानी ये तो पौसे की धुलधानी'

या यात्रा-जत्रा म्हणजे भोळ्या बहुजन जनतेची लूट करण्याची ठिकाणी आहेत. मग पुढे म्हणत, ''अरे, देव मंदिरात नाही की मूर्तीत नाही, तर माणसांत आहे. भुकेल्यांना अन्न द्या, अडाण्यांना ज्ञान द्या, इथेच परमेश्वर आहे.''

गाडगेबाबा एकेश्वरवादी असल्यामुळे नवस-सायस यावरदेखील कडाडून हल्ला चढवत. या कोंबड्या-बकऱ्यांच्या नवसापोटीच त्यांच्या वडिलांचे घर उद्ध्वस्त झाले होते. त्यामुळे स्वतःच्या दाहक अनुभवातून नवसाबाबत पोटतिडकीने बोलत. आपल्या कीर्तनात ते म्हणत, ''बापहो मुक्या प्राण्याचे बळी देऊन माणूस कधी सुखी झाला आहे काय? परमेश्वर प्रसन्न झाला आहे काय? अरे, शेळीच्या लेकराचा जीव घेऊन तुम्हाला लेकरू कसे होईल? माय-माउल्यांनो हा अधर्म आहे.'' गाडगेबाबा धर्माची चिकित्सा करत लोकांना अगदी पोटतिडकीने सांगत की, 'बळीप्रथा कोणत्याही धर्मग्रंथात सांगितलेली नाही.' या पद्धतीने गाडगेबाबांनी 'नवस' या अंधश्रद्धेविरुद्ध प्रचंड जनजागृती करून महाराष्ट्रातील ६७ खेड्यांत ही बळीची प्रथा बंद केली. संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या कुटुंबांना उपयोगी येणाऱ्या प्राणिमात्राची रक्षणाची मोहीम राबवली, अनेक यात्रेतील हिंसा बंद करण्यासाठी प्रसंगी प्राण पणाला लावले.

**संदर्भ सूची -**


१. श्री संत गाडगे महाराज - मधुकर केचे (लेखक)
मराठी प्रकाशन - Kindle Edition
२. श्री संत गाडगेबाबा - प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे
३. https://manovikasprakashan.com/index.php?route=product/productproductšid=1052


ଔଔ

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'




Editors

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी

# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- **$ 4**

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... - संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता - शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत - बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक - श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान - एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार- समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल - राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# जनसेवा हीच ईश्वरसेवा

– प्रा. पूजा बाळासाहेब जाधव

आपल्या अवतीभोवती अशी असंख्य लोक असतात जी कोणत्याही प्रकारचे आकांडतांडव न करता, प्रसिद्धीची अपेक्षा न करता आपल्या कामातून समाजसेवेचे मूल्य जोपासतात. आणि अशीच लोक समाजात परिवर्तन घडवून आणतात. परंतु खूपदा अशा लोकांचे कार्य हे दुर्लक्षित राहते. अशाच एका व्यक्तिमत्त्वाला जवळून भेटण्याचा योग आला आणि माझा माणुसकी या शब्दावर नव्याने विश्वास बसला.

डॉ. सुधीर बापूसाहेब निर्मळ, (M.D.AM) General Physician, Surgeon वाकडी-गणेशनगर परिसरात निर्मळ डॉक्टर म्हणून प्रसिद्ध असलेले सुधीर सर वैद्यकीय पेशा स्वीकारलेले आणि अविरत रुग्णसेवा करणारे एक सर्वसामान्य गृहस्थ. डॉक्टर साहेबांच्या कामाबद्धल आणि त्यांच्या उपचार पद्धतीबद्दल ग्रामस्थ आणि परिसरातील व्यक्तींकडून खूपदा ऐकलं होतं; परंतु खरा परिचय झाला तो त्यांच्या भेटीनंतर. डॉक्टर साहेबांनी स्वत:ची सेवा फक्त रुग्णसेवेपुरतीच मर्यादित न ठेवता समाजसेवेतदेखील मोलाचा वाटा उचला आहे. डॉक्टरी पेशा ते समाजसेवा हा प्रवास अगदी उल्लेखनीय आहे.

२३ फेब्रुवारी १९७८ रोजी निर्मळ-पिंपरी(ता. राहाता) या गावी एका सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे कौटुंबिक वातावरण अतिशय उत्तम आणि शिक्षणाची चाड असणारे होते. प्रत्येकाने उत्तम शिक्षण घ्यावे हा वडिलांचा आग्रह होता. आणि म्हणून वडील बापूसाहेब निर्मळ यांनी डॉक्टर सुधीर यांच्या सोबतच त्यांच्या दोन बहिणींनादेखील सर्व शिक्षण पूर्ण करू दिले. ज्या काळात मुलींना शिकवले जात नव्हते त्या काळात मुलींना वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण दिले. यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. वडील बापूसाहेब निर्मळ हे प्रवरा पब्लिक संकुल येथे लेखपाल म्हणून काम करत होते. वडिलांचा स्वभाव अतिशय शिस्तप्रीय आणि मनमिळावू होता. वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा डॉक्टर साहेबांच्या जीवनावर खूप जास्त प्रभाव पडला. बालपणापासूनच शिस्त अंगवळणी पडली. त्याचा आजतागायत फायदा मला होत आहे. असे डॉक्टर निर्मळ आवर्जून सांगतात. लहान असताना आई नेहमी

आमचा अभ्यास घ्यायाची त्या वेळी ती स्वत: matric पास होती. तिचा मायाळू स्वभाव आणि इतरांबद्दल असलेल प्रेम हेच माझ्या आज सुरू असलेल्या रुग्णसेवेच गमक आहे.

डॉक्टरांचे बालपण हे सगळे लोणी प्रवरा या परिसरात गेले. विद्यार्थिदशेत अतिशय चंचल स्वभाव असणारे डॉक्टरसाहेब हे अभ्यासापेक्षा जास्त खेळात रमत. वडिलांमुळे पोहणे आणि फुटबॉल या मैदानी खेळात जास्त गोडी निर्माण झाली. आणि यातूनच त्यांनी खेळात विशेष प्रावीण्य मिळवले. जिल्हास्तरीय व राज्यस्थरीय जलतरण स्पर्धा त्यांनी विशेष गाजवल्या. वडिलांमुळे वाचनाची आवड निर्माण झाली. यातूनच पुढे शिवचरित्र आणि अशा बऱ्याच ऐतिहासिक साहित्याचे वाचन त्यांनी केले.

आयुष्याला कलाटणी देणारा काळ म्हणजे महाविद्यालयीन काळ सुधीर निर्मळ साहेबाचे वैद्यकीय शिक्षण आयुर्वेद सेवा संघ महाविद्यालय (पंचवटी नाशिक) येथे झाले. तसेच नाशिक येथील सुविचार हॉस्पिटल येथे त्यांनी आपला वैद्यकीय सराव डॉक्टर अविनाश आंधळे यांच्या अंतर्गत पूर्ण केला.

या काळात डॉक्टर साहेबांना डॉक्टर आंधळे यांचा सहवास लाभला. या भेटीमुळे त्यांच्या आयुष्याला दिशा मिळाली. मेडिकलच्या दुसऱ्या वर्षापासून त्यांनी डॉक्टर आंधळे यांच्याकडे मेडिकल प्रक्टिस सुरू केली. कामातील लहान मोठ्या गोष्टी आणि कामाचे प्रभावी तंत्र सर्व डॉक्टर आंधळे यांकडून शिकायला मिळाल अस ते सांगतात. माझ्या अभ्यासात व कामात मला सुरुवातीला कोणतेच स्वारस्य नव्हते; परंतु डॉक्टर अविनाश आंधळे यांच्या प्रभावामुळे मी अभ्यासाकडे वळलो. असं देखील ते सांगतात. शिकलेलं प्रभावी तत्त्व म्हणजे पेशंट किती तपासले हे न मोजता किती पेशंट बरे झाले हे मोजाव. आणि आजतागायत त्यांनी हे तत्त्व तंतोतंत पाळलं आहे. वैद्यकीय अभ्यासाबरोबरच मी डॉक्टर अविनाश आंधळे यांच्याकडून वक्तशीरपणा आणि कर्तव्यनिष्ठा या गोष्टी शिकलो, हेदेखील ते नमूद करतात. माझ्यासाठी माझे पहिले गुरू हे डॉक्टर अविनाश आंधळे सर आहेत आणि मी सगळ्यात जास्त प्रभावित त्या एकाच व्यक्तीमुळे झालो, असंही ते सांगतात.

महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांची ओळख डॉक्टर सीमा यांच्या सोबत झाली आणि नंतर या ओळखीतूनच त्यांच्यात खूप चांगली मैत्री झाली. पुढे याच डॉक्टर सीमा यांच्याशी सुधीर सरांचा २००२ मध्ये विवाह झाला. हा विवाह आंतरजातीय होता समाज आणि त्यावेळची विचारपद्धती यांचा विचार करता हा एक खूप मोठा निर्णय होता; परंतु पुरोगामी विचारसरणी असलेल्या निर्मळ कुटुंबीयांनी हा निर्णय घेऊन समाजासमोर एक आदर्श ठेवला. आजदेखील

डॉक्टर सीमा सुधीर सरांना त्यांच्या प्रत्येक निर्णयात खंबीर साथ देतात. आणि डॉक्टर सुधीर पण मान्य करतात की माझं हे समाजसेवेच वेड मी पूर्ण करू शकलो केवळ माझी पत्नी सीमा हिच्या पाठिंब्याने. आजही डॉक्टर सीमा ह्या पुणतांबा येथे आशा केंद्रात सीनियर मेडिकल ऑफिसर म्हणून काम करत आहेत. एक डॉक्टर, आई आणि पत्नी अशा सर्वच जबाबदाऱ्या त्यांनी लीलया पेलवल्या आहेत.

२००१ रोजी डॉ. निर्मळ यांनी आपल्या रुग्णालयाची स्थापना केली. त्यावेळी त्यांची फी फक्त ५० रुपये होती. आणि २०२२ पर्यंत ती ७० रुपये एवढीच फी ते आकारतात. ठरवलं असतं तर ते शहराच्या ठिकाणीदेखील स्वत:चं रुग्णालय उभारून पैसा कमवू शकले असते; परंतु तसे न करता त्यांनी सर्वसामान्य लोकांसाठी वाकडी- गणेशनगर या ग्रामीण भागात आपला दवाखाना सुरू केला. गणेशनगर परिसरात येणारे ऊसतोडणी कामगार आणि मजूर यांच्यासाठी आजदेखील डॉक्टर मोफत सेवा देतात. तसेच ऊसतोड मजूर महिलांची मोफत प्रसूती आणि उपचार पुरवण्याचे कामदेखील ते करतात. तसेच अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार देण्याचे कामदेखील ते करतात.

कोणत्याही रुग्णाकडे नंतरच्या उपचारासाठी जर पैसे नसतील तर तेदेखील देण्याचे काम डॉक्टरसाहेब स्वत: करतात. साहेबांच्या नि:स्वार्थ सेवेचा दाखला देणारी घटना अलीकडेच घडली. गणेशनगर परिसरात संपत नावाचा एक मनोरुग्ण आहे, तो बहुतेकदा परिसरात फिरत असतो. त्याला पायाला जखम होऊन त्यात किडे पडले होते. पाय पूर्ण खराब झाला होता. अशावेळी डॉक्टर साहेबांनी स्वत: त्याची जखम साफ करून त्याला मलमपट्टी केली व त्याच्यावर अगदी विनामूल्य उपचार केले. यासारखे कितीतरी किस्से ग्रामस्थ आणि परिसरातील लोक नेहमी सांगतात. तसेच साहेबांचे ग्रामस्थांशी अतिशय सालोख्याचे संबध आहेत. त्यांच्याकडे येणारी प्रत्येक महिला त्यांना हक्काने भाऊ म्हणून हाक मारते. यावरूनच समजते की डॉक्टरसाहेब फक्त एक चांगले डॉक्टर नसून ते खूप चांगली व्यक्तीपण आहेत.

निर्मळसाहेबांनी १९ फेब्रुवारी २०२२ ला परिसरासाठी शिवजयंतीच्या पावन मुहूर्तावर विनामूल्य रुग्णवाहिका सेवा सुरू केली आहे. ज्याचा लाभ सर्वच परिसरातील लोकांना होत आहे. तसेच ही रुग्णवाहिका २४ तास मोफत लोकार्पण केली आहे.

कोरोनाकाळातदेखील त्यांनी आपला दवाखाना चोवीस तास रुग्णसेवेत कार्यरत ठेवला. त्यांच्या कोरोनाकाळातील योगदानासाठी त्यांना जनसेवा संघटनेचा कोविड योद्धा पुरस्कार मिळाला. तसेच संजीवनी सेवा प्रतिष्ठाननेदेखील त्यांच्या

कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित केले. तसेच डॉक्टरसाहेब मराठा सेवा संघासाठीदेखील काम करत आहेत. याची दखल घेत मराठा सेवा संघानेदेखील सन्मानचिन्ह देऊन त्यांना सन्मानित केले.

डॉक्टरसाहेबांनी फक्त रुग्णसेवेपुरतीच आपली सेवा मर्यादित न ठेवता इतिहास संवर्धन मोहीमदेखील हाती घेतली आहे, दर वर्षी ते ४,५,६ जून रोजी रायगडावर दाखल होतात व गडकिल्ले संवर्धन या विषयावर जनजागृती करतात. तसेच ते रायगड परिवार व झुंजार परिवार यांसारख्या गड किल्ले संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या समाज समूहांशीदेखील जोडले गेले आहेत. त्याचबरोबर दरवर्षी जिजाऊ जयंतीनिमित्त ते मोफत आरोग्य शिबिरसुद्धा आयोजित करतात. तसेच या मोहिमेच्या अंतर्गत ते शिवचरित्र आणि शिवकालीन साहित्याचादेखील प्रचार आणि प्रसार करतात. याबद्दल बोलताना ते नमूद करतात की शिवरायांच्या कार्याचा माझ्या आयुष्यावर खूप प्रभाव झाला आहे. शिवचरित्र सगळ्याच संकटाना तोंड देण्याच बळ देत राहते. असं ते आवर्जून सांगतात.

भावी पिढीला संदेश देताना सुधीर निर्मळ सर हे आवर्जून सांगतात, की भावी पिढीने शिवरायांचे चरित्र अभ्यासावे. जरी सर्व गुण आत्मसात करणे शक्य नसले तरी थोडेतरी गुण अंगीकारावेत. ज्यामुळे आयुष्य सोपे आणि समाधानी होईल. आणि काम करताना आयुष्यात पैसा महत्त्वाचा आहेच; परंतु त्यापेक्षा जास्त महत्त्वाचं आहे कामातून मिळणारं समाधान आणि त्या समाधानासाठी काम करा.

आपल्या कामाची कोणी दखल घ्यावी किंवा कोणी विचारणा करावी, अशी साधी अपेक्षादेखील न ठेवणारे डॉक्टर सुधीर निर्मळ हे सर्वसामान्य तरुणांसाठी प्रेरणा आहेत. या आणि अशा कितीतरी कर्तृत्ववान पुरुषांमुळे आज आपला देश बदलतो आहे. अशा व्यक्तीच्या कार्याची ओळख समाजाला झाली पाहिजे व अशा महान व्यक्तीचा योग्य तो सन्मान झाला पाहिजे, असे मनापासून वाटते.

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



**Editors**


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

तेविसावी

# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- **$ 4**

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# विनोबा भावे यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान

- प्रा. मुकुंद नंदकुमार मुखेडकर

विनायक नरहरी भावे (आचार्य विनोबा भावे नावाने प्रसिद्ध) (सप्टेंबर ११, इ.स. १८९५-नोव्हेंबर १५, इ.स. १९८२) हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक व भूदान चळवळीचे प्रणेते होते. महात्मा गांधींनी १९४० मध्ये 'वैयक्तिक सत्याग्रह' पुकारला, त्यावेळीही पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी आचार्य विनोबा भावे यांची निवड केली. ब्रिटिश राजविरोधी या आंदोलनाचे पर्यवसान १९४२ मध्ये 'छोडो भारत' आंदोलनात झाले. भावे पुढे सर्वोदयी नेते म्हणून प्रसिद्ध झाले.

**सुरुवातीचे जीवन -**

थोर गांधीवादी आचार्य व भूदान चळवळीचे प्रवर्तक. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तहसिलातील गागोदे या गावी विनोबा तथा विनायक नरहर भावे यांचा जन्म झाला. आजोबांचे नाव शंभुराव भावे. शंभुराव भावे यांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. वाईच्या ब्राह्मणशाही या मोहल्ल्यात कोटेश्वर मंदिर आहे. हे भावे यांच्या मालकीचे असून तेथे शंभुरावांनी अग्निहोत्र स्वीकारून अग्निहोत्र शाळा स्थापली होती. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्मपरायणतेचे संस्कार विनोबांना मिळाले. त्यांचे वडील नरहरी शंभुराव भावे व आई रखुमाबाई. वडील नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले; परंतु वाटेतच सुरतेस उतरून आई-वडिलांना न कळविताच वाराणसी येथे रवाना झाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक, वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या. त्यांनी महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला व गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजी भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहाश्रमात नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींची एक वर्षाची रजा घेऊन ते वाई येथे प्राज्ञपाठशाळेत

वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांचा जीवनोद्देश होता.

**सामाजिक व धार्मिक कार्य –**

वाई येथील प्राज्ञपाठशाळा मंडळाचे संस्थापक व मुख्याध्यापक स्वामी केवलानंद सरस्वती (पूर्वाश्रमीचे नारायणशास्त्री मराठे) यांच्यापाशी विनोबांनी उपनिषदे, ब्रह्मसूत्र, शांकरभाष्य, पातंजलयोगसूत्रे इ. विषयांचे अध्ययन केले. माहुली येथील स्वामी कृष्णानंद यांच्या आश्रमातील काही प्रौढ विद्यार्थी–शिवनामे, वि. का. सहस्रबुद्धे इत्यादी मंडळीही त्यांच्याबरोबर सहाध्यायी होती. दिनकरशास्त्री कानडे व महादेवशास्त्री दिवेकर हे प्राज्ञपाठशाळेची व्यवस्थापनाची व अन्य प्रकारची कामे पाहत होते. प्रत्येक सोमवार हा या पाठशाळेचा सुटीचा म्हणजे अनध्ययनाचा दिवस असे. त्या दिवशी पाठशाळेची अंगमेहनतीची कामे शिक्षक-विद्यार्थी उरकत असत आणि प्रज्ञानंदस्वामींच्या समाधिस्थानाच्या सभागृहात विद्यार्थी व शिक्षक यांच्या शास्त्रार्थ चर्चेकरिता साप्ताहिक सभा भरत. चर्चेचे विषय सामाजिक, धार्मिक, तात्त्विक हे असतच; परंतु त्याबरोबर प्रचलित राजकारणाची अनेक बाजूंनी मीमांसाही चालत असे. दिनकरशास्त्री कानडे हे सेनापती बापट, स्वातंत्र्यवीर सावरकर, योगी अरविंद घोष इत्यादी सशस्त्र क्रांतिकारकांच्या मार्गाने चालणाऱ्या एका गुप्त कटाचे सदस्य होते. सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा ते पुरस्कार करीत. विनोबांच्याप्रमाणेच त्यांचेही वक्तृत्व अमोघ होते. अहिंसक क्रांतीची वैचारिक भूमिका विनोबा मोठ्या परिणामकारक रीतीने या साप्ताहिक सभांमध्ये मांडीत असत. १९१७ साली हिवाळ्यात वाई येथे प्लेगची साथ उद्भवली. कृष्णेच्या दक्षिण तीरावर राहुट्या आणि पर्णशाला उभारून त्यांत प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी व शिक्षक जवळजवळ ४ महिने राहिले. वेदान्ताचे व इतर शास्त्रांचे पाठ त्यांतील एका विस्तृत पर्णशालेमध्ये चालत असत. विनोबा पर्णशालेबाहेरच्या कृष्णाकाठच्या आम्रवृक्षाच्या छायेखाली उपनिषदांचे व शांकरभाष्याचे उच्च स्वरात वाचन करीत, हळूहळू सावकाश फेऱ्या मारीत असत. त्यांचे ते प्रसन्न वाचन ऐकून स्वामी केवलनंदांच्या मनावर विनोबाजींच्या व्यक्तिमत्त्वाची खूप खोल छाप पडली. विनोबांनी वेदान्ता विषयामध्ये खूप वेगाने १० महिन्यांत प्रगती केली. आपण कोणकोणत्या ग्रंथांचे व विषयांचे अध्ययन केले याचा सविस्तर वृतांत त्यांनी महात्मा गांधींना कळवला. गांधीं हे वृत्तांतपत्र वाचून अत्यंत विस्मित झाले. त्या पत्राच्या उत्तरात म. गांधींनी अखेर म्हटले की, ए गोरख, तुने मच्छिंदर को भी जीत लिया है!

**स्वातंत्र्यलढा –**

१) १९१० साली मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी बडोद्याच्या कॉलेजमध्ये प्रवेश

घेतला. बाबू अरविंद घोष हे कॉलेजचे प्राचार्य होते. विनोबांनी १९१४ मध्ये 'विद्यार्थी मंडळ' स्थापन केले. हे विद्यार्थी मंडळ आणि प्राचार्य अरविंद घोष यांच्यामुळे इंग्रज सरकारचे घडामोडींवर लक्ष होते.

२) नवीन स्थापन झालेल्या बनारस हिंदू विद्यापीठ येथे ४ फेब्रुवारी १९१६ रोजी महात्मा गांधींनी भाषण दिले होते, ते भाषण वृत्तपत्रात छापून आले. ते वाचल्यानंतर विनोबांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. १९१६ साली विनोबा परीक्षा देण्यासाठी मुंबई येथे जाणार होते; पण महात्मा गांधींचे भाषण वाचल्यानंतर त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र जाळून टाकले.

३) विनोबांनी गांधींना पत्रे लिहिली. त्यानंतर गांधींनी विनोबांना कोचरब आश्रम, अहमदाबाद येथे येऊन वैयक्तिक भेट घेण्याचा सल्ला दिला. ७ जून १९१६ रोजी विनोबांची गांधींशी पहिली भेट कोचरब येथेच झाली व तेथेच त्यांनी शिक्षण सोडून देण्याचा निर्णय घेतला. व त्यांनी गांधींच्या आश्रमात चालणाऱ्या कार्यक्रमात रस घेण्यास सुरुवात केली. गांधीजींच्या आज्ञेवरून विनोबा शरीराच्या शुद्धीसाठी १४ जानेवारी १९१० रोजी वाई मुक्कामी आले व वर्षभरात त्यांनी शरीरप्रकृती स्वस्थ केली.

४) गांधीजी साबरमती आश्रमात वास्तव्यास असताना जमनालाल बजाज यांनी वर्धा येथे आश्रम काढण्यास परवानगी देण्याचा आग्रह धरला. त्या आग्रहाखातर वर्धा येथे सत्यागृहाश्रम काढण्यास गांधींनी परवानगी दिली. ८ एप्रिल १९२१ रोजी विनोबा गांधीजींच्या इच्छेनुसार वर्धा येथील आश्रम सांभाळण्यास गेले.

५) १९२१ मध्ये त्यांनी अधिकृतपणेचे सभासदत्व स्वीकारले. परंतु एक कोटी रुपयांचा 'टिळक फड' उभा करण्याच्या कार्यपद्धतीवर नाराज होऊन त्यांनी १९२६ सभासदत्व सोडले.

६) सरकारने घातलेली बंदी मोडून जमनालाल बजाज यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय झेंडा घेऊन ११ एप्रिल १९२१ रोजी नागपुरात निघालेल्या एका मिरवणुकीतील सर्व सत्याग्रहींना अटक झाली. झेंडा सत्यागृहाच्या मिरवणुकीचे देशभरातून आलेल्या सत्यागृहींचे हे सत्र चालूच होते.

७) विनोबाही झेंडा सत्यागृहात सामील झाले. १८ जून १९२३ रोजी त्यांना अटक होऊन एक वर्षभराची सक्तमजुरीची शिक्षा झाली. विनोबाजींचा देशासाठी हा पहिला तुरुंगवास होता. पुढे आंदोलनाचा वाढता जोर पाहून सत्यागृहींची तुरुंगातून मुक्तता झाली व विनोबांनाही शिक्षेचे तीन महिने पूर्ण होण्याच्या आत ३ सप्टेंबर १९२३ रोजी सोडून देण्यात आले. १०८ जानेवारी १९२३ साली त्यांनी 'महाराष्ट्र धर्म' या नवीन मासिकाची सुरुवात केली. या मासिकात त्यांनी आपले उपनिषदावरील निबंध प्रसिद्ध केले.

पुढे या मासिकाचे रूपांतर साप्ताहिकात झाले. ते तीन वर्षापर्यंत चालले. १८ जून १९२४ ते ११ एप्रिल १९२० या काळात महाराष्ट्र धर्मचे १४० अंक प्रसिद्ध झाले. त्यात एकूण २२२ लेख प्रकाशित करण्यात आले.

८) वैकम, केरळ येथे दलितांच्या मंदिर प्रवेशावर रोख लावण्यात आली होती. या प्रकरणाचे पर्यवेक्षण करून त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी गांधीनी १९२५ साली विनोबांना वैकोम येथे पाठवले. १०. तुरुंगात त्यांनी 'ईशावास्यवृत्ती' आणि 'स्थितप्रज्ञ' या ग्रंथाचे लेखन केले. वेल्लोर येथील तुरुंगात असताना त्यांनी अनेक दक्षिण भारतीय भाषा आत्मसात केल्या व त्यांचा अभ्यास केला. त्यावरून त्यांनी 'लोकनगरी' हे हस्तलिखित लिहिले. तुरुंगात ते आपल्या सोबती कैद्यांना 'भगवतगीतेवर प्रवचन देत. पुढे याचा संग्रह म्हणून 'गीता प्रवचन' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

९) काँग्रेसने अधिवेशन शहरापासून दूर खेड्यात भरवावे, या गांधीजींच्या सूचनेनुसार १९३६ चे अधिवेशन फैजपूर (जळगाव) येथे भरविण्याचे ठरविले. आणि त्याची सर्व जबाबदारी विनोबांवर सोपविण्यात आली. विनोबाजींनी हे अधिवेशन यशस्वीपणे पार पाडले.

१०) महात्मा गांधीसोबत त्यांनी सविनय कायदेभंग चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. महात्मा गांधींनी १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रह पुकारता त्यावेळीही पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी आचार्य विनोबा भावे यांची निवड केली. १० ऑक्टोबर १९४० रोजी विनोबांनी पवनार येथे युद्धविरोधी भाषण करून, भाषणस्वातंत्र्याचा हक्क बजावत पाहिला वैयक्तिक सत्याग्रह केला. त्यांना अटक झाली व तीन महिन्यांची शिक्षा झाली.

११) तुरुंगातून सुटून आल्यानंतर विनोबांनी पुन्हा १० जानेवारी १९४१ रोजी सेवाग्राममधून सत्याग्रह केला. त्यांना अटक होऊन एक वर्षाची साध्या कैदेची शिक्षा झाली. गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत 'चले जाव' असा सरकारला इशारा दिला. सरकारने तत्काळ राष्ट्रीय नेत्यांची धरपकड केली. विनोबांनाही अटक झाली. ३ वर्षे त्यांना तुरुंगात राहावे लागले.

१२) जुलै १९४५ मध्ये तुरुंगातून सुटून आल्यानंतर त्यांनी हरिजनविषयक कामाला वाहून घेतले. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर गांधीजींशी चर्चा करून ते १९४६ मध्ये पवनार आश्रमाजवळ सुर्गाव येथे रोज भंगीकाम करण्यासाठी जाऊ लागले.

**संदर्भ सूची –**

१. आचार्य विनोबा भावे : एक सत्त्वशील संत – अक्षरनामा

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



**Editors**


**Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar**

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels


संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

ꙮ स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

ꙮ देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

ꙮ **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. स्नेहल तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे ४११०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

ꙮ © S.R.I.

ꙮ **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ꙮ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ꙮ **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

ꙮ ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

ꙮ **पृष्ठसंख्या :** १३०

ꙮ **मूल्य :** ₹ ३००/- $ 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य– लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला

– प्रा. सारिका बाळासाहेब पेरणे

राकेश झुनझुनवाला यांचा जन्म ५ जुलै १९६० रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे वडील आयकर विभागात अधिकारी होते आणि ते शेअर बाजारात गुंतवणूक करायचे. तेथूनच राकेश झुनझुनवाला यांना शेअर बाजारात पैसे गुंतवण्याचे बाळकडू मिळाले आणि त्यांची पैसे गुंतविण्याची इच्छा होत गेली. वाणिज्य शाखेत पदवी घेतल्यानंतर त्यांनी १९८५ मध्ये इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया मधून सी.ए.चा कोर्स केला. यानंतर त्यांनी शेअर बाजारात जाण्याची इच्छा वडिलांसमोर व्यक्त केली; पण वडिलांनी पैसे देण्यास नकार दिला आणि अगोदर स्वतःच्या मेहनतीने पैसे कमव नंतर शेअर बाजारात प्रवेश कर, असा वडिलांनी त्यांना सल्ला दिला.

१९८० च्या दशकाच्या सुरुवातीस शेअर बाजारामध्ये लहान आकड्यांत सुरुवात करून आजतागायत कोट्यधीश म्हणून त्यांची ओळख आहे. पाच हजारांच्या गुंतवणुकीस त्यांनी सुरुवात केली होती. फोर्ब्स मासिकानुसार, झुनझुनवाला यांची शेअर बाजारातील गुंतवणूक ५.८ अब्ज डॉलर्स (सुमारे ४६ हजार कोटी रुपये) आहे. टाटा, टायटनसह अनेक बड्या कंपन्यांचे शेअर्स झुनझुनवाला यांच्या पोर्टफोलिओमध्ये समाविष्ट आहेत. छोट्या गुंतवणुकीतून मोठा निधी निर्माण होतो. परंतु, योग्य रणनीती आणि शेअर बाजारात पैसे गुंतविल्यानंतर जास्त परतावा मिळतो. फक्त बचत करून श्रीमंत होता येत नाही यासाठी पैसे योग्यरीत्या गुंतवणे महत्त्वाचे आहे. जेवढी जास्त जोखीम तेवढा जास्त परतावा या तत्त्वावर त्यांचा विश्वास होता. देशातील दिग्गज गुंतवणूकदार आणि बाजारातील 'बिग बुल' राकेश झुनझुनवाला यांनी गेल्या दोन दशकांत पैशातून पैसा कमावला आहे. त्यांना भारताचे वॉरेन बफे मानले जाते.

वडिलांचा शेअर बाजारात असलेला सहभाग यामुळे झुनझुनवाला यांना शेअर मार्केटमध्ये रस होता. कारण त्यांनी त्यांच्या वडिलांना त्यांच्या मित्रांसोबत याबद्दल बोलताना पाहिले होते. त्यांच्या वडिलांनी त्यांना शेअर बाजाराच्या क्षेत्रात मार्गदर्शन केले असले तरी, त्यांनी कधीही त्यांना तेथे पैसे गुंतवण्याची ऑफर दिली नाही. राकेश झुनझुनवाला एवढ्यावरच थांबले नाहीत, आणि

कॉलेजला जायला लागताच शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करू लागले.

राकेश झुनझुनवाला यांनी १९८५ मध्ये पहिल्यांदा शेअर बाजारात पाऊल ठेवले. त्यांनी ५०००/- रुपये गुंतवले आणि १९८६ मध्ये पहिला नफा कमवला. त्यांनी टाटा टी कंपनीचे शेअर ४३ रुपयांना विकत घेतले आणि तीन महिन्यांनी १४३ रुपये प्रति शेअर या दराने विकले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही.

राकेश झुनझुनवाला यांनी टाटा समूहाच्या टायटन कंपनीत २००३ मध्ये गुंतवणूक केली. या एका शेअर्सने त्यांचे नशिबच पलटवले. त्यांनी ६ कोटी शेअर्स प्रत्येकी ३ रुपये दराने खरेदी केले होते. आज त्या एका शेअरची किंमत २५०० रुपयाच्या जवळपास आहे. त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये अनेक कंपन्यांचे शेअर्स आहेत, यामध्ये सेल, टाटा मोटर्स, टाटा कम्युनिकेशन, लुपिन, इंडियन हॉटेल्स, इंडियाबुल्स हाउसिंग फायनान्स, फेडरल बँक, एस्कॉर्ट लिमिटेड, टायटन कंपनी इत्यादी कंपन्यांचा समावेश आहे.

**राकेश झुनझुनवाला यांचे गुंतवणुकीचे आणि घ्यावयाच्या दक्षतेचे नियम –**

- शेअर्स खरेदी करताना ज्यावेळी इतर लोक शेअर्स विकत असतील तेव्हा त्याची खरेदी करा व ज्यावेळी इतर लोक शेअर्स विकत घेत असतील त्यावेळी विक्री करा.
- निर्णय हे नेहमी काळजीपूर्वक घ्यावे. विचार न करता गडबडीत घेतलेल्या निर्णयामध्ये नुकसान होते त्यामुळे कोणत्याही स्टॉकमध्ये पैसे लावण्याच्या अगोदर स्वतःला वेळ द्यावा. अशा कंपनीमध्ये गुंतवणूक करा की ज्यामध्ये मजबूत प्रबंधन व प्रतिस्पर्धी असेल.
- गुंतवणूक विचारपूर्वक करावी. भावनात्मकरीत्या केलेली गुंतवणूक नेहमी नुकसान देते.
- शेअर बाजारात गुंतवणूक करणे नेहमीच बँकांइतके सुरक्षित नसते. जर येथे मोठा परतावा असेल तर धोकादेखील आहे. म्हणूनच कंपनीची संपूर्ण माहिती घेतल्यानंतरच पैसे गुंतवणे महत्त्वाचे आहे. वाढलेल्या शेअरमध्ये पैसे गुंतवू नये; कारण इतर लोक त्यात पैसे गुंतवत आहेत.
- एकाच वेळी व एकाच ठिकाणी पैसे गुंतवू नयेत. तुमच्याकडे गुंतवणूक करण्यासाठी चांगली रक्कम असू शकते. परंतु तुम्ही सर्व पैसे एकाच वेळी गुंतवले पाहिजेत असे नाही. नफा मिळवण्याची इच्छा चांगली आहे, परंतु नियमानुसार केवळ एक छोटी गुंतवणूक चांगल्या परताव्याची हमी देते.
- कोणत्याही एका शेअर्समध्ये पैसे गुंतवताना तुमच्या गुंतवणुकीची रक्कम भागांमध्ये विभागून घ्या आणि वेळोवेळी खरेदी करा. जर शेअर्सची

किंमत कमी झाली तर खरेदी सुरू ठेवा. यामुळे तुमच्या खरेदीची सरासरी कमी होईल.

- शेअर बाजारात कंपन्यांवर किती कर्ज आहे यावर लक्ष ठेवून राहिले पाहिजेत. कर्ज कमी असेल तर कंपन्यांवर रोखीचा दबाव राहणार नाही. पण, कर्ज जास्त असल्यास कंपनीचे मूल्यांकन कधीही चढउतार होऊ शकते. गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीच्या कर्जाचा आढावा घ्या.
- स्वतःच्या पैशांची गुंतवणूक करावी. उधारीच्या पैशांनी कधीच गुंतवणूक करू नका. शेअर्स बाजाराबाबत तुमचा अंदाज चुकीचा ठरू शकतो. तुम्ही एखाद्या वेळी एका कंपनीचे शेअर्स खरेदी केले आणि तुमच्या अंदाजानुसार त्या शेअर्स दर वधारला अथवा घसरला नाही तर तुम्हाला नुकसान होऊ शकते. अशावेळी उधारीने घेतलेल्या पैशांमुळे तुमची चिंता आणखी वाढू शकते.
- आपल्या क्षमता विचारात घेऊन चुका कराव्यात. तुम्ही ज्या चुका सहन करू शकता, अशाच चुका करा. त्यामुळे पुढील चुका टाळू शकता. तुम्ही जी चूक करता तीच चूक पुन्हा करणे टाळले पाहिजे.
- जोखीम (RISK) या चार अक्षरांपासून सावध राहा. शॉर्ट टर्ममध्ये तुम्ही जेवढे नुकसान सहन करू शकता. तेवढीच गुंतवणूक करा. त्यामुळे गुंतवणूक करण्याआधी तुम्ही जोखीम तपासून पाहायला हवी. अनेकदा गुंतवणूकदार अधिक जोखीम स्वीकारतात आणि स्वतःच्या अडचणी वाढवतात.
- शेअर बाजारात यशस्वी होण्यासाठी तुम्हाला आशावादी राहावे लागेल. गुंतवणूकदार म्हणून आशावादी असले पाहिजे. शेअर बाजारात तुमच्या संयमाची, धैर्याची परीक्षा होते. शेअर बाजारात उतावीळ असणे चांगले नसते.

झुनझुनवाला यांच्या यशाचे पहिले गुपित म्हणजे खरेदी करताना आपण सारासार विचार करण्याला पर्याय नाही. तुम्ही शेअर विकत घेताना व विकताना दोन्ही वेळेस अभ्यासपूर्वक निर्णय घ्यायला हवे. काही वेळेला कंपनीच्या कामाविषयी असमाधानकारक माहिती समोर येते, अशावेळी घाबरून न जाता एक गुंतवणूकदार म्हणून आपण विश्वास ठेवायला हवा.

राकेश झुनझुनवाला यांचा दृष्टिकोन नेहमीच दीर्घकालीन गुंतवणुकीचा राहिला आहे. ते अनेकदा सुरुवातीच्या गुंतवणूकदारांना दीर्घकाळ गुंतवणूक करण्याचा सल्ला द्यायचे. अल्पावधीत नफा मिळवण्याऐवजी गुंतवणुकीला अनेक पटींनी वाढ करण्यासाठी वेळ दिला पाहिजे असे त्यांचे मत आहे. झुनझुनवाला यांच्या

म्हणण्यानुसार बाजारात पैसे परिपक्व होण्यासाठी वेळ द्या, तुम्हाला थोडी वाट पाहावी लागेल, पण परतावा नक्की मिळेल. वरील त्यांच्या या तत्त्वज्ञानानुसार व त्यांनी केलेल्या कामगिरीने ते भारतातील यशस्वी गुंतवणूकदार व वॉरेन बफे आहेत हे सिद्ध होते. त्यांचा मृत्यू दिनांक १४ ऑगस्ट २०२२ रोजी झाला.

संदर्भ सूची -


१. https://mr.wikipedia.org/wiki/
२. https://navbharattimes.indiatimes.com/business/business-news
३. https://biharhelp.in/rakesh-jhunjhunwala-biography-in-hindi/

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



**Editors**


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre

Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक


• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. स्नेहल तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे ४११०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/–
S 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# मी पाहिलेला एक उद्योजक

– प्रा. कैलास रघुनाथ दातीर

श्री. संतोष भाऊसाहेब नजन हे राहुरी तालुक्यातील एक प्रसिद्ध फळविक्रेते व मोठे व्यापारी म्हणून ओळखले जातात. परंतु ही ओळख काही त्यांनी एका दिवसात निर्माण नाही केली. ही ओळख निर्माण होण्याकरिता त्यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे. या लेखाच्या निमित्ताने त्यांच्या खडतर संघर्षाची ओळख आपण करून घेणार आहोत. आज राहुरी तालुका तसेच श्रीरामपूर तालुका यात एक नामांकित फळविक्रेते म्हणून ते प्रसिद्ध आहेत. शेतकऱ्यांकडून फळबागा घेणे, त्यांची देखभाल करणे व फळे विक्रीयोग्य झाल्यानंतर ते किरकोळ फळ विक्रेत्यांना विक्री करणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. हे सर्व करत असताना अध्यात्माकडे व समाजाकडे ही त्यांचा ओढा आहे. अशा या उद्योजकांची अल्प परिचय आपण या लेखांमध्ये पाहणार आहोत.

**सुरुवातीचा प्रवास –**

श्री. संतोष भाऊसाहेब नजन यांचा जन्म राहुरी तालुक्यातील वांबोरी या गावात २४ जुलै १९८६ साली झाला. त्यांच्या घरी एकत्र कुटुंब पद्धती होती आणि पारंपरिक अशा सगळ्या रूढी त्यांच्या घरी पाळल्या जात. रोज तुळशीची पूजा होत असे, घरात गणपती उत्सव साजरा होई. देवदेवतांच्या-ऋषीमुनींच्या गोष्टी ऐकणे, संध्याकाळी देवपूजा करणे अशा वातावरणातच त्यांचे लहानपण गेले.

घरची आर्थिक परिस्थिती खूपच जेमतेम होती, कोणत्याही प्रकारचा शेतीचा किंवा दुसरा आधार नसलेने त्यांचे वडील भाऊसाहेब नजन यांनी सुरुवातीच्या काळात फळ विक्रीचा व्यवसाय सुरू केला. यातूनच त्यांना या व्यवसायाविषयी आवड निर्माण झाली. थोडक्यात फळ विक्रेते होण्याचे बाळकडू त्यांनी आपल्या वडिलांकडून मिळाले असे म्हणता येईल. सुरुवातीचा काळ खडतर असल्याने व कोणत्याही स्वरूपाचा इतर आर्थिक आधार नसल्याले त्यांची संपूर्ण उपजीविका यावरच सुरू होती. अशा खडतर परिस्थितीतही त्यांनी आपले १२ वी पर्यंतचे शिक्षण राहुरी येथे मराठी माध्यमातून पूर्ण केले. शिक्षण सुरू असतानाही ते नित्याने आपल्या वडिलांना व्यवसायात मदत करत होते. १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी सर्व लक्ष व्यवसायावर केंद्रित केले. सुरुवातीला जवळच

असलेल्या महात्मा कृषी विद्यापीठातून ते वेगवेगळ्या प्रकारची फळे सायकलवर जाऊन आणत व आजूबाजूच्या पंचक्रोशीमधील बाजारात विकत असत. असाच त्यांच्या सर्वसाधारण फळ विक्रेते ते एक नामांकित फळ व्यापारी असा प्रवास सुरू झाला.

**प्रगतिपथाकडे वाटचाल –**

१२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्याननंतर मात्र त्यांनी आपले संपूर्ण लक्ष व्यवसायाकडे देण्याचे ठरवले. मात्र त्यामुळे इच्छा असूनही त्यांना आपले पुढील महाविद्यालयातील शिक्षण घेता आले नाही. आजूबाजूच्या गावात, बाजारात फळे विकण्यापेक्षा कुठेतरी व्यवसायाला स्थिरता येण्यासाठी त्यांनी तालुक्याच्या ठिकाणीच व्यवसाय करण्याचे ठरवले. त्याकरिता राहुरी शहरातील नगरपालिकेसमोर त्यांनी व्यवसाय करावयाचे ठरवले. दुकानासाठी नगरपालिकेचा गाळा घेण्याइतके पैसे नसल्याने एका छोट्या हातगाडीवर त्यांनी आपले फळांचे दुकान सुरू केले. पण त्यातही त्यांना आजूबाजूच्या विक्रेत्यांनी त्रास देण्यास सुरुवात केली; परंतु अशातही आपल्या मवाळ बोलण्याने त्यांनी सर्वांची मने जिंकून घेतली व एका छोट्या हातगाडीवर दुकानास सुरुवात केली. हळूहळू त्यांचा व्यवसाय स्थिरावत गेला. त्यानंतर आपल्या व्यवसायाची काहीतरी ओळख निर्माण व्हावी असे त्यांना मनोमन वाटत होते, पण काही केल्या मार्ग सापडत नव्हता. आपल्या व्यवसायास काहीतरी ओळख निर्माण झालीच पाहिजे त्याशिवाय पर्याय नाही हा विचार त्यांना स्वस्थ बसून देत नव्हता. अशातच त्यांनी व्यापार वाढावा म्हणून व व्यवसायासाठी आपले हक्काचे साधन असावे म्हणून पियाआजो कंपनीचे अप्पे गाडी विकत घेतली. त्यातूनच त्यांना व्यवसायास नवीन ओळख देण्याची कल्पना सुचली व त्यांनी आपल्या छोट्या बहिणीच्या नावाने व्यवसायास ओळख दिली. वैशाली फ्रूट विक्रेते असे व्यवसायाचे नामांकन केले. त्यानंतर त्यांनी प्रगतीचा जो मार्ग धरला तो आजपर्यंत टिकून आहे. वैशाली फ्रूट विक्रेते असे नामांकन झाल्यानंतर त्यांनी आपला व्यवसाय विस्तार करण्यास सुरुवात केली. त्यासाठी मोठ्या व्यापाऱ्याकडून वेगवेगळ्या शेतकऱ्यांकडून अधिक माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. त्यात मग फळे कोठून चांगल्या प्रतीची मिळतील, तसेच ती विकत घेतल्यावर तिचे प्रतवारीकरण कसे करावे, ती व्यवस्थित राहावी म्हणून कोणती काळजी घ्यावी, या बाबी शिकून घेतल्या व आपल्या व्यवसायवृद्धीला सुरुवात केली. यात ते बाहेरून आंबा, चिकू, पेरु अशा चांगल्या वाणाचे फळे विकत घेऊ लागले, त्यांची प्रतवारी कशी करावी हे त्यांनी आपल्या घरातील माणसांनाही शिकवले व घरातील सर्वांनीही या कामात त्यांना प्रचंड मदत केली. त्यानंतर ते किरकोळ व्यापारी ते होलसेल व्यापारी झाले. होलसेल व्यापारी

झाल्यानंतरही अनेक अडचणी येऊ लागल्या; कारण त्यांना फळे ही व्यापाऱ्याकडूनच खरेदी करावी लागत. त्यामुळे व्यवसायाच्या किंमत स्पर्धेला तोंड द्यावे लागत. त्यामुळे प्रगतीची वाटचाल खुंटते की काय अशी भीती निर्माण होऊ लागली; म्हणून त्यांनी थेट ज्या ठिकाणी फळांचे मुख्य बाजारपेठ म्हणून ओळखले जाते अशा गुजरात या ठिकाणाहून आंबे, नाशिक या ठिकाणाहून द्राक्षे, जळगाव या ठिकाणाहून केळी व नागपूर या ठिकाणाहून संत्रे अशी फळे खरेदी करण्यास सुरुवात केली व त्यांचा प्रगतीचा रथ पुन्हा एकदा विकासाकडे वाटचाल करू लागला. सुरुवातीच्या काळातच कोणताही इतर आर्थिक आधार आपणास नाही याची जाणीव त्यांना होती, त्यामुळे आपल्या पुढच्या पिढीवर असे संकट निर्माण होऊ नये म्हणून त्यांनी आजूबाजूच्या पंचक्रोशीत शेतजमिनी खरेदी करण्यास सुरुवात केली. व्यापाराकडे लक्ष देत असताना त्यांनी आपल्या कुटुंबाकडेही व्यवस्थित लक्ष दिले. आज त्यांना दोन मुले आहेत व त्यांना आपले शिक्षण पूर्ण करता आले नाही यांची खंत त्यांच्या मनात होती म्हणून त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे व्यवस्थित लक्ष दिले.

मोठ्या बाजारपेठेतून फळे विकत आणण्याकरिता त्यांनी आपले स्वतःचे छोटे ट्रान्सपोर्टेशन सुरू केले. कालांतराने फळ व्यवसायात अनेक व्यापारी उतरू लागल्याने पुन्हा एकदा व्यवसायात किंमत स्पर्धा सुरू झाली. यांचा अंदाज आल्याने मधली सर्व व्यापारी फळी काढून टाकायचे व थेट शेतकरीराजाकडूनच फळे विकत घ्यायची, असा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. पण त्यात प्रमुख समस्या होती ती शेतकऱ्यांना फळ उत्पादनासाठी तयार करणे व जे शेतकरी फळांचे उत्पादन घेत आहे त्यांना तांत्रिक साहाय्य पुरविणे. त्यांच्याकडे तांत्रिक ज्ञान होतेच; परंतु त्यांनी त्यासाठी अनेक तज्ज्ञांच्या भेटी घेतल्या व त्यांच्याकडून अजून तांत्रिक ज्ञान उपलब्ध करून घेतले व ते शेतकऱ्यांना दिले. परिणामी शेतकरी फळबागा करण्यास तयार झाले व त्यांनी थेट शेतकरी राजांकडूनच फळे विकत घेण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांकडे फळे साठविण्यासाठी आवश्यक साधने व तंत्रज्ञान उपलब्ध नसल्याने त्यांनी शेतकऱ्यांशी करार करून त्यांच्या फळबागाच करार पद्धतीने घेण्यास सुरुवात केली, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळत व कोणत्याही स्वरूपाचे जोखीम त्यांना पत्करावी लागत नसे. फळे ही नाशवंत असलेल्या ती व्यवस्थित ठेवण्यासाठी त्यांनी राहुरी येथेच वीरभद्र रॅपिंग चेंबर सेंटर सुरू केले. ज्या ठिकाणी फळे विक्री होईपर्यंत व्यवस्थित व योग्य वातावरणात ठेवली जातात. यामुळे शेतकऱ्यांची सर्व जोखीम त्यांनी स्वतः स्वीकारली व त्यांच्या मालाला योग्य किंमत उपलब्ध करून दिली. आज त्यांनी पाचेगाव येथील पेरूचे उत्पादक शेतकरी, सोनई येथील आंबा

उत्पादक शेतकरी, संगमनेर येथील डाळिंब उत्पादक शेतकरी यांच्याशी करार करून त्यांच्या फळबागा विकत घेतल्या आहेत. ही फळे पुणे, नागपूर, नाशिक अशा मोठ्या शहरांमधे तसेच नगर जिल्ह्यात अनेक मोठ्या बाजारपेठांत विक्रीसाठी उपलब्ध असतात.

आज राहुरी येथे अहमदनगर जिल्ह्यातील एक नामवंत फळ उद्योजक म्हणून संतोष भाऊसाहेब नजन हे सर्वांना परिचित आहे.

**सामाजिक योगदान –**

श्री. संतोष भाऊसाहेब नजन यांनी व्यवसायाकडे लक्ष देताना सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रांतही मोलाचे योगदान दिले आहे. फळाचा व्यवसाय करताना त्यांनी अनेक छोट्या किरकोळ फळविक्रेत्यांना त्यांच्या व्यवसायात मदत केली. त्यांना स्वत:ला व्यवसाय सुरू करण्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या, याची जाणीव ठेवून त्यांनी अनेक छोट्या फळ विक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय सुरू करणेसाठी मदत केली. त्यासाठी ते विक्रेत्यांना दीर्घकाळासाठी फळे उधारीवर विकण्यासाठी देतात. त्यामुळे ज्या व्यापाऱ्यांकडे भांडवल नाही असे व्यापारीही आपला व्यवसाय सुरू करू शकतात, तसेच आपल्या व्यवसायातही त्यांनी अनेक गरजू लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. आज त्यांच्याकडे जवळपास १५० लोक काम करतात व त्यांनाही ते अत्यंत सन्मानपूर्वक वागणूक देतात.

**आध्यात्मिक योगदान –**

श्री. संतोष भाऊसाहेब नजन यांना लहानपणापासूनच अध्यात्माची प्रचंड आवड होती. त्यासाठी घरात ते नेहमी वेगवेगळी पारायणे करत. आपणाबरोबर त्यांनी आपल्या कुटुंबालाही अध्यात्माचा वारसा दिला आहे. २ वर्षांपासून ते स्वामी समर्थांचे सेवेकरी म्हणून राहुरी तालुक्यात काम करत आहेत. हे करत असताना त्यांनी अनेक लोकांना अध्यात्माचे महत्त्व पटवून देत स्वामी समर्थांचे सेवेकरी म्हणून कार्य करण्यास प्रवृत्त केले. त्यांचे कामाचे योगदान म्हणून दिंडोरी प्रणीत स्वामी समर्थ केंद्राचे राहुरी तालुक्यातील प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांनी या दरम्यान अनेक सेवा केंद्रे सुरू केली. या केंद्रांत बालसंस्कार केंद्र सुरू करण्यात आली आहेत, की ज्यात लहान मुलांना आध्यात्मिक तसेच मूल्यशिक्षण दिले जाते. ज्याची आज खरोखर समाजाला गरज आहे.

अशा या एका उद्योजकाने समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे, की कोणताही व्यवसाय सुरू करणेसाठी शिक्षण, वय अशा कोणत्याही अडचणी आल्या तरी यावर मात करून आपणाला यशस्वी उद्योजक होता येते, तसेच उद्योजक झाल्यावरही समाजाप्रती आपले योगदान देता येते.

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



**Editors**

Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre | Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels


संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/–
  **S 4**

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... - संपादक / ७

हे ऑपरेटिंग सिस्टिम, इम्युलेटर्स, सिम्युलेटर्स, कंपायलर्स वगैरे संदर्भातच असायचे आणि त्याबाबत त्यांना माहिती नव्हती. हे आव्हान निर्माण झाले त्यावेळेची त्यांची परिस्थिति खूपच वेगळी होती. त्यांच्यावर प्रचंड मोठा आघात झाला होता, त्यांचा मुलगा निहार हा 'ऑटिझम' आजाराने ग्रस्त झाला. या संकटाबाबत विचार करत उद्विग्न अवस्थेत त्यांनी अनेक रात्री काढल्या. शेवटी मनाशी निग्रह केला आणि निहारची काळजी घेत, रात्र-रात्र जागून कॉम्प्युटर सायन्स विषयाचा अभ्यास केला. अँड्र्यू एस. टेनेनबॉम, विल्यम स्टॉलिंग्ज, फोरोझान, मॉरिस मनो या संगणकतज्ज्ञ लेखकांची पुस्तके वाचून ते स्वतःच प्रचंड परिश्रमाने कॉम्प्युटर सायन्स शिकले आणि त्या विषयांमध्ये पारंगत झाले. अर्थातच त्याचा फायदा त्यांना कंपनीत स्वतःचे स्थान निर्माण करण्यातही झाला.

पटणीनंतर त्यांनी 'सिंटेल' कंपनीत मॅनेजिंग डायरेक्टर पदावर, 'एल.अँड टी. इन्फोटेक' कंपनीत चीफ एक्झिक्युटिव्ह पदावर, 'अपार टेक्नॉलजीज'मध्ये सीइओ पदावर आणि त्यानंतर 'दिशा टेक्नॉलजीज'मध्ये एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर म्हणून काम केले. अशा प्रकारे ते कॉम्प्युटर विश्वाची एक-एक पायरी चढत गेले. या काळातच वर्तमानपत्रात, टीव्हीवर अनेकदा त्यांच्या मुलाखती यायच्या. त्यांनी जेव्हा 'एल. अँड टी. इन्फोटेक' कंपनी सोडली त्यावेळी 'इकॉनॉमिक टाइम्स'सारख्या महत्त्वाच्या वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर फोटोसह त्यांची बातमी छापून आली होती.

गोडबोले जेव्हा कुठलीही कंपनी जॉइन करत तेव्हा ती लहान असायची. काही वर्षांत जेव्हा ते ती कंपनी सोडायचे तेंव्हा त्या कंपनीची उलाढाल, नफा, कर्मचाऱ्यांची संख्या, परदेशातील ऑफिसेस या सर्व गोष्टींमध्ये अनेक पटींनी वाढ झालेली असायची, म्हणून त्यांना 'सिरियल सीईओ' किंवा 'टर्नअराऊंड सीईओ' म्हटले जात असे. एकूणच विविध सॉफ्टवेअर कंपन्यांमध्ये ३३-३४ वर्षे काम करीत असताना कामानिमित्त ते जगभर फिरले. न्यूयॉर्क, लंडन, टोकियो, सिडनी अशा विविध ठिकाणी मोठमोठे सेमिनार्स घेतले. अनेक सीईओज आणि व्हीपीजसमोर प्रेझेंटेशन केली आणि त्यातून कोट्यवधी रुपयांच्या वाटाघाटी केल्या. १९९८ मध्ये भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाविषयी टोकियोमध्ये त्यांनी भाषण दिले. हे भाषण अमेरिका, जपान, युरोप आणि ऑस्ट्रेलियात लाइव्ह व्हीडिओकास्ट झाले. लाखो लोक आणि शेकडो सीईओजनी ते ऐकले. त्यांचे हे भाषण खूपच गाजले. त्यावर अनेकांनी आपले अभिप्राय दिले आणि अनेक वृत्तपत्रांत त्याचा वृत्तांत छापून आला.

या काळात सीईओचे पगार प्रचंड वाढलेले असल्याने मुलगा निहार याचेसाठी जो पैसा त्यांना जमवायचा होता ते उद्दिष्ट साध्य झाले होते. इन्फोटेकमध्ये शेवटच्या काही वर्षांत सतत तेच तेच काम करण्याचा त्यांना कंटाळा यायला लागला. त्याचवेळी दोन कंपन्या वार्षिक ३-४ कोटी रुपये पगाराच्या ऑफर्स

देऊन त्यांना आपल्याकडे बोलावत होत्या. त्यामुळे त्यांची द्विधा मनःस्थिति झाली होती. शेवटी, सामाजिक भान ठेऊन गरजूंना, चळवळींना आणि सामाजिक संस्थांना मदत करण्याचा निर्णय घेऊन त्यांनी मिळालेल्या ऑफर्सला नकार दिला. काहीतरी वेगळे करावे, खूप वाचन करावे, त्यातून आनंद मिळवावा, स्वतः वृद्धिंगत व्हावे, परिपूर्णता प्राप्त करावी, जे आपल्याला समजले आहे ते सोप्या भाषेत इतरांना सांगावे अशा विचारांनी ते लेखनाकडे वळले.

**सामाजिक कार्य आणि योगदान –**

१९७१ मध्ये शहादा-तळोदा ह्या धुळे जिल्ह्यातील आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी गोडबोलेंनी मित्रांबरोबर सत्याग्रह आणि आंदोलन केले. १९९९ ला मालाडला मतिमंद आणि ऑटिस्टिक मुलांकरता असलेली 'आशियाना इन्स्टिट्युट फॉर ऑटिझम' ही विशेष शाळा पैशाअभावी बंद पडणार होती. ती शाळा चालविण्यासाठी पहिल्या वर्षीचा संपूर्ण खर्च गोडबोलेंनी उचलला आणि शाळा सुरू करण्यात आणि चालवण्यात योगदान दिले.

**वर्तमान स्थिती –**

गोडबोले हे मराठी आणि इंग्रजी भाषांतील लेखनासाठी प्रसिद्ध आहेत. लहान मुलासारखीच त्यांची उत्सुकता, कुतूहल आजही जागृत असते. त्यांना जे कळले नाही, माहिती नाही ते जाणून घेण्याची हाव आजही तितकीच प्रखर आहे. अजूनही १४-१५ विविध विषयांवरची पुस्तके लिहिण्याचा त्यांचा मानस आहे. स्वतःच्या आयुष्यात जमा केलेली ४ हजार पुस्तके ज्यांना रस आहे त्यांना वाटून त्यांनी एकट्याने पुढे लिहीत राहावीत यासाठी ते प्रयत्न करणार आहेत. त्याचबरोबर डोक्यातले २०० विषयसुद्धा फेसबुकवर टाकण्याचा त्यांचा विचार आहे.

या जीवनाच्या सगळ्या धुमश्चक्रीत वयाची ७२ वर्षे पूर्ण झालेली असूनही पुस्तकांचे, भटकंतीचे अनेक प्रकल्प त्यांच्या मनात आहेत. जमेल तेवढे ते पूर्ण करतीलच याबाबत खात्री आहे. मराठी ही ज्ञानभाषा व्हायला हवी, यासाठी थोडातरी हातभार लावायला हवा, या तळमळीने त्यांनी सर्व पुस्तके मराठी भाषेतूनच लिहिण्याचे काम सुरू ठेवले आहे.

**संदर्भ सूची –**

१. अच्युत गोडबोले, 'मुसाफिर', मनोविकास प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २०१२, आयएसबीएन : ९७८-९३-८२४६८-१९-६.

२. अच्युत गोडबोले, 'मी का आणि कसा लिहितो?', २ नोव्हेंबर २०२१, https:/ /www.maxmaharashtra.com/max-blog/wellknown-it-expert-and-writer-achyut-godbole-shares-his-work-and-aim-of-his-life-1067057.

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



**Editors**


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre
| Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels


संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे
• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर



स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/–
  S 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... - संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता - शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत - बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक - श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान - एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार- समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल - राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# ख्यातनाम गणितज्ञ – श्रीराम शंकर अभ्यंकर

– प्रा. भाग्यश्री सतीश भावसार

जगप्रसिद्ध फ्रेंच शास्त्रज्ञ हेन्री पॉइन्कारे यांनी 'गणितज्ञ जन्माला येतात, बनवले जात नाहीत' असे म्हटले आहे. हे विधान जगप्रसिद्ध गणितज्ञ प्रकांड पंडित (कै.) डॉ. श्रीराम शंकर अभ्यंकर यांचे चरित्र जाणून त्यांना पटणारे आहे.

श्रीराम अभ्यंकर यांच्या घराण्यात सरस्वतीचे वर्चस्व आहे. अभ्यंकर यांचे पूर्वज कोकण प्रांतातील रत्नागिरी जिल्ह्यातील कुर्धे गावचे होते. त्या घराण्याचे मूळ पुरुष नारायण विठ्ठल अभ्यंकर होते. ते प्रथम बाजीराव पेशव्यांच्या सहवासात देशात स्थलांतरित झाले आणि नंतर त्याच भागात, कान्हूर पठार (तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर) येथे स्थायिक झाले. सावकार, पुजारी आणि संन्यासी हे त्यांचे व्यवसाय होते. श्रीरामचे आजोबा केशव मोरेश्वर हेदेखील त्यांच्या जन्माची पहिली एकोणीस वर्षे (१८५५) कान्हूर पठारावर राहिले. वयाच्या विसाव्या वर्षी ते मध्य प्रदेशातील देवास या आपल्या मामाच्या गावी स्थलांतरित झाले.

श्रीराम शंकर अभ्यंकर यांचे आई-वडील शंकर केशव अभ्यंकर आणि उमा ताम्हणकर होते. शंकर आणि उमा अभ्यंकर यांना दोन मुली आणि पाच मुलगे अशी सात अपत्ये होती. त्यापैकी दुसऱ्या मुलाचे नाव श्रीराम आहे. २२ जुलै १९३० रोजी उज्जैन येथे त्यांचा जन्म झाला. उज्जैन हे मध्य प्रदेशातील ऐतिहासिक तीर्थक्षेत्र आहे. भारतीय ज्येष्ठ गणिती भास्कराचार्य ज्या ठिकाणच्या जगप्रसिद्ध वेधशाळेचे प्रमुख होते, अशा नामांकित ग्रामभूमीत जगद्विख्यात गणिती श्रीराम अभ्यंकर यांचा जन्म होणे ही घटना उल्लेखनीयच म्हणावी लागेल! श्रीरामचे वय दोन वर्षे असताना त्याच्या वडिलांची-शंकर अभ्यंकर यांची उज्जैन महाविद्यालयातून ग्वाल्हेरच्या व्हिक्टोरिया कॉलेजमध्ये बदली झाली आणि अभ्यंकर कुटुंब ग्वाल्हेरला राहू लागले.

श्रीराम यांची असाधारण बुद्धिमत्ता त्यांच्या बालवयापासूनच सर्वांच्या लक्षात येऊ लागली होती. श्रीराम यांनी शाळेत रीतसर प्रवेश घेण्यापूर्वीच, ते मोठ्या बहिणीचे बघून लिहू लागले. घरी त्यांच्यावर वडिलांच्या तालमीत संस्कृत, गणित विषयांचे ज्ञानग्रहण आणि संस्कार होऊ लागले. वयाच्या दहाव्या वर्षीच

वडिलांच्या शिकवणीखाली श्रीराम यांची भास्कराचार्यांच्या बीजगणित व भूमिती या विषयांतील पुस्तकांशी मैत्री झाली. त्या कुमारवयात श्रीराम यांचा स्वभाव एकलकोंडा होता. त्यांना समवयस्क मुलांच्या खोड्या वगैरे यात अजिबात रस नसे. त्याऐवजी ते सतत गणिताच्या पुस्तकातील सूत्रे, अवघड गणिते सोडवण्यात रमलेले असत. त्यांनी वडिलांनी लिहिलेले 'एलिमेंटरी जॉमेट्री'चे पुस्तक वयाच्या नवव्या वर्षीच समजून घेतले. श्रीराम यांनी वडिलांच्या कपाटातील उच्च गणिताची पुस्तके, आयझॅक न्यूटन, एडिसन, आईन्स्टाईन यांची जीवनचरित्रे, पुढील वर्गातील गणिताची अवघड सूत्रे आवडीने वाचून काढली होती. त्यांची गणितामधील तयारी शाळेत शिकत असतानाच, महाविद्यालयातील गणिताचे आकलन करून घेण्यापर्यंत झाली होती. शाळकरी श्रीराम कित्येकदा उच्च गणितातील काही सूत्रांबद्दल त्यांच्या वडिलांना अनेक शंका विचारत असत. त्यांच्याबरोबर त्यावर चर्चा करत असत.

श्रीरामने ग्वाल्हेरमधील शाळेत शिक्षण घेतले आणि पदवी प्राप्त केल्यानंतर, भौतिकशास्त्रात प्रमुख करण्याच्या हेतूने बॉम्बे विद्यापीठाच्या रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये गेले. गणिताची आवड असताना त्याला भौतिकशास्त्रात प्रमुख व्हायचे होते हे विचित्र वाटू शकते; परंतु असे दिसते की त्याचे वडील गणितज्ञ होते म्हणून त्याने हे केले. तथापि, रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये शिकत असताना त्यांनी टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये गणिताच्या व्याख्यानांनाही हजेरी लावली. विशेषतः, शिकागोहून भेट देणाऱ्या मार्शल स्टोनच्या व्याख्यानांना त्यांनी हजेरी लावली आणि या अनुभवाने त्यांना भारताबाहेर अभ्यास करणे आवश्यक आहे. जॉर्ज डेव्हिड बिरखॉफ यांच्या हाताखाली शिक्षण घेतलेले दामोदर धर्मानंद कोसंबी आणि पीएच.डी.चे शिक्षण घेतलेले पेसी मसानी (१९१९-१९९९) यांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. गॅरेट बिरखॉफ यांनी सल्ला दिला. कोसंबी यांनी अभ्यंकरांना गणितात करिअर करण्याचा जोरदार सल्ला दिला, तर हार्वर्डमध्ये संबंध असलेल्या मसानी यांनी अभ्यंकरांना पीएच.डी.चा अभ्यास करण्यासाठी तेथे प्रवेश देण्याची व्यवस्था केली.

आर्थिक पाठिंब्याशिवाय ते हार्वर्डला जाऊ शकत नव्हते, म्हणून त्यांनी युनायटेड स्टेट्समध्ये राहण्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा होईपर्यंत त्यांनी विविध भारतीय स्रोतांकडून निधीसाठी अर्ज केला. १९५१ मध्ये बॉम्बे विद्यापीठातून त्यांना बीएस्सी पदवी मिळाली. यानंतर त्याने हार्वर्डला जाण्याची तयारी केली. त्यांनी यूएसएला जाणाऱ्या जहाजावर मोफत प्रवासाची व्यवस्था केली; परंतु प्रवासात त्यांची तब्येत बिघडली आणि त्यांना इंग्लंडमध्ये किनाऱ्यावर सोडण्यात आले आणि दोन महिन्यांनंतर ते हॉस्पिटलमध्ये बरे झाले. ते युनायटेड स्टेट्सला

गेले परंतु सेमिस्टर अर्ध्याहून अधिक संपले होते. योगायोग असा, की अभ्यंकर यांनी हार्वर्डमध्ये पाऊल ठेवल्या दिवशी सर्वप्रथम त्यांचा ऑस्कर यांच्याशी परिचय झाला. ऑस्कर यांनी श्रीरामची अफाट बुद्धिमत्ता ओळखली. श्रीराम यांनीही त्यांच्याकडे पीएच.डी. करण्याचे ठरवले. झरीस्की यांनी अभ्यंकरची क्षमता ओळखून अतिशय प्रगत अभ्यासक्रम सुचवले.

त्याचे पीएच.डी. १९५५ मध्ये पूर्ण झाल्यावर त्यांची कोलंबिया विद्यापीठात गणित विषयात प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली. कोलंबियामध्ये आल्यानंतर त्यांनी ज्या विद्यार्थ्यांना शिकवले त्यापैकी एक होती यव्होन क्राफ्ट.

५ जून १९५८ मध्ये, त्याने न्यूयॉर्क शहरात यव्होन क्राफ्टशी लग्न केले. कोलंबिया आणि कॉर्नेल येथे नियुक्ती झाल्यानंतर ते जॉन्स हॉपकिन्स येथे सहयोगी प्राध्यापक होते. श्रीराम आणि यव्होन अभ्यंकर यांना दोन मुले होती: एक मुलगा, हरी, १९७० मध्ये जन्माला आला आणि एक मुलगी, काशी, १९७३ मध्ये जन्मली. १९९९ मध्ये हरीने मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये ऑपरेशन्स मॅनेजमेंटमध्ये पीएच.डी केली. आणि २००१ मध्ये बर्कले येथून काशीने गणित विषयात पीएच.डी. प्राप्त केली. १९६३ मध्ये अभ्यंकर यांची पर्ड्यू विद्यापीठात पूर्ण प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि १९६७ मध्ये त्यांना पर्ड्यू येथे गणिताचे मार्शल डिस्टिंग्विश्ड प्रोफेसर म्हणून नियुक्त करण्यात आले.

१९७८ ते १९८५ या काळात UoP च्या गणित विभागाचे प्रमुख असलेले अभ्यंकर यांनी गणितात शिक्षक आणि विद्यार्थ्यांची आवड निर्माण करण्यासाठी पुण्यात भास्कराचार्य प्रतिष्ठानची स्थापना केली होती.

भास्कराचार्य प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि गणित विभागाचे HoD, UoP, SA कात्रे म्हणाले, तो अशा प्रकारचा माणूस होता ज्याला गणित करताना आनंद वाटेल. रात्री ९ वाजता तो समस्या सोडवण्यास सुरुवात करायचा आणि पहाटेपर्यंत चालू ठेवायचा; कारण त्याला विश्वास होता की अखंड संशोधन करण्याची हीच योग्य वेळ आहे. विद्यार्थ्यांनी यांत्रिकपणे व्याख्याने आणि परीक्षा देण्याऐवजी स्वत:चा विचार करावा अशी त्यांची इच्छा होती.

अभ्यंकर यांच्या आवडीच्या संशोधन क्षेत्रांमध्ये अल्गोरिदमिक बीजगणितीय भूमिती, कम्युटेटिव्ह बीजगणित, स्थानिक बीजगणित, अनेक जटिल चलांच्या फंक्शन्सचा सिद्धांत, क्वांटम इलेक्ट्रोडायनामिक्स, सर्किट सिद्धांत, अपरिवर्तनीय सिद्धांत, संयोजनशास्त्र, संगणकीय भूमिती, संगणक साहाय्यित डिझाइन आणि रोबोटिक्स यांचा समावेश होता.

श्रीराम यांची बुद्धी अखेरपर्यंत तल्लख होती. ते आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत

गणित करत राहिले, गणित शिकवत राहिले. ते 'गणित हाच माझा धर्म आहे' असे सांगत. त्यांनी पर्ड्यू विद्यापीठाच्या परिसराजवळच असलेल्या त्यांच्या राहत्या घरी अभ्यासिकेत गणित विषयावर काही संशोधनपर लेखन करत असताना अखेरचा श्वास २ नोव्हेंबर २०१२ रोजी घेतला. त्यांच्या मृत्युलेखात असे दिसून आले आहे, की त्यांनी जगभरात राहणाऱ्या गणितज्ञांच्या जागतिक कुटुंबाचा भाग बनलेल्या विद्यार्थ्यांचा वारसा सोडला आहे आणि त्यांना त्यांनी आयुष्यभर भेट दिली आहे.

## संदर्भ सूची –


१. https://mathshistory.st-andrews.ac.uk/Biographies/-bhyankar/
२. https://www.cs.purdue.edu/news/articles/2012/memoriam-abhyankar.html
३. https://www.dnaindia.com/pune/report-noted-mathematician-ss-abhyankar-no-more-1760092
४. https://www.cs.purdue.edu/news/articles/2012/memoriam-abhyankar.html


ಌಌ

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



Editors


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre
Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

तेविसावी

# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. स्नेहल तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे ४११०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- **$ 4**

## अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य- लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# उद्यमशील व्यक्तिमत्त्व – विठ्ठल कामत

**– पुष्कर दिलीप जोशी**

जर एखाद्याने चांगले जेवण केले नाही तर माणूस चांगला विचार करू शकत नाही, चांगले प्रेम करू शकत नाही आणि चांगली झोपू घेऊ शकत नाही. विठ्ठल कामत, उद्योजक, हॉटेल व्यावसायिक आणि कामत हॉटेल्स (इंडिया) लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक यांनी अत्यंत जवळून अनुसरलेले हे एक तत्त्वज्ञान आहे.

५४ वर्षीय विठ्ठल कामत, कामत हॉटेल्स इंडियाचे कार्यकारी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, रु. ११२ कोटी, मुंबईस्थित, ऑर्किड हॉटेल आणि लोटस स्वीट्ससारखे ब्रँड असलेले हॉस्पिटॅलिटी ग्रुप आहेत.

त्यांचे जीवन हे अनुभव, लोक याबद्दल कथांनी भरलेले आहे. त्यांनी हे सर्व आपल्या समोर ठेवले आहे, खरं तर, एका व्यवस्थापन पुस्तक–इडली, ऑर्किड आणि इच्छाशक्ती! पण ही त्याची फक्त एक बाजू आहे. असे अजून त्यांचे बरेच पैलू आहेत.

खरं तर ते मनमोकळेपणाने सांगतात. याचा नमुना : त्यांच्या पुस्तकातून व मुलाखतीतून माझा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला, मुंबईतील ग्रँट रोड येथे एका खोलीच्या अपार्टमेंटमध्ये राहत होता. आम्ही आठ जण होतो : तीन भाऊ, तीन बहिणी आणि पालक. ती एक कॉमन रूम होती, जी रात्रीच्या वेळी बेडरूमसारखी दुप्पट व्हायची. बाहेरची बाल्कनी ही माझी शिक्षेची खोली होती. जो कोणी खोड्या करत त्याला तिथे ठेवण्यात यायचे. त्यात माझाही समावेश होता.

माझा जन्म झाला तेव्हापासून माझे वडील व्यंकटेश कामत रेस्टॉरंटच्या व्यवसायात होते. ते खूप मेहनती होते. त्यांचे वडील डिशवॉशर आणि बसबॉय म्हणून काम करत होते. १९५२ मध्ये त्यांनी 'सत्कार' हे पहिले रेस्टॉरंट उघडले. वयाच्या आठव्या वर्षी एका रेस्टॉरंटमध्ये काम करायला सुरुवात केली.

व्यंकटेश कामत यांची मुले, विशेषत: त्यांचा अस्वस्थ मधला मुलगा विठ्ठल याने स्वत:च्या हातून घडवलेले कष्ट आणि समर्पण हे गुण आत्मसात केले. कामत म्हणतात, आमच्या पालकांनी आम्हाला दिलेली सर्वांत मौल्यवान भेट

म्हणजे चांगले संस्कार. माझ्या वडिलांची त्यांच्या कामाप्रती असलेली बांधीलकी, त्यांची शिस्त, दृढनिश्चय आणि स्व-नियमन हे माझ्यासाठी आणि माझ्या भावंडांसाठी प्रेरणास्थान होते. माझ्या आईचे मोठे कुटुंब सांभाळण्याची क्षमता, तिचा त्यागी स्वभाव, उदाहरणार्थ:- सत्कार सुरू करण्यासाठी माझ्या वडिलांना पैशांची गरज असताना तिने तिचे दागिने गहाण ठेवले होते.

त्यांच्या वडिलांचा विश्वासू सहकारी, त्यांच्या मेहुण्याने त्यांचा विश्वासघात केला होता. त्यांना त्यांच्या व्यवसायात मदत करणारे कोणी नव्हते. तेव्हा कामत आणि त्यांचा मोठा भाऊ त्यांच्या वडिलांच्या मदतीसाठी पुढे आले.

एकदा रेस्टॉरंट व्यवसायात आल्यावर कामतच्या वडिलांची इच्छा होती की त्यांच्या मुलांनी त्यात प्रवेश करू नये - यशाचा मार्ग सोपा नव्हता. कामत यांच्याकडे नवीन कल्पना होत्या, व्यवसाय करण्याचे नवीन मार्ग होते - त्यापैकी त्यांच्या कल्पना त्यांच्या रुढीवादी वडिलांना आवडत नसत. त्यांचे म्हणणे होते की जगातील कोणाशीही व्यवसाय करा; पण वृत्तपत्रातील बोगस जाहिरातींच्या आधारे कधीही करू नका, असे व्यंकटेश कामत त्यांच्या मुलाला नेहमी सांगत असत.

पण तरीही विठ्ठल कामत यांनी काही नवीन वैशिष्ट्ये असलेली कल्पना सादर केली, जसे की सम्राट येथे बिअर सर्व्ह करणे, त्याच्या वडिलांसोबत ते चालवत असलेल्या रेस्टॉरंटपैकी एक. मी दारू पिण्याची परवानगी आधीच घेतली होती आणि वडील परवानगी देणार नाहीत. त्यांना पटवायला मला चार वर्षे लागली. शेवटी, त्याने एका अटीवर विश्वास ठेवला; रेस्टॉरंटमध्ये बिअर पिणाऱ्यांकडून कोणतेही अनियंत्रित दृश्य दिसणार नाही, असे कामत सांगतात.

उत्तम खाद्यपदार्थ आणि थंडगार बिअरच्या या मिश्रणाने सम्राटमधील ग्राहकांची संख्या काढली. दिवसेंदिवस संख्या वाढत गेली. व्यंकटेश कामतसारख्या कडक स्वभावाच्या रेस्टॉरंटने कबूल केले : 'विठ्ठल, तू बरोबर होतास.' तरुण कामतचा हा वैयक्तिक विजय होता, शेवटी एका माणसाची मान्यता मिळणे, ज्याला खुश करणे कठीण होते. 'आमचे वडील आमच्यावर कठोर स्वभावाचे होते. पण आज, जेव्हा मी मागे वळून पाहतो तेव्हा मला वाटते की यामुळे आम्हाला स्वतःला ढकलण्यात मदत झाली. आपण यशवंत व्हावे अशी त्याची इच्छा होती. आणि मी निश्चय केला की मी नक्की होईन,' असे कामत म्हणतात. विठ्ठल १९७० मध्ये त्यांच्या वडिलांमध्ये सामील झाले आणि आता ते आशियातील पहिले इकोटेल हॉटेल द ऑर्किडचे अध्यक्ष आहेत.

१९५२ मध्ये 'सत्कार' हे मुंबईतील लोकप्रिय रेस्टॉरंट व्यंकटेश कामत यांनी सुरू केले होते. पण हे पहिले नव्हते. कामत यांनी मुंबईतील माझगाव येथे एका

छोट्याशा मालमत्तेतून प्रवास सुरू केला. सम्राट, सुविधा, सुरुची, सिनेट या रेस्टॉरंटची यादी दिवसेंदिवस वाढतच गेली.

लोकांशी संपर्क साधण्याच्या कामत यांच्या जन्मजात क्षमतेमुळे त्यांना त्यांच्या अग्रस्थानी जाण्यात काही प्रमाणात मदत झाली आहे. लहानपणी, जेव्हा त्याच्या एका खोलीच्या अपार्टमेंटच्या बाल्कनीत खोड्या केल्यामुळे बंद केले जात असे, तेव्हा त्यांचे मित्र जे काही मिळेल ते खाण्याचे पदार्थ घेऊन त्याच्यासाठी येत असत. कामत यांनी १९७० च्या दशकात एक तडफदार तरुण म्हणून भेटलेल्या दिग्गज राय बहादूर मोहनसिंग ओबेरॉय – भारतीय हॉटेल उद्योगाचे नायक – यांच्यावरदेखील त्यांचे आकर्षण कायम होते.

या सगळ्याच्या दरम्यान, कामत कधीच लोकांचे आभार मानत नाहीत; कारण जे त्यांच्या आयुष्यात आले आणि महत्त्वपूर्ण बदल घडवून आले. जर व्यावसायिकदृष्ट्या पाहिले तर ओबेरॉय हा एक माणूस होता आणि दिवंगत बेहराम कॉन्ट्रॅक्टर, एक प्रसिद्ध पत्रकार आणि स्तंभलेखक व त्यांचे वैयक्तिक मित्र आणि मार्गदर्शक होते. तो खूप प्रभाव टाकणारा होता. त्याची भाषेवरची पकड खूप चांगली होती. मी त्याच्याकडून आयुष्यातील बारीकसारीक गोष्टींचे कौतुक करायला शिकलो, असे कामत सांगतात.

जीवनातील बारीकसारीक गोष्टींबद्दलची ही प्रशंसा त्याच्या विविध आवडींमध्ये आढळू शकते, मग ते लेखन असो, प्राचीन वस्तू गोळा करणे, पुस्तके गोळा करणे किंवा संग्रहालय चालवणे असो.

विठ्ठल कामत अजूनही म्हणतात, माझं काम अजून संपलेलं नाही. माझ्यासाठी, ही फक्त सुरुवात आहे. ते आयआयएम अहमदाबाद, बीआयटीएस पिलानी आणि भारत आणि परदेशातील अनेक व्यवस्थापन संस्थांना भेट देतात. १९८४ मध्ये कामत यांनी चार तारांकित हॉटेल 'एअरपोर्ट प्लाझा' विकत घेतले आणि त्याचे नाव बदलून कामत प्लाझा केले.

ते स्वतः एक पर्यावरणवादी आहेत. त्यांनी ६० लाखांहून अधिक झाडे लावली आणि १०० एकर पेक्षा जास्त टेकडीचे वनीकरणासाठी औषधी वनस्पती आणि स्थानिक झाडांमध्ये रूपांतर केले. मुंबईतील पहिले फुलपाखरू उद्यान आणि मुंबई आणि नवी मुंबईतील इतर उद्याने बांधण्याचे श्रेयदेखील त्यांना दिले जाते, तसेच देशाच्या विविध भागांमध्ये उभारण्यात आलेल्या चाइल्ड गिव्हज बर्थ टू मदर स्मारके देखील आहेत. कामत हे भारतातील स्वच्छ रस्ते राखण्यासाठी १२०० हून अधिक प्रगतिशील लोकॅलिटी मॅनेजमेंटमध्ये सहभागी आहेत. त्यांच्या वार्षिक पद्धतींमध्ये मुंबईतील गणपती विसर्जनानंतर १०० टनांहून अधिक 'निर्माल्य' (देवाला फुलांचे अर्पण केली जातात) खतामध्ये रूपांतरित करणे समाविष्ट आहे.

ते स्वतः एक संवर्धनवादी आहेत. निसर्गाने एक संरक्षक आणि पक्षीशास्त्रज्ञ म्हणून, त्यांनी मुंबईत 'रघू-चिवू गल्ली' (पोपट आणि चिमण्या स्ट्रीट), कोकण आणि ओरिसामध्ये कासवांच्या अंड्यांचे जतन आणि प्रजनन आणि किल्ले जाधवगड, पुणे जवळ हरणांचे संवर्धन केले आहे. ते ओरिसातील चिलिका सरोवरात 'डॉल्फिन वेधशाळा केंद्र' स्थापन करण्याच्या प्रक्रियेत आहेत. ३५,००० हून अधिक प्रदर्शनांचा संग्रह असलेले उत्तुंग पुरातन वास्तू, कामत यांनी मुंबई आणि किल्ले जाधवगड, पुणे येथे 'आई' - 'मदर म्युझियम'देखील स्थापित केले आहे.

ते स्वतः एक कला संग्राहक आहेत. कामत हे ललित कला संग्राहकदेखील आहेत. जे देशभरातील कलाकृती आणि पुरातन वास्तू गोळा करतात. कामत यांनी मुंबईतील ऑर्किड हॉटेलमध्ये आई- म्युझियम नावाच्या पुरातन वस्तूंचे छोटेसे सार्वजनिक प्रदर्शन उघडले. त्यांच्या निवासस्थानी चर्चगेटजवळ १०,८०० गणेशमूर्ती आणि ११,००० कासवांच्या कलाकृती आहेत. त्यांच्याकडे भारतातील पहिले संग्रहालय हॉटेल - किल्ले जाधवगड आहे.

**त्यांचे पुरस्कार -**

कामत यांना ११० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. ज्यात इंडियन एक्स्प्रेसचा सर्वोत्कृष्ट सीईओ उद्योग पुरस्कार, दलाई लामा यांच्याकडून मिळालेला गोल्डन पीकॉक पुरस्कार, जर्मनीतील जीवनगौरव पुरस्कार २०१२, ग्रीन हॉटेलियर पुरस्कार २०१०, राजीव गांधी पर्यावरण पुरस्कार २०१०, गोल्डन पीकॉक पुरस्कार यांचा समावेश आहे. Ola Ullsten द्वारे पर्यावरण व्यवस्थापन पुरस्कार २०१०. २००० मध्ये ग्रीन ग्लोब अचिव्हमेंट पुरस्कार. सर्वोत्कृष्ट कॉर्पोरेट पर्यावरण कार्यक्रमासाठी पाटा गोल्ड पुरस्कार २००१. आजीवन योगदान पुरस्कार 'हॉल ऑफ फेम २००८-२००९ मध्ये हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीमध्ये आजीवन योगदान. स्टार हॉस्पिटॅलिटी पुरस्कार - २००८ मध्ये त्याच्या पाथ ब्रेकिंग पर्यावरण चेतनामध्ये व्यवसाय आणि साध्य.

**कार्यक्षेत्र -**

ते सध्या महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट काऊन्सिल (MEDC) चे अध्यक्ष, हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाचे उपाध्यक्ष, प्रियदर्शनी अकादमीज ग्लोबल अवॉर्ड अॅडव्हायझरी कमिटीचे सदस्य आणि तंत्रशिक्षण मुंबई मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करतात.

**संदर्भ पुस्तक -**

१. इडली, ऑर्किड आणि इच्छाशक्ती!

२. https://vithalk52.blogspot.com/2010/08

ನ

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



Editors


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre

Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

तेविसावी

# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८९८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4

- **पृष्ठसंख्या :** १३०

- **मूल्य :** ₹ ३००/- / $ 4

# अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# थोर व्यक्तिमत्त्व शरद पवार

**– प्रा. रोहिदास ज्ञानेश्वर लांडे**

शरद पवार यांचे पूर्ण नाव शरद गोविंदराव पवार आहे. त्यांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील 'काटेवाडी' (Katewadi) या छोट्याशा गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव पवार आणि त्यांच्या आईचे नाव शारदाबाई पवार आहे. शारदाबाई पवार या स्वातंत्र्यपूर्व काळात पुणे जिल्ह्यातील स्थानिक राजकारणात कार्यरत होत्या. गोविंदाराव हेदेखील सहकारी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते होते. तसेच त्यांचे बंधू वसंतराव शेतकरी कामगार नावाच्या पक्षात कार्यरत होते.

प्रत्येक व्यक्तीला समजून, ऐकून घेण्याची सवय, प्रत्येकाची आपुलकीने विचारपूस करणे, वेगवेगळ्या जाती, धर्म आणि प्रांताचे लोक सर्वांना समजून घेऊन काम करणारे नेते म्हणजे शरद पवारसाहेब.

प्रत्येक जाती धर्माच्या आत लपलेला माणूस ओळखण्याच्या या गुणामुळेच शरद पवार आज सर्वांच्या मनातील साहेब आणि लाखो-करोडो युवकांचे प्रेरणास्थान झाले आहेत. यशवंतराव चव्हाणांनी बारामतीच्या खाणीतून शोधलेल्या या हिऱ्याला कोणी साहेब म्हणतं, कोणी विकासपुरुष, कोणी राजकारणातला चाणक्य तर कोणी ८० वर्षांचा पैलवान. आपल्या असामान्य व्यक्तिमत्त्वाने भारतीय राजकारणामध्ये स्वतःचे आगळे वेगळे स्थान निर्माण करणारे शरद पवार साहेब हे भारतीय राजकारणातील स्व-विचारधारा असणारे महनीय नेते आहेत.

**शिक्षण –**

शरद पवार यांचे प्राथामिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. भाषण करण्यात त्यांना आवड होती. त्यांनतर त्यांनी पुण्यातील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय शिक्षण घेतले. या काळात ते राजकारणात सक्रिय झाले. महाविद्यालयीन निवडणूक जिंकून ते जनरल सेक्रेटरी (जी.एस.) झाले आणि त्यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर नेतृत्त्व केले.

**विद्यार्थी चळवळीतून झाले लोकनेते –**

शरद पवार यांना कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नाही. ते महानगरात किंवा मोठ्या शहरातही जन्मलेले नाहीत. सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांच्याकडे त्यांचे समकालीन नेते बाळासाहेब ठाकरेंसारखे वक्तृत्व नव्हते. सभेलाही

फारशी गर्दी होत नव्हती. जीव ओवाळून टाकणारे कार्यकर्तेही नव्हते. त्यांच्या वक्तव्याने कधी कुठे दगा झाला नाही किंवा कुणाच्या भावना भरडल्या नाहीत. ते कधीही कोणता आदेश देत नाहीत. पण, केवळ आपली दूरदृष्टी शांत, संयमी स्वभाव याच्या बळावरच केवळ महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या राजकारणात मैलाचा दगड ठरलेत. इसवी सन १९५६ साली शरद पवार शाळेत असताना त्यांनी गोवामुक्ती सत्याग्रहाला पाठिंबा म्हणून विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला होता आणि येथूनच त्यांच्या जीवनातील राजकारणाची सुरुवात झाली.

विद्यार्थी संघटनेच्या एका समारंभासाठी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना आमंत्रित केले होते. या समारंभामध्ये शरद पवार यांनी केलेल्या भाषणामुळे यशवंतराव चव्हाण यांच्यावर प्रभावित झाले होते. व पुढे यशवंतराव चव्हाण यांच्या सांगण्यावरून, शरद पवार यांनी युवक काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. त्यानंतर यशवंतराव चव्हाण यांनी शरद पवार यांना अनेक वेळा मार्गदर्शन केले. वयाच्या चोविसाव्या वर्षी शरद पवार महाराष्ट्र राज्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. यशवंतराव चव्हाण यांचे मार्गदर्शन मिळाल्याने, शरद पवार यांना यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय वारसदार म्हणून ओळखले जाऊ लागले.

**राजकीय कारकर्दीची सुरुवात –**

शेतीचे प्रश्न व शेतीचा विकास हा सुरुवातीपासून त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळे आपले थोरले बंधू कृषितज्ज्ञ आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनासह १९७१ मध्ये त्यांनी बारामती कृषी प्रतिष्ठानची स्थापना केली. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी शेतीसाठीच्या पाण्याचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला, जोडधंदे उभे करण्यासाठी नवे प्रयोग केले, शेतीसाठी आधुनिक तंत्र शास्त्रीय पद्धती वापरण्यासाठी शेतकऱ्यांना सतत नवी दिशा दाखवली.

**मुख्यमंत्री –**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे शरद पवार यांचे राजकीय गुरू मानले जातात. वसंतदादांच्या सरकारमधून बाहेर पडल्यानंतर पवारांनी 'समाजवादी काँग्रेस'ची स्थापना केली आणि पुन्हा एकदा सत्ता स्थापनेचे खेळ सुरू झाले. राजकीय हालचालींना वेग आला. त्याचवेळी शरद पवारांनी जनता पक्षासोबत बैठक घेतली. एस.एम.जोशी यांनीही पवारांना नेतृत्व बहाल केले. आबासाहेब कुलकर्णी, एस. एम. जोशी आणि किसन वीर हे तेव्हाचे वरिष्ठ नेते शरद पवारांच्या पाठीशी उभे राहिले, असे चोरमारे सांगतात. १८ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्रात पहिल्यांदाच बिगर-काँग्रेस सरकार सत्तेत आले. यात पवारांची समाजवादी काँग्रेस, जनता पक्ष, शेकाप आणि कम्युनिस्ट पक्ष सहभागी झाले होते. या बिगर-काँग्रेस आघाडीचे नाव होते पुरोगामी लोकशाही दल अर्थात पुलोद. पुलोदच्या या प्रयोगामुळे शरद पवार हे वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. ते स्वतंत्र भारतातले सर्वांत तरुण मुख्यमंत्री ठरले.

१९८० मध्ये सत्तेत परतल्यानंतर इंदिरा गांधी सरकारने महाराष्ट्र सरकार बरखास्त केले. १९८० च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले आणि ए.आर. अंतुले यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे सरकार स्थापन झाले. १९८३ मध्ये, पवार भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (समाजवादी)चे अध्यक्ष बनले आणि त्यांच्या आयुष्यात पहिल्यांदाच बारामती लोकसभा मतदारसंघातून लोकसभा निवडणूक जिंकली. १९८५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीतही त्यांनी विजय मिळवला आणि राज्याच्या राजकारणात लक्ष घालण्यासाठी लोकसभेच्या जागेचा राजीनामा दिला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (समाजवादी)ला विधानसभेच्या निवडणुकीत २८८ पैकी ५४ जागा मिळाल्या आणि शरद पवार यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाली. १९८७ मध्ये शरद पवार काँग्रेस पक्षात परतले. जून १९८८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना केंद्रीय अर्थमंत्री केले, त्यानंतर शरद पवार यांना राज्याचे मुख्यमंत्री करण्यात आले.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना –**

शिक्षणाचे महत्त्व समाजाला समजू लागले तसेच त्यांच्या काही घरगुती अडचणीमुळे शिक्षण अर्धवट सुटले किंवा राहून गेले. त्यांना आयुष्याच्या पुढच्या टप्प्यावर शिक्षणाची गरज भासू लागली. काहींना त्यांच्या शिक्षणाच्या वयात वेगवेगळे अडचणीमुळे पूर्णवेळ शिक्षण शक्य नव्हते. अशा विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठाची गरज होती. विरोधी पक्ष नेते असताना १९८५ मध्ये शरद पवार यांना मुक्त विद्यापीठाच्या संकल्पनेबद्दल शिक्षकतज्ज्ञांकडून माहिती मिळाली. त्यांनी त्याच वेळेला ही कल्पना तात्कालीन सरकारला त्याची अंमलबजावणी करण्याविषयी सुचवले. पण प्रकरण हे पुढे सरकलेच नाही. १९८८ मध्ये श्री. पवार महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. आपण सुचवलेल्या संकल्पनेचा प्रत्यक्ष साक्षर करण्याची संधी त्यांना मिळाली. १९८९ मध्ये शरद पवार मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात नाशिकला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली.

**शिक्षण प्रसार –**

महाराष्ट्रातील ग्रामीण आदिवासी आणि दुर्गम भागातील शिक्षण प्रसारासाठी प्रसिद्ध असलेल्या रयत शिक्षण संस्थेचे श्री. पवार १९८९ मध्ये अध्यक्ष झाले. याच संस्थेच्या प्रवरानगर आणि बारामती येथील शाळेचे ते विद्यार्थी होते. श्री. पवार हे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाल्यानंतर संस्थेच्या शाळा महाविद्यालय आणि आश्रम शाळेमध्ये मोठी भर पडली. विद्यार्थ्यांच्या संगणक साक्षरतेसाठी त्यांनी १८ कोटी रुपयांचा स्वतंत्र निधी उभा केला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी

रुजावी आणि संशोधक जन्मावेत यासाठी त्यांनी रयत विज्ञान परिषदेची स्थापना केली. कर्मवीर विद्या प्रबोधनी च्या माध्यमातून संस्थेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन भरतीपूर्व प्रशिक्षण दिले जाते.

**सामाजिक क्षेत्रातील कार्य –**

शेतकऱ्यांना चांगल्या पद्धतीची बियाणे उपलब्ध व्हावे, खतवाटप वेळेवर आणि योग्य पद्धतीने व्हावे, शेतकऱ्याला आवश्यक अर्थपुरवठा व्हावा, यासाठी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष त्यांच्या भागात जाऊन मार्गदर्शन केले. या कामासाठी प्रयोग म्हणून सुरुवातीला महाराष्ट्रातील एकोणवीस जिल्हे निवडले गेले होते. हा प्रयोग पथदर्शी प्रकल्प पायलट प्रोजेक्ट म्हणून त्याकाळी नावाजला गेला. पुढे कृषी विभागामध्ये पथदर्शी प्रकल्प हा पायलट प्रोजेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला.

शरद पवार हे समाजाशी निगडित सर्व क्षेत्रांत आढळतात. त्यांचा क्रिकेटशी काय संबंध, अशी अनेकदा टीका झाली; मात्र शरद पवार यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे या टीकेकडे दुर्लक्ष केले. 'मुंबई क्रिकेट असोसिएशन'चे अध्यक्ष झालेले शरद पवार नंतर बीसीसीआयचे आणि त्यानंतर थेट आयसीसीचे अध्यक्ष झाले. देशाचे कृषी मंत्रिपद सांभाळताना, ते क्रिकेट संघटनेचे काम पाहत होते. विशेष म्हणजे, ते अध्यक्ष झाल्यानंतर अनेक सुविधा निर्माण केल्या. निवृत्त क्रिकेटपटूंना भरघोस निवृत्तिवेतन सुरू केले. क्रिकेटपटूच्या निधनानंतर त्याच्या विधवा पत्नीलाही हा लाभ मिळवून दिला. भारतात क्रिकेटमध्ये अधिक पैसा येतो; परंतु इतर खेळांमध्ये तो नाही. म्हणून इतर खेळांच्या विकासासाठी शरद पवारांनी ते अध्यक्ष असताना, बीसीसीआयने खर्च करायची रक्कम अनेक पटींनी वाढवली. त्यातूनच कब्बड्डी, खो-खो, कुस्ती आणि इतर खेळांचा विकास अधिक वेगाने सुरू झालेला आपण पाहत आहे.

**चरित्रे आणि आत्मचरित्र –**

- साहेब (शरद पवार चरित्रग्रंथ), लेखक व संपादक-सोपान गाडे.
- लोकनेते शरदराव पवार (लेखक-राम कांडगे).
- Sharad Pawar- A Mass Leader (लेखक-दीपक बोरगावे).
- शरद पवार यांचे 'लोक माझे सांगाती' नावाचे मराठी आत्मचरित्र आहे. (लेखक-शरद पवार)

**संदर्भ –**

१. https://mr.wikipedia.org/wiki/शरद पवार
२. https://techdiary.in/शरद-पवार-आत्मचरित्र-sharad-pawar-biography-in-marathi/

29

23rd International Interdisciplinary Conference

२३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# 'The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels'

# 'देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान'



**Editors**


Lyudmila Sekacheva | Dr. Vitthal Shivankar | Dr. Snehal Tawre
Dr. S. A. Nimbalkar | Dr. Shivling Menkudale | Dr. Sanjay Nagarkar

29

# तेविसावी

# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

संपादक

• लुदमिला सेकाचेव्हा • डॉ. विठ्ठल शिवणकर • डॉ. स्नेहल तावरे

• डॉ. एस. ए. निंबाळकर • डॉ. शिवलिंग मेनकुदळे • डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४११

- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and International Levels

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे
- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे
- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०
- ISBN 978 - 93 - 91033 - 77 - 4
- **पृष्ठसंख्या :** १३०
- **मूल्य :** ₹ ३००/- $ 4

# अनुक्रमणिका


• पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – संपादक / ७

१. सीनापुत्र : मा.आबासाहेब निंबाळकर — प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर / ९

२. श्रमिकांच्या सत्तेचे स्वप्न पाहणारा नेता — प्रा. डॉ. बाळासाहेब बावके / १४

३. झोपडी माजी आमदार दादाभाऊ कळमकर — प्रा. डॉ. पर्वती कळमकर / १८

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक अर्थतज्ज्ञ — प्रा. डॉ. सय्यद बशीर / २२

५. तो प्रवास सुंदर होता... — प्रा. डॉ. बाळासाहेब तुपे / २६

६. मॅकडॉनाल्ड्जचे स्वादिष्ट साम्राज्य — प्रा. डॉ. पौर्णिमा गुजर / ३०

७. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा आढावा — डॉ. मारुती केकाणे / ३४

८. विद्वान शेतकरी नेता – शरद जोशी — डॉ. बापुसाहेब घोडके / ३८

९. शून्यातून शिखरापर्यंत – बाबासाहेब काळे — डॉ.मंगल घोलप / ४२

१०. एक झंझावात — प्रा. विवेक मोरे / ४६

११. एक यशस्वी उद्योजक – श्री. आनंद महिंद्रा — प्रा. विजय नागपुरे / ५०

१२. डॉ. अविनाश वैद्य यांचे सामाजिक योगदान – एक अभ्यास — प्रा. सचिन कुलकर्णी / ५३

१३. मा. शरद पवार– समताधिष्ठित नेतृत्व — प्रा. पी. एस. यादव / ५७

१४. राष्ट्रसंत गाडगे महाराज — प्रा. अर्शद शेख / ६१

१५. जनसेवा हीच ईश्वरसेवा — प्रा. पूजा जाधव / ६५

१६. विनोबा भावे यांचे स्वातंत्र्य-लढ्यातील योगदान — प्रा. मुकुंद मुखेडकर / ६९

१७. शेअर बाजाराचे बिग बुल – राकेश झुनझुनवाला — प्रा. सारिका पेरणे / ७३

# सुंदरराजन

– प्रा. अशोक दगडू नाबगे

कुठलीही व्यक्ती आनंदी असण्याचे कारण तिच्या आयुष्यात सर्व काही ठीक आहे एवढच नसतं तर त्या व्यक्तीचा स्वतःच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टीकडे बघण्याचा दृष्टिकोण सकारात्मक असणे गरजेचे असते. हेच सुंदरराजन पिचाई अर्थात सुंदर पिचाई यांच्या बाबतीत म्हणावेसे वाटते.

एक सामान्य भारतीय कुटुंबातील व्यक्ती त्यांची बुद्धिमत्ता, क्षमता, कठोर परिश्रम आणि सकारात्मक वृत्तीच्या जोरावर गुगलसारख्या नामांकित कंपनीच्या उच्चपदापर्यंत झेप घेऊ शकले. सुंदरराजन हे सॉफ्टवेअर इंजिनिअर आहेत. सध्या ते गुगल या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

१२ जुलै १९७२ रोजी तामिळनाडूमधील 'मदुरै' या गावी एका सामान्य कुटुंबामध्ये सुंदरराजन यांचा जन्म झाला. त्यांचे वडील रघुनाथ पिचाई हे पेशाने विद्युत अभियंता होते तर आई लक्ष्मी पिचाई या स्टेनोग्राफर होत्या. पिचाई यांचे कुटुंब मध्यम वर्गीय होते. त्यामुळे त्यांचे उत्पन्न मर्यादित होते. त्यामुळे त्यांचे बालपण व जीवन अतिशय सामान्यपणे व्यतीत झाले. वडिलांनी मुलांना भौतिक सुख देण्यापेक्षा मुलांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले. त्यामुळे सुंदरराजन स्वतःच्या अभ्यासाकडे लक्ष देऊ शकले.

लहानपणापासूनच सुंदरराजन यांचा स्वभाव शांत, संयमी, अभ्यासू होता. अभ्यासाबरोबर त्यांना क्रिकेट खेळायलादेखील आवडायचे. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण चेन्नई येथील अशोकनगर भागात असलेल्या जवाहर विद्यालयामध्ये घेतले. बारावीपर्यंतचे शिक्षण चेन्नई येथील वणा वाणी स्कूलमध्ये झाले. बारावीनंतर त्यांनी आयआयटी खरगपूर येथे 'मेटलर्जिकल अँड मटेरियल सायन्स'मध्ये प्रवेश घेतला. त्या बॅचमध्ये अव्वल स्थान पटकावून रौप्यपदक मिळवले. पुढील शिक्षण त्यांनी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठातून 'मटेरियल सायन्स अँड इंजिनिअरिंग' यामध्ये मास्टर ऑफ सायन्स पूर्ण केले. येथेच त्यांनी आपले शिक्षण न थांबवता पुढे पेनसिल्व्हेनिया विद्यापीठाच्या व्हार्टन स्कूलमधून 'एमबीए' केले. त्यानंतर त्यांनी काही दिवस एका कंपनीमध्ये 'मॅनेजमेंट कन्सल्टन्ट' म्हणून काम केले.

१ एप्रिल २००४ मध्ये सुंदरराजन पिचाई यांनी गुगलमध्ये प्रवेश केला. तरुण

वयाचे सुंदरराजन पिचाई तंत्रज्ञानावरचे आपले निर्विवाद प्रभुत्व गाजवत गुगलमध्ये एक एक यशाची पायरी झपाट्याने चढत होते. तंत्रज्ञानाच्या प्रभुत्वाबरोबरच सुंदरराजन पिचाई यांच्याकडे भविष्याचा वेध घेणारी दूरदृष्टी होती. त्याचबरोबर सोबतीला व्यवस्थापकीय आणि कौशल्याची जोड होती. त्याचबरोबर सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपल्या इतर सहकाऱ्यांना बरोबर घेऊन काम करण्याची कला देखील त्यांच्यामध्ये आहे. सुरुवातीला गुगलमध्ये त्यांनी गुगल सर्च टूलबारवर काम केले. त्यानंतर गुगल क्रोम (Google Chrome) हे वेब ब्राउजर बनविण्यात त्यांचा खूप मोठा वाटा आहे. आज गुगल क्रोम हे जगातील सगळ्यात जास्त वापरले जाणारे वेब ब्राउजर आहे. त्याचप्रमाणे गुगल ट्रान्सलेट (Google Translate), गुगल मॅप (Google Map), गुगल ड्राइव (Google Drive), अँड्रॉईड ऑपरेटिंग सिस्टम बनविण्यातदेखील त्यांचे मोठे योगदान आहे. ही सगळी उत्पादने आज जगावर आपले अधिराज्य गाजवत आहेत. याच कारणामुळे गुगल कंपनीने आज यशाचे नवनवीन शिखरे पार केली आहेत आणि पुढेही करत राहील. गुगलने सुंदरराजन यांना सुरुवातीला त्यांची मेहनत पाहून वरिष्ठ उपाध्यक्ष या पदावर नियुक्ती दिली आणि पुढे १० ऑगस्ट २०१५ रोजी गुगलचे ते मुख्य कार्यकारी अधिकारी झाले.

सुंदरराजन यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी व्यापार आणि उद्योग या श्रेणीमध्ये २०२२ मध्ये भारत सरकारने पद्मभूषण पुरस्कार प्रदान केला. सॅन फ्रान्सिस्कोमध्ये भारताचे अमेरिकेतील राजदूत तरनजीत सिंग संधू यांच्या हस्ते त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

भारतात जन्मलेले सुंदरराजन गुगल या कंपनीत एक दशकापेक्षा अधिक काळापासून काम करत आहेत. गुगलचे सीईओ सुंदरराजन यांची यशोगाथा अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. चेन्नईमध्ये साधे जीवन जगण्यापासून ते आपल्या देशाला अभिमानास्पद वाटण्यापर्यंत त्यांनी काम केले आहे आणि पुढेही असेच चांगले काम करत राहतील आणि भारताचे नाव जगाच्या नकाशावर नव्या उंचीवर नेऊन ठेवतील अशी अशा आहे.

**References –**


१. https://www.biographymarathi.com/2021/02/sundar-pichai-biography-in-marathi.html
२. https://www.webshodhinmarathi.com/sundar-pichai-information-in-marathi/
३. https://www.mrmarathi.in/biography-of-google-ceo-sundar-pichai/
४. https://biographyinmarathi.com/sundar-pichai-biography-in-marathi/

५. https://www.loksatta.com/desh-videsh/google-ceo-sundar-pichai-is-awarded-with-padma-bhushan-for-2022-in-the-trade-and-industry-category-in-san-francisco-rvs-94-3313592/
६. https://mr.wikipedia.org/wiki/सुंदरपिचई
७. सुंदर पिचाई गुगलच भविष्य- जगमोहन भानवर अनुवाद रमा हार्डीकर

ॐॐ